देशातील १०० आघाडी वरील नागरी बँकात समाविष्ठ असलेली बँक अत्यल्प गुंतवणूकी
समृध्द भविष्य काळाच्या तरतुदीसाठी

महावीर कॅश सर्टिफिकेट
रिकरींग डिपॉझिट

निरंतर ठेव
दामदुप्पट योजना

पेन्शन/ग्रॅज्यु
मुदतबंद ठेव व अनेक यो



## श्री महावीर को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, कोल्हापूर

प्रधान कार्यालय :- ६८१ ई, शाहूपुरी २ री गल्ली,, महावीर चौक, कोल्हापूर
फोन नं. २०९५१, २०९५२

### -: शाखा विस्तार :-

कोल्हापूर शहर - लक्ष्मीपुरी, शाहूपुरी, मार्केट यार्ड, महाद्वार (जोतिबा) रोड इतर
शाखा - क. सांगाव, कुंभोज, जयसिंगपूर, नांदणी, सांगली, रुकडी, पट्टणकोडोली
शाखा शाहूपुरी विस्तारित कक्ष - वैशाली परिसर, आचार्य विद्यानंद संस्कृती भवन

☆ ग्राहकांच्या समृद्धीसाठी झटणारी बँक ☆

के. बी. झेले
मॅनेजर

सनतकुमार अंथणे
उपाध्यक्ष

आमगौंडा पाटील
अध्यक्ष

### -: संचालक मंडळ :-


बी. एस. पाटील,
एम. डी. वर्धमाने,
पी. एस. पाटील,
एस. बी. आडके,
पी. बी. मुळे,

एस. एस. वणकुद्रे,
जे. एम. आरवाडे,
एस. पी. मगदूम,
एस. जी. शिरगुप्पे,
सौ. पी. पी. अथणे,

एम. ए. मिणचे,
बापूसो। सि. पाटील
एम. जे. पाटील
बी. बी. मगदूम
प्रा. सौ. व्ही. ए. माणकापुरे

चित्रण व मुद्रण : प्रिन्ट ओम ऑफसेट, सातारा

# अनेकान्त




अंक ३२ वा

ुळजाराम चतुरचंद महाविदयालय, बारामती १९९३-९४

हार्दिक शुभेच्छा!



✷ सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याची ✷

**रुपी को-ऑप. बँक लि.**

**(शेडयूल्ड बँक)**

- मुख्य कचेरी -

२०६२, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी,

पुणे-४११ ०३०.

आपला हात जगन्नाथ
कर्तृत्वाच्या जोरावर जग जिंकतो सिकंदर
असतील दोन समर्थ हात
तर दैवही देते उत्तम साथ
तुमच्या हाती सगळे काही, संपन्न भविष्याची ग्वाही
तुम्हीच कमवा, तुम्हीच जमवा, रुपीच्या ओंजळीत ठेवा
जमविलेले सांभाळणे, सांभाळून वाढविणे
परस्परांच्या विशवासावर उंच उंच झेप घेणे
यासाठीच तुम्ही आम्ही एकत्र यायचे!

**श.का. पत्की**
सरव्यवस्थापक

**ग.के. भिडे**
उपाध्यक्ष

**डॉ. क.नी. भदे**
अध्यक्ष




अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम ।
तत्त्वं पूषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्टचे ।।

-ईशोपिनिषद, १५

अनन्तधर्मणस्तत्त्वं पश्यन्ती
प्रत्यगात्मन: ।
अनेकान्तमयी मूर्तिर्नित्यमेव
प्रकाशताम ।।

# अनेकान्त

वार्षिक नियतकालिक

अंक बत्तीसावा / १९९३-९४

## ♦ संपादक मंडळ ♦

**अध्यक्ष**

प्राचार्य डॉ. मनोजकुमार गांधी

**सहाय्यक**

उपप्राचार्य शरद नवाथे
उपप्राचार्य डॉ. कृष्ण सुर्वे
प्रा. कुमार अय्यर
प्रा. मानसिंगराव गोडसे
प्रा. प्रभाकर घेरे
प्रा. बाळासाहेब देशमुख
प्रा. विलास परकाळे

**प्रा. आप्पासाहेब देसाई**
प्रमुख संपादक


- संगणक -
**श्री. प्रशांत गुजर**
टाईप इनोव्हेटर्स, मोती चौक, सातारा

- मुद्रक -
**श्री. संदेश शहा**
प्रिंट ओम ऑफसेट, दौलतनगर, सातारा

प्रकाशक : **प्राचार्य डॉ. मनोजकुमार गांधी**, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, जि. पुणे.
मुखपृष्ठ : **श्री. दादा भगाटे**, जयसिंगपूर, कोल्हापूर.

# अनुक्रमणिका


## मराठी गदय विभाग

- ❑ मराठीचे वैभव : संत ज्ञानेश्वर — कु. संगीता पाटणे/१७
- ❑ मोरोपंताच्या काव्यरचनेतील केकावलीचे स्थान — कु. प्रगती भापकर/२०
- ❑ अशी आमची सहल — कु. स्वाती करमरकर वगैरे/२२
- ❑ स्वतंत्र भारतातील तरुणांची कर्तव्ये — शिवाजी कॅंगार/२४
- ❑ प्रदूषणाचा भस्मासूर — राजशेखर वाघमारे/२६
- ❑ जेथे जातो तेथे — संजय सागडे/२९
- ❑ भादवा — रवींद्र चव्हाण/३१
- ❑ गरज आहे सावित्रीबाईची — कु. सत्वशीला कोळेकर/३३
- ❑ डंकेल प्रस्ताव व भारत — राजू पाठक/३५
- ❑ लोकसंख्येचा विस्फोट व भारत — कु. वर्षा कांबळे/३८
- ❑ धर्म व राजकारण — विजय माळशिकारे/४०
- ❑ नियत — महेंद्र कांबळे/४२
- ❑ स्त्री समस्या आणि परंपरा — दादासाहेब एजगर/४६

## मराठी पदय विभाग

- ❑ मदर-१९९३ — रविंद्र चव्हाण/२३
- ❑ मावळती — पाडुळे टी.डी./१९
- ❑ कोणासाठी? — दीपक कांबळे/१९
- ❑ कधी कधी — गणेश घारे/३०
- ❑ हुंडा — संजय ढमे/२५
- ❑ पोरके सुख — कु. छाया गवळी/३२
- ❑ आकाश कोसळले — महेश डोईफोडे/३२
- ❑ ग्रीष्म आणि विरह — कु.अश्विनी होनराव/३९
- ❑ मला माहीत आहे — कु. अनुपमा इमामके/४१
- ❑ लेखणी — विनय मावळणकर/४८
- ❑ विरह — मनोज कोष्टी/४८
- ❑ साथ — शकील शेख/४५
- ❑ सृष्टिकर्ता — सुदाम पवार/४९
- ❑ जीवन — कु. डी. एस. होडके/४९
- ❑ धरेस — अवधूत कुलकर्णी/४९
- ❑ कितीदा — राहुल रासकर/४५
- ❑ स्वप्नवेडी — कु. आशालता गुणवरे/५०
- ❑ मृगतुषार — दत्ता येडे/५०
- ❑ याला जीवन ऐसे नाव — दवणे व्ही.के./५१
- ❑ अर्थ — संदीप कवीश्वर/५१
- ❑ का निसर्गा रुसलासी आमुच्यावरी — उध्दव कदम/५२


## ENGLISH PROSE

- ❑ Education in Daily Practice — Miss. Sul. Manisha N./
- ❑ Importance of Adult Education — Kamble MaheshKumar
- ❑ Computer Applications — Ramchandra Jare/56
- ❑ It is better to Retire God — Acharya Vishram/57
- ❑ India's Population Explosion — Mane Prabhanjan B./
- ❑ Education should be Employment Oriented — Kalange Vijay E./60

## ENGLISH POETRY

- ❑ To Nelson Mandela — Khandale/61
- ❑ An Unfortunate Snake — Khandale/55
- ❑ Flowers and Children — Kavishwar Sandip/56
- ❑ Friendship — Koshti Manoj/61
- ❑ True Respect — Paithankar V. Y./61


# संपादकीय



''अनेकान्त'' चा बत्तीसावा वार्षिक अंक आपल्या हाती देतांना आम्हा संपादक मंडळास कर्तव्यपूर्ती व कार्यसिध्दीचा विशेष आनंद होत आहे.

ग्रामीण परिसरात कार्यरत असलेल्या या महाविद्यालयाने गेल्या बत्तीस वर्षाच्या काळात पुणे विद्यापीठाच्या कक्षेत नव्हे तर महाराष्ट्रात ग्रामीण भागातील एक अग्रेसर महाविद्यालय म्हणून नावलौकिक संपादन केलाआहे. तसेच कला-क्रीडा-सांस्कृतिक क्षेत्रातच नव्हे, तर शैक्षणिक - बौध्दिक क्षेत्रातही सुयश संपादन केले आहे.

आमच्या महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी तनमनधनाने अविरत प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे प्राध्यापक व प्रशासकीय शिक्षकेतर सेवक वर्ग लाभला आहे. शिवाय महाविद्यालयाचा कल्पकतेने गुणात्मक-संख्यात्मक विकास व्हावा, महाविद्यालयाच्या उज्ज्वल परंपरेत भर पडावी म्हणून ध्येयप्रेरित-कर्तबगार अशा उत्तम प्राचार्यांची परंपरा मार्गदर्शक रूपाने लाभली आहे. त्यामुळेच महाविद्यालय सतत अनेक उपयोजन कार्यक्रमाने कार्यरत असते.

''अनेकान्त'' ला बत्तीस वर्षांची प्रदीर्घ परंपरा आहे. बारामती पंचक्रोशीच्या शैक्षणिक-सांस्कृतिक, सामाजिक वाटचालीत या महाविद्यालयाचे फार मोठे योगदान आहे. आपल्या महाविद्यालयाने भोवतालच्या या परिसराशी व समाजाशी जी एकरूपता व आत्मीयता साधली आहे, त्याचे प्रतिनिधिक रूप आपणास ''अनेकान्त''मध्ये बघावयास मिळेल. विशेषत: तरुण विद्यार्थ्यांचा तरुणाईतला खळखळता उत्साह, चैतन्य, जोम आणि साहित्य, कला, क्रीडादी सुप्त गुणांचा आविष्कार ''अनेकान्त'' मध्ये आम्ही शक्य तेवढ्या प्रमाणात शब्दांकित-मुद्रांकित करू शकलो आहोत.

देशातील तरुण पिढी व विद्यार्थी यांच्याकडे पाहिल्यास एकंदरीत चिंताजनक परिस्थितीने मन खिन्न होते. दिशाहीन, नीतिमूल्यांपासून विचलित, परीक्षार्थी अशा तरुण विद्यार्थ्यांना वेळीच आवर घालण्यासाठी त्यांच्या जीवन-दृष्टीत मूलभूत परिवर्तन घडवून आणल्याशिवाय त्यांचा भविष्यकाळ उज्ज्वल ठरणार नाही. त्या करता प्रचलित शिक्षणात बदल करून ते जीवनाभिमुख, मूल्याधिष्ठित व्हावे यासाठी गुरुकुल शिक्षण पध्दतीचा स्वीकार करण्याची वेळ आली आहे. त्यातून व्यक्तिमत्व-विकसित, आत्मविश्वासू असा कर्तृत्ववान युवक निर्माण होऊन तो धडाडीने आपला, समाजाचा व पर्यायाने राष्ट्राचा अभ्युदय घडविण्यास समर्थ होईल अशी आशा आहे.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना प्रभावी व परिणामकारक व्यासपीठ उपलब्ध व्हावे या हे साकारलेल्या ''अनेकान्त'' ने केवळ विद्यार्थ्यांची जीवनाकडे पहाण्याची दृष्टी, विचार, अनुभव, अ त्यांच्या साहित्याच्या रूपाने टिपण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय ''अनेकान्त'' जास्तीत जास्त उत् नीटनेटका, सर्वसमावेशक आणि आकर्षक करण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला आहे.

''अनेकान्त''च्या निर्मितीस अनेकांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे. विशेषत: तरुण व उत्सा प्राचार्य डॉ. मनोजकुमार गांधी यांनी वेळोवेळी आस्थेने मार्गदर्शन केले, प्रोत्साहन दिले. ''अनेका च्या निर्मितीचे ते आधारस्तंभ आहेत. माजी प्राचार्य शिवाजीराव कदम, उपप्राचार्य शरद नवा उपप्राचार्य डॉ. कृष्ण सुर्वे, संपादक मंडळ सदस्य व सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक यांनी आपुल सहकार्य केले. विशेषत: ''अनेकान्त'' करिता विद्यार्थी साहित्यिकांनी साहित्य निर्मिती क सहकार्य केले. या सर्वांच्या सहकार्याचे फलित म्हणजे हा ''अनेकान्त'' चा बत्तीसावा अंक होय.


सातारच्या ''प्रिंट ओम'' चे मालक श्री. संदेश शहा व त्यांचे सहकारी यांनी ''अनेकान्त'' ची मांड व छपाई उत्कृष्टपणे अल्पावधीत करून दिली. तसेच श्री. दादा भगाटे यांनी मुखपृष्ठ कल्पक आकर्षकपणे रेखाटल्याने अनेकान्तच्या सौंदर्यात अधिक भर पडली आहे.


''अनेकान्त''चे यश आपल्या स्नेहात आहे. मी निमित्तमात्र. अंकाच्या निर्मिति-प्रक्रियेत प्रत्य अप्रत्यक्ष गुंतलेल्या सर्वांचा मी मन:पूर्वक ऋणी आहे. शेवटी कविवर्य कुसुमाग्रजांनी म्हटल्याप्रमाणे

''समिधाच सख्या या, त्यात कसा ओलावा,
कोठून फुलापरि वा मकरन्द मिळावा?
जात्याच रुक्ष या, एकच त्या आकांक्षा,
तव आन्तर अग्नी क्षणभर तरि फुलवावा''

''अनेकान्त'' वाचतांनाही आपला आन्तर-अग्नी क्षणभर फुलावा.... मनाला आल्हाद मिळावा... दिलासा लाभावा, हीच आकांक्षा.

-प्रा. अप्पासाहेब देसा
संपाद





# प्राचार्यांचे मनोगत....

ग्रामीण व शहरी संस्कृती एकत्रित नांदत असलेली, कविवर्य मोरोपंत व श्रीधर स्वामी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली बारामती ही ऐतिहासिक पुण्यनगरी. या पुण्यनगरीचा कृषि-औद्योगिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या विकास होत असताना शैक्षणिकदृष्ट्याही विकास घडवून आणण्यात अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा सिंहाचा वाटा आहे. १९९३-९४ या शैक्षणिक वर्षाच्या व्दितीय सत्रापासून या महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर महिन्याभरातच या महाविद्यालयाची उज्ज्वल परंपरा गेल्या ३२ वर्षातील महाविद्यालयाची झालेली उल्लेखनीय प्रगती, एकोप्याने व सामंजस्याने काम करणारा तसेच महाविद्यालयाची प्रगती होण्यासाठी तळमळ बाळगणारा अनुभवी प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी या सर्वांच्या एकमेकांच्या भेटीतून, अनेक घटना प्रसंगातून त्यांच्या ठिकाणी असलेल्या चांगल्या गुणांची मला जाण झाली.

या प्रथितयश, भव्य महाविद्यालयाचे प्राचार्यपद हे अत्यंत आव्हानात्मक आहे. शहरी विद्यार्थी वर्गापेक्षा येथील विद्यार्थीवर्ग वेगळी अभिरूची ठेवून असल्याचे लक्षात आले. परंतु त्यांचात शिकण्याची जिद्द व धडपड दिसून आली.

गेल्या ३२ वर्षात विविध उपक्रमांव्दारे या महाविद्यालयाने भरीव प्रगती केलेली आहे. अनेक अभ्यासक्रम सुरू केलेले आहेत. अभ्यासपूरक व अभ्यासेतर अनेक उपक्रम राबवून अनेक सोयी-सुविधा महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. यामुळे आपला सर्वांगिण विकास साधताना विद्यार्थ्यांना निचितच प्रेरणा मिळत जाईल याची मला खात्री आहे.

महाविद्यालयाच्या प्राचार्यपदावर काम करताना व्यवस्थापन, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी तसेच समाजातील विविध स्तरावरील मान्यवर व्यक्तीं आदींना विश्वासात घेऊनच निर्णय घेतले जातील व त्यांच्या सहकार्याने विविध उपक्रम राबविले जातील. महाविद्यालयाची सर्वांगीण उन्नती करण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळ, केंद्र सरकार, राज्य सरकार, पुणे विद्यापीठ आदींचे मौलिक सहकार्य घेतले जाईल. विकास कामात प्रयत्नांची शिकस्त केली जाईल, विकासास प्राधान्य दिले जाईल. समाजोपयोगी संशोधन करण्यास प्राध्यापकांना उत्तेजन देण्यात येईल. शिक्षण आणि उद्योगधंदे, व्यापार, व्यवसाय इत्यादींमध्ये चांगले संबंध प्रस्थापित करून त्याव्दारे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी उद्योग सुरू करण्यास, योग्य नोकऱ्या मिळविण्यास मार्गदर्शन करण्यात येईल. यासाठी मान्यवर व्यक्तींचे सहकार्य घेण्यात येईल.

नवव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात शिक्षणावरील खर्चाची तरतूद दुप्पट करण्यात येणार आहे. सध्या

हे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३.७ टक्के एवढे आहे. हे प्रमाण ६ टक्क्यांवर नेण्यात येणार आहे. असे के सरकारने जाहीर केलेले आहे. तथापि शिक्षण क्षेत्राच्या खर्चासाठी निधी जमविण्याचे पर्यायी मार्ग शोध पाहिजेत. खाजगी संस्थांचा तसेच व्यापार, उद्योगधंदे, बँका व इतर संस्था यांचाही सहभाग असला पाहि असे अलीकडेच झालेल्या नऊ देशांच्या शिक्षणविषयक शिखर परिषदेत मान्य आलेल्या मसुद्यावर शिक्षणविषयक प्रश्नांवर बोलाविण्यात आलेल्या मुख्यमंत्र्यांच्या पहिल्या परिषदेत भारताचे पंतप्रधान मा पी.व्ही. नरसिंहराव यांनी सुचविले आहे. तसेच महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री आदरणीय श्री. शरदरावजी पवा यांनीही या दृष्टीने उच्च शिक्षणाच्या अर्थकारणासाठी शैक्षणिक संस्थेने इतर मार्ग शोधले पाहिजेत अ आग्रही प्रतिपादन केलेले आहे.

आपणांस समाजोपयोगी उपक्रम व व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम राबविताना याचा अवश्य विच करावा लागेल. अशा सहभागातून बारामती परिसराचा होत असलेला कायापालट व सर्वांगीण विकास प्रत्यक्षपणे हातभार लावता येईल.

महाविद्यालयाचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी तसेच सर्व घटकांना एकत्रितपणे घेऊन पुढे जाण्या शैक्षणिक व्यवस्थापन हेही महत्त्वाचे आहे. केवळ पाठ्यपुस्तकांचे अध्यापन, परीक्षांचे आयोजन, शैक्षणि वेळापत्रक एवढ्यापुरतीच शैक्षणिक व्यवस्थापनाची संकल्पना मर्यादित नाही. संपूर्ण शिक्षणाचा व्याप सम्यक् विचार शैक्षणिक व्यवस्थापनात अभिप्रेत आहे. यादृष्टीने माझे सर्व घटकांना नम्र आवाहन आहे की त्यांनी नवनवीन संकल्पना विचारात घ्याव्यात, स्वतःही मांडाव्यात. सर्वांच्या विचारविनिमया स्वीकारलेल्या योजना राबविण्यासाठी मनापासून सहभाग द्यावा व त्यांच्या पूर्ततेसाठी प्रयत्नशील राह यासाठी दैनंदिन स्वरूपाच्या कामकाजातून भविष्यकालीन योजना आखण्यासाठी, संकल्प राबविण्या आपला बराचसा वेळ दिला पाहिजे. आपल्या सहकार्यावरच भावी योजना, संकल्प यशस्वी होतील अ मला आशा वाटते.

महाविद्यालयात चाकोरीबध्द अभ्यासेतर उपक्रमांना देखील आपण महत्त्व देतो. आपल महाविद्यालयाची या संदर्भात मोठी कामगिरी आहे. साक्षरतेचा प्रसार तसेच साक्षरोत्तर कार्यक्रमा देखील आपल्या महाविद्यालयाने उत्कृष्ट कार्य केलेले आहे. या परंपरा देखील आपणांस पुढे चा ठेवावयाच्या आहेत. आपल्या महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री मा. श्री. शरदरावजी पवार यांचे आपल महाविद्यालयास सातत्याने कृपाछत्र लाभलेले आहे, वेळोवेळी मौलिक मार्गदर्शन मिळाले आहे, यापुढे मिळत राहील यात शंकाच नाही. यासाठी आपण सर्वांना महाविद्यालय कायमस्वरूपी प्रगतीपथा ठेवावयाचे आहे.

बारामती शहर प्रचंड वेगाने प्रगती करीत आहे. उद्योगधंदे, बँका, व्यापारउदीम याची मोठ्या प्रमाणा वाढ होत आहे. बारामतीचा शैक्षणिक व सांस्कृतिक विकास करण्याचे कार्य मात्र आपणा सर्वांना करावया आहे. यासाठी आपण नियोजनबध्द आखणी करून कार्य करणार आहोत व बारामती शहराचा शैक्षणिक सांस्कृतिक नावलौकिक वाढविण्यास हातभार लावणार आहोत अशी मला खात्री वाटते.

-प्राचार्य डॉ. मनोजकुमार गांधी

## अनेकान्त एज्युकेशन सोसायटी

### गव्हर्निंग कॉन्सिल, बारामती (पुणे)

१) मा. श्री. जंबुकुमार शहा (सराफ) अध्यक्ष, बारामती
२) मा. डॉ. वर्धमान माणिकचंद कोठारी, सचिव, बारामती
३) मा. श्री. माणिकलाल तुळजाराम शहा, खजिनदार, बारामती
४) मा. श्री. विमलचंद माणिकचंद गांधी, सोलापूर
५) मा. श्री. विलास गौतमचंद शहा, सोलापूर
६) मा. श्री. शिवलाल प्रेमचंद शहा, बारामती
७) मा. श्री. मोतीचंद फुलचंद शहा, बारामती
८) मा. श्री. माणिकचंद ज. भिसीकर, बाहुबली
९) मा. श्री. मोतीलाल तुळजाराम शहा, बारामती
१०) मा. श्री. राजकुमार तुळजाराम शहा, बारामती
११) मा. श्री. आमगौंडा आप्पासाहेब पाटील, जयसिंगपूर
१२) मा. श्री. जयपाल भूपाल झेले, जयसिंगपूर
१३) मा. श्री. शशिकांत शिवलाल शहा, बारामती
१४) मा. श्री. पी.बी. पाटील, निमशिरगांव
१५) मा. श्री. नलिनचंद्र गांधी, पुणे
१६) मा. प्राचार्य डॉ. आर.टी. अक्कोळे, जयसिंगपूर
१७) मा. प्राचार्य डॉ. जे.के. गोधा, पुणे
१८) मा. प्राचार्य डी.डी. मगदूम, जयसिंगपूर
१९) मा. प्राचार्य डॉ. मनोजकुमार मोतीचंद गांधी

## अनेकान्त एज्युकेशन सोसायटी

### स्थानिक समिती, बारामती (पुणे)

- मा. श्री. जंबुकुमार चंदुलाल शहा / अध्यक्ष
- मा. डॉ. वर्धमान माणिकचंद कोठारी / सचिव
- मा. श्री. मोतीचंद फुलचंद शहा / खजिनदार
- मा. श्री. शशिकांत शिवलाल शहा / खजिनदार
- मा. श्री. माणिकलाल तुळजाराम शहा / सदस्य
- मा. श्री. खुशालचंद रतनचंद छाजेड / सदस्य
- मा. श्री. भोगीलाल गुलाबचंद शहा / सदस्य
- मा. श्री. पवनलाल गंगाराम गांधी / सदस्य
- मा. श्री. माणिकलाल रुपचंद शहा / सदस्य
- मा. श्री. विलास माणिकचंद शहा / सदस्य
- मा. श्री. अरहंतदास हिराचंद शहा / सदस्य
- मा. श्री. माणिकलाल छगनलाल मुथा / सदस्य
- मा. श्री. विलास दिपचंद शहा / सदस्य
- मा. श्री. राजकुमार तुळजाराम शहा / सदस्य
- मा. प्राचार्य डॉ. मनोजकुमार मोतीचंद गांधी / सदस्य

---

- मा. ॲडव्होकेट अनिल दिगंबर गारुळे / कायदेशीर सल्लागार

# हार्दिक अभिनंदन व अभिष्टचिंतन

## यशस्वी निवड – अभिनंदन

प्राचार्य डॉ. राम शेवाळकर : अध्यक्ष, ६७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, गोवा.
श्री. बाळासाहेब तावरे : चेअरमन, दि माळेगांव सहकारी साखर कारखाना लि., शिवनगर (माळेगांव).
श्री. जवाहर मोतीलाल शहा (वाघोलीकर) : अध्यक्ष, मर्चन्ट असोसिएशन, बारामती.
श्री. सुनिल हरिभाऊ पोटे : उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोदयोग मंडळ, मुंबई.
श्री खुशालचंद रतनचंद छाजेड : संचालक, रुपी-को.ऑपरेटिव्ह बँक, पुणे (फेरनिवड)
श्री. माणिकलाल रुपचंद शहा (वडुजकर) : महामंत्री श्री सिध्दक्षेत्र कुंथलगिरी
श्री. सुभाष ढोले, : सभापती, शिक्षण मंडळ नगरपरिषद, बारामती
प्रा.डॉ. डी.के. मगदूम : प्राचार्य, शारदाबाई पवार महाविद्यालय शारदानगर (माळेगांव)
प्रा. आर. एम. मिसाळ : प्राचार्य, बाबूराव घोलप महाविद्यालय सांगवी (पुणे)
प्रा. श्रीधर हेरवाडे : प्राचार्य, जयसिंगपूर महाविद्यालय, जयसिंगपूर.
प्रा. इ.के. पाटील
प्रा. एम.बी. कंडारकर : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व्यवस्थापन समितीवर - प्राध्यापक प्रतिनिधी निवड
श्री. व्ही.जी कुंभार : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय स्थानिक समितीवर - शिक्षकेतर सेवक प्रतिनिधी निवड

## पुरस्कार प्रदान – अभिनंदन

मा. पद्मश्री डॉ. अप्पासाहेब पवार : जमनालाल बजाज पुरस्कार प्रदान
डॉ. कोयाजी बानू (संचालक के. ई. एम. हॉस्पिटल, पुणे) : पुणे विद्यापीठाची सन्माननीय डी.लिट पदवी प्रदान
: रॅमन ''मॅगसेसे'' पुरस्कार प्रदान.
डॉ. बाबा आढाव (अध्यक्ष, हमाल पंचायत) : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ डी. लिट पदवी प्रदान.
श्री. किरण गुजर (माजी विद्यार्थी) : कलागौरव प्रतिष्ठान, पुणे तर्फे ''कलागौरव'' पुरस्कार प्रदान
सौ. विजया सस्ते (माजी विद्यार्थिनी) : स्वातंत्र्य दिनानिमित्त पुणे जिल्हा परिषदेतर्फे ''आदर्श शिक्षिका'' पुरस्कार प्रदान.

## अभीष्टचिंतन – शुभेच्छा

श्री. पु. ल. देशपांडे, थोर साहित्यिक : अमृत महोत्सवपूर्ती
श्री. जगन्नाथराव कोकरे, ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक : अमृत महोत्सवपूर्ती
प्राचार्य डी.डी. मगदूम (जयसिंगपूर महाविद्यालय, जयसिंगपूर) : प्राचार्य सेवानिवृत्ती व षष्ठयब्दिपूर्ती
प्रा. कुमार अय्यर (इंग्रजी) प्राध्यापक : सेवा निवृत्ती व षष्ठयब्दिपूर्ती
प्रा. बाळासाहेब पाटील (गणित) प्राध्यापक : सेवा निवृत्ती व षष्ठयब्दिपूर्ती
प्रा. नीलकंठ लोंढे (मराठी) प्राध्यापक : सेवा निवृत्ती व षष्ठयब्दिपूर्ती


*With Best Compliments From*

**SHREE SIDDHESHWAR PLASTIC INDUSTRIES LTD.**

**Manufacturers of H.D.P.E. / P.P. Woven Sacks**

**Factory & Office**
Plot No. 18, M.I.D.C., Murbad, Dist. Thane.

**C. M. GHADGE**
Managing Director
Telephone : Resi : 2102, Factory : 2311, STD Code : 02516

**ANCILLARY PROJECT TO R.C.F. BOMBAY**

# * भावपूर्ण श्रध्दांजली *

सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींचे दुःखद निधन झाले. त्याबद्दल आम्ही ती[illegible] व्यक्त करुन महाविद्यालयातर्फे त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहोत.

## आमच्या महाविद्यालयाचे :

प्रा. डॉ. धनचंद्र मगदूम यांचे पिताजी श्री. कल्लाप्पा मगदूम : वृध्दापकाळाने निधन.
प्रा. मानसिंगराव गोडसे यांचे पिताजी श्री. वामनराव गोडसे : वृध्दापकाळाने निधन.
प्रा. गुलाबराव जगताप यांच्या धर्मपत्नी सौ. शारदाबाई जगताप : अपघाती निधन.
प्रा. रतिलाल शहा (माजी प्राध्यापक) यांच्या धर्मपत्नी सौ. कमलबाई शहा : दीर्घकालीन आजाराने निधन.
श्री. रमेश कोरे (सेवक) यांच्या मातोश्री सौ. मालतीबाई कोरे : दीर्घकालीन आजाराने निधन.
कु. माधवी कळंबकर : व्दितीय वर्ष कला विदयार्थिनी : अपघाती निधन.
श्री. अनिल भंडारी : तृतीय वर्ष वाणिज्य विदयार्थी : अपघाती निधन.
श्री. संजय कदम, बारावी कला विदयार्थी : असाध्य आजाराने निधन.
कु. राखी गालिंदे, तृतीय वर्ष वाणिज्य : विदयार्थिनीचे दुःखद निधन.

## महाविदयालयाचे हितचिंतक - आश्रयदाते :

मा. श्री. प्रभाचंद्र माणिकलाल शहा, अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सदस्य, आश्रयदाते, प्रसिध्द व्यापारी, बारामती - अपघाती निधन.
मा. श्री. दिपचंद धरमचंद शहा, अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सदस्य, प्रसिध्द व्यापारी, संघपती, बारामती : वृध्दापकाळाने निधन.
मा. श्री. मणिभाई देसाई, थोर गांधीवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, उरळीकांचन (पुणे) अल्पशा आजाराने निधन.
मा. ना.ग. गोरे - थोर समाजवादी विचारवंत, पुणे : वृध्दापकाळाने निधन
श्री. कमलाकांत ढवाण-पाटील, माजी सभापती, पंचायत समिती बारामती : ह्दयविकाराने निधन.

**मराठवाडा भूकंपाच्या नैसर्गिक आपत्तीत मृत्युमुखी पडलेल्या हजारो देशबांधवांना भावपूर्ण श्रध्दांजली.**





## हार्दिक अभिनंदन!



मा. पद्मश्री डॉ. आप्पासाहेब पवार
''जमनालाल बजाज'' पुरस्कार व पुणे विद्यापीठाची डी.लिट. बहुमानाची पदवी प्रदान




मा. खुशालचंद रतनचंद छाजेड
रुपी को-ऑप. बँक, संचालकपदी फेरनिवड




मा. माणिकलाल रुपचंद शहा (वडुजकर)
''महामंत्री'' श्रीसिध्द क्षेत्र कुंतलगिरी पदी निवड



मा. प्राचार्य डी.डी. मगदूम
जयसिंगपूर महाविद्यालय, जयसिंगपूर
प्राचार्य सेवा निवृत्ती व षष्ठ्यब्दिपूर्ती



मा. जवाहर मोतीलाल शहा (वाघोलीकर) सदस्य,
रेल्वे सल्लागार समिती रेल्वेमंत्री प्रतिनिधी व अध्यक्ष,
मर्चंट असोसिएशन, बारामती, फेरनिवड



मा. किरण गुजर,
कलागौरव पुरस्कार व वीजमंडळ सल्लागार
मंडळ, सदस्य, पुणे जिल्हा, नियुक्ती



मा. सुभाष ढोले, सभापती, शिक्षणमंडळ,
नगरपरिषद, बारामती, निवड



# भावपूर्ण श्रध्दांजली

**स्व. श्रीमान शेठ लालचंद हिराचंद दोशी (मुंबई)**
**संस्थापक सदस्य व माजी अध्यक्ष,**
**अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती.**

भारतीय उदयोग क्षेत्रातील अग्रगण्य उदयोगपती व अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सदस्य व माजी अध्यक्ष मा. श्रीमान शेठ लालचंद हिराचंद दोशी यांचे ८९ व्या वर्षी वृध्दापकाळाने मुंबई येथे दु:खद निधन झाले.

भारतीय उदयोग व अर्थशास्त्रावर गंभीर व मूलगामी चिंतन करणारे, स्वदेशी व स्वावलंबन तत्त्वावर दृढ श्रध्दा व निष्ठा असणारे एक प्रखर राष्ट्रवादी असे स्व. श्रीमान शेठ लालचंद हिराचंद यांचे व्यक्तिमत्व होते. भारताच्या औदयोगिक विकासात त्यांचा सिंहाचा वाटा असून त्यांनी वडील बंधू स्व. श्रीमानशेठ वालचंद हिराचंद यांच्या सहकार्य व मार्गदर्शनाखाली भारतात औदयोगिक साम्राज्य निर्माण करून त्याची धुरा समर्थपणे दीर्घकाळपर्यंत सांभाळली.


औदयोगिक क्षेत्राबरोबरच राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेत भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. विधानसभा, राज्यसभेचे सदस्य म्हणून राजकारणात राहून नीतिमूल्ये, स्वयंअनुशासन व राष्ट्रीयता यांचा पाठपुरावा करण्यात त्यांचा पुढाकार होता. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रात मोलाची कामगिरी केली, शाळा-महाविदयालये, धर्मार्थ दवाखाना, ग्रंथालये, बोर्डींग इ. ची सामाजिक - शैक्षणिक जाणीवेने व कर्तव्य भावनेने स्थापन व नेतृत्व केले. त्यांच्या जडणघडणीत अर्थसहाय्य करण्यात त्यांचे दातृत्व अत्यंत उदार व डोळस होते. या सर्व संस्थांवर पुत्रवत प्रेम करून त्यांनी त्यांचा डोळसपणे विकास घडवून आणला.

स्व. श्रीमान शेठ लालचंदजींना साहित्य, संगीत व मराठी नाट्याविषयी मार्मिक जाण व आसक्ती होती. रामायणाविषयी त्यांचे स्वतंत्र व मूलगामी विचार होते. एक अत्यंत शिस्तप्रिय, करडे, व बुध्दिवादी असे त्यांचे व्यक्तिमत्व होते, पण अंतरंग अत्यंत कोमल होते. विशेषत: जैन समाजाच्या दृष्टीने ते चैतन्याचा व सुधारणांचा अखंड झरा होते. भारताच्या औदयोगिक क्षेत्रात व जैन समाजात स्व. श्रीमान शेठ लालचंदजीची उणीव दीर्घकाळ भासत राहील यात शंका नाही. त्यांच्या निधनाने अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती व जयसिंगपूर महाविद्यालय यांची फार मोठी हानी झाली आहे.


राष्ट्राशी - समाजाशी इमान राखणारे स्वाभिमानी, तेजस्वी चैतन्यमय, सर्वांना प्रेरणा देणारे असे ते थोर व्यक्तिमत्व होते. शिक्षण, शेती व कारखानदारीचा स्वबळावर विकास करुन सामर्थ्यवान देश बनविण्याचे स्वप्न पहाणारा द्रष्टा, धडाडीचा व कर्तृत्वसंपन्न कारखानदार, उदयोगाचा महामेरु कायमचा हरपला आहे, तथापि त्यांचे कार्य-कर्तृत्व आम्हांस सतत प्रेरणा देत राहील.

स्व. श्रीमान शेठ लालचंद हिराचंद यांच्या पवित्र आत्म्यास आमची विनम्र व भावपूर्ण श्रध्दांजली.

## - राष्ट्रीय छात्रसेना -



मा. प्राचार्यांसमवेत कंपनी कमांडर व रँक होल्डर्स



पथक निरीक्षण : मा. जंबुकुमार शहा

रिनीयर अन्डर ऑफिसर



**ए.वी. कुलकर्णी**
पी. आर. डी. व
रॉक क्लायबिंग कॅम्प

## - अन्डर ऑफिसर्स -



**एन.एस. देवकाते**
रॉक क्लायबिंग कॅम्प



**आर.वी. टकले**
आर. डी. रिप्रेझेंट



**एम.एन. बोराटे**
वार्षिक प्रशिक्षण शिबीर



**एन.जे. शेख**
नॅशनल इंटिग्रेशन कॅम्प

# उज्ज्वल यशाचे मानकरी

## - अभिनंदन -

( मार्च/एप्रिल १९९३ परीक्षेत महाविद्यालयात प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांक )



शुभांगी काळगी
एम.ए.



रश्मी गायकवाड
ऑक्टो. ९३ मध्ये झालेल्या
उच्च माध्यमिक परीक्षेत शास्त्र शाखेत
पुणे विभागात प्रथम क्रमांक



एन.बी. बंडगर
एम.कॉम.



एम.यू. भट
१२वी सायन्स



एस.एस. गायकवाड
१२वी आर्ट्स




आय.ए. दाते
१२वी कॉमर्स



ए.सी. गोजारी
१२वी कॉमर्स




राजश्री भेडा
बी.एस्सी.



अर्चना बोरावके
बी.ए.



लीना गांधी
बी.कॉम.



अब्राहम नैनन
बी. लिब. अँन्ड आय. सायन्स

# राष्ट्रीय सेवायोजना



मा. प्राचार्या समवेत कार्यक्रम अधिकारी व गटप्रमुख


## ● अभिनन्दन ●




सुनीता धायगुडे

(२६ जानेवारी १९९४ रोजी दिल्ली येथे झालेल्या प्रजासत्ताक दिन संचलनात सहभाग)

## श्रमदान





विशेष हिवाळी शिबीर, मोजे उंडवडी (क.प.)

# राष्ट्रीय सेवा योजना शिबीर

(राष्ट्रीय एकात्मता व प्रजासत्ताक दिन संचलन पूर्वतयारी शिबीर)

उद्घाटन



मा.कुलगुरु डॉ. श्रीधर गुप्ते, नगराध्यक्ष मा. सदाशिवराव सातव, शिक्षणमंत्री मा. प्रभाकरराव धारकर

सत्कार




मा. कुलगुरू डॉ. श्रीधर गुप्ते, पुणे विद्यापीठ





मा. मुख्यमंत्री शरदराव पवार, मा. श्री. के. सी. पंत, खासदार श्री. गोविंदराव आदिक, मा. आमदार अजितदादा पवार




शिबीरार्थींचे स्वागत करतांना
मा. पद्मश्री डॉ. आप्पासाहेब पवार

सत्कार



मा. खासदार के.सी.पंत
अध्यक्ष, दहावा वित्त आयोग, भारत सरकार

सत्कार



महाराष्ट्राचे शिक्षणसचिव मा. लखनपाल

(23)

# विभागीय क्रीडा स्पर्धांसाठी निवड



एस.व्ही.पवार
विद्यापीठ-क्रॉस कंट्री



एस.टी.झगडे
महाराष्ट्र राज्य, कब्बडी



यशश्री शहा
बॅडमिन्टन



डी.आर.काळे
बास्केट-हॅण्ड बॉल



सुमेधा जोशी
बॅडमिंटन



एम.एल.कांबळे
बास्केट बॉल



ए.पी. तांबोळी
वजन उचलणे



एस.पी. गरुड
वजन उचलणे




एस.एस.सकट
हॅण्डबॉल



एस.डी.कदम
कुस्ती



डी.व्ही.खलाटे
कुस्ती



डी.बी.कोकरे
मल्लखांब




एन.पी.मोरे
मल्लखांब


# आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धा



कुस्ती
(विजयी संघ)



मल्लखांब
(विजयी संघ)



खो-खो-मुले
(उपविजयी संघ)

# आंतरमहाविद्यालयीन/शालेय क्रीडास्पर्धा



बॅडमिन्टन-मुली
(उपविजयी संघ)



जिल्हा व्हॉलीबॉल-मुली
(उपविजयी)

## विभागीय स्पर्धा खेळाडू (कनिष्ठ महाविद्यालय)



किशोर पटेल
व्हॉलीबॉल



सुनीता खिंडारे
व्हॉलीबॉल, मैदानी स्पर्धा



जितेंद्र पटेल
व्हॉलीबॉल



उमेश काळे
खो खो

# कविवर्य मोरोपंत वाद आणि वक्तृत्व स्पर्धा


## पारितोषिक वितरण




वक्तृत्व स्पर्धा - आरती रानडे
पूना कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे



वाद स्पर्धा - राहूल वैद्य शिरीष केळकर
आय.एल.एस.लॉ. कॉलेज, पुणे



उत्स्फुर्त स्पर्धांचा चषक प्राचार्यांकडे सोपवितांना
बारामतीनगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. कोळेकर





उत्स्फुर्त वक्तृत्व स्पर्धा - योगेश जोशी
सिम्बॉयसिस कला व वाणिज्य महाविद्यालय, पुणे

महाविद्यालय वर्धापन दिन



प्रमुख पाहुणे - डॉ. कल्याण गंगवाल


वाङमय मंडळ



उद्घाटक डॉ. ग.नी.जोगळेकर

# क्रीडा नैपुण्य पारितोषिक वितरण समारंभ


(प्रमुख पाहुणे श्री. राम भागवत, ऑलिम्पिक कोच)
विशेष उपस्थिती - शिवछत्रपती पुरस्कार विजेती कु. हेमलता उरसळ)



श्री.राम भागवत




कु. हेमलता उरसळ





उद्घाटन

- पारितोषिक वितरण -



असोसिएशन ऑफ झूलाजिस्ट'चे उद्घाटन करतांना
मा. डॉ. कोठारी व प्राचार्य डॉ. गांधी

सत्कार :



मुख्यमंत्री - सचिवपदी बढती मिळाल्याबद्दल
मा. श्री. प्रतापसाहेब प्रभाकर देशमुख यांचा सत्कार

# • वार्षिक गुणवत्ता पारितोषिक वितरण समारंभ •

(प्रमुख पाहुणे मा. श्री. शिवाजीराव देशमुख, जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, पुणे)





मा. श्री. शिवाजीराव देशमुख : उपस्थितांना मार्गदर्शन करतांना



मा. श्री. शिवाजीराव देशमुख यांचा सत्कार


## पारितोषिक वितरण






- पारितोषिक वितरण -






## – रक्तदान शिबिर –





'प्रजासत्ताक दिना'निमित्त झालेले रक्तदान शिबिर

## संयुक्त कर्मवीर जयंती समारंभ



प्रमुख पाहुणे-
मा. डॉ. मा.दा. नलावडे, माजी कुलसचिव, पुणे विद्यापीठ,
कर्मवीरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करताना




माजी प्राचार्य एस.पी. कदम पाहुण्यांचे स्वागत करताना
व्यासपीठावर स्व. कमलाकांत ढवाण-पाटील,
मा. गुलाबराव ढवाण-पाटील, डॉ. व.मा. कोठारी,
डॉ. मा.दा. नलावडे, कुलसचिव, पुणे विद्यापीठ

## – इतिहास चर्चासत्र –

उद्घाटन-




प्रा. ए.एस. किणिंगे प्रास्ताविक करताना - समवेत डॉ. चिटणीस
माजी प्राचार्य कदम, उपप्राचार्य डॉ. सुर्वे

समारोप-




प्रा. डॉ. कृ.ना. चिटणीस समारोप व्याख्यान करतांना
समवेत प्रा. बी बी. पाटील

## महाविद्यालयाचे अंतरंग

(स्थापना - दिनांक २३ जून, १९६२)

**१. वरिष्ठ महाविद्यालय :**

**विद्यार्थी संख्या**

| | | |
|---|---|---|
| कला विद्याशाखा | - | ९०१ |
| विज्ञान विद्याशाखा | - | ४७४ |
| वाणिज्य विद्याशाखा | - | २८२ |

**पदव्युत्तर वर्ग :**

| | | |
|---|---|---|
| एम.ए. | - | ७२६ |
| एम.कॉम. | - | १७३ |
| एम.एस्सी. | - | ५८ |

**पदवी व पदविका वर्ग (व्यवस्थापन) :**

| | | |
|---|---|---|
| डी.बी.एम. | - | ४२ |
| डी.सी.एम. | - | २६ |
| एम.पी.एम. | - | २० |
| डी.टी.एल. | - | २० |
| बी.लिब. सायन्स | - | २४ |

**प्रमाणपत्र अभ्यासक्रम :**

| | | |
|---|---|---|
| इंग्रजी प्रमाणपत्र | - | ३३ |

**२. कनिष्ठ महाविद्यालय :**

| | | |
|---|---|---|
| कला विद्याशाखा | - | ७३६ |
| विज्ञान विद्याशाखा | - | ६९६ |
| वाणिज्य विद्याशाखा | - | २१९ |
| व्यावसायिक शिक्षण शाखा | - | ७२ |
| एकूण | | १७२३ |

**महाविद्यालयीन एकूण विद्यार्थी संख्या :**
(कनिष्ठ व वरिष्ठ) ४४८८

**३. प्राध्यापक व शिक्षकेतर सेवक :**

**प्राध्यापक**

| | | |
|---|---|---|
| वरिष्ठ महाविद्यालय | - | ८० |
| कनिष्ठ महाविद्यालय | - | ३९ |
| एकूण संख्या | - | ११९ |
| शिक्षकेतर सेवक संख्या | - | ६७ |

## परीक्षांचे निकाल (मार्च/एप्रिल–१९९३)

**(अ) वरिष्ठ महाविद्यालय** — विद्यापीठ परीक्षा

**पदवी वर्ग**

| | | |
|---|---|---|
| बी.ए. | - | ८१.३५% |
| बी.कॉम. | - | ७९.६०% |
| बी.एस्सी. | - | ४२.६५% |
| बी.लिब. सायन्स | - | ८५.००% |

**पदव्युत्तर वर्ग** — एम.ए./एम.एस्सी. एम.कॉम.

| | | |
|---|---|---|
| मराठी | - | ६८.७५% |
| हिंदी | - | ५०.००% |
| इंग्रजी | - | ३९.३३% |
| अर्थशास्त्र | - | ५०.००% |
| राज्यशास्त्र | - | ६२.५०% |
| इतिहास | - | ७३.८१% |
| एम.एस्सी. वनस्पतीशास्त्र | - | १००.००% |
| एम.कॉम. | - | ५३.०८% |
| इंग्रजी प्रमाणपत्र | - | ९३.००% |

**व्यवस्थापन वर्ग :**

| | | |
|---|---|---|
| डी.बी.एम. | - | ६२.०५% |
| डी.सी.एम. | - | २८.००% |
| डी.टी.एल. | - | ४५.००% |

**(ब) कनिष्ठ महाविद्यालय (उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे)** — एच.एच.सी.मार्च९३

| | | |
|---|---|---|
| कला विद्याशाखा | - | ७६.३९% |
| विज्ञान विद्याशाखा | - | ६०.३९% |
| वाणिज्य विद्याशाखा | - | ८५.९२% |

**वसतिगृह विद्यार्थी संख्या :**

| | | |
|---|---|---|
| मुलांचे वसतिगृह | - | २१० |
| मुलींचे वसतिगृह | - | १४० |

**प्राध्यापकांनी संपादन केलेल्या पदव्या :**

(१) प्रा. एच.बी. घारे-एम.फिल. (वनस्पतीशास्त्र) पुणे विद्यापीठ, पुणे.

(२) प्रा. सौ. ए.ए. पाध्ये-एम.फिल. (व्यापारशास्त्र) पुणे विद्यापीठ, पुणे.

## प्राध्यापक : नवीन नेमणुका

**वरिष्ठ महाविद्यालय :**

१. प्रा. एस.एन. गोसावी (मराठी)
२. प्रा. डॉ. एस.जे. चव्हाण (वनस्पतीशास्त्र)
३. प्रा. व्ही.आर. सुरवडे (व्यापारशास्त्र)
४. प्रा. कु. आय.बी. पोतदार (सूक्ष्मजीवशास्त्र)

**कनिष्ठ महाविद्यालय :**

१. प्रा. कु. एस.व्ही. महापुरे (रसायनशास्त्र)
२. प्रा. ए.के. खोत (पदार्थविज्ञान)
३. प्रा. जी.एम. जगताप (इतिहास)
४. प्रा. जी.के. ढोबळे (भूगोल)
५. प्रा. आर.बी. निरगुडे (इलेक्ट्रॉनिक्स)

**प्राध्यापकांचा सहभाग : इतर विशेष :**

**प्रा. तुकाराम सावंत** : (इंग्रजी)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Academic Staff Orientation Source, under U.G.C. Scheme, Poona University. Refresher Course in English, Saurashtra University, Rajkot (Gujrat)

**प्रा. प्रदिप पाटील** (इंग्रजी)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher Course in English. Saurashtra University, Rajkot. All India English Teachers' Conference.

**प्रा. बजरंग सरवदे** (इंग्रजी)
पदविका संपाद : Post Graduate Diploma in Teaching of English at Central Institute of English and Foreign language, Hyderabad.

**प्रा. सीताराम गोसावी** (मराठी)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher Course in Marathi, Nagpur University, Nagpur.

**प्रा. डॉ. कृष्ण सुर्वे** (हिंदी)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher Course in Hindi, Marathwada Univerusity, Aurangabad.

**प्रा. आप्पासाहेब देसाई** (अर्थशास्त्र)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher Course in Economics Gokhale Institute of Economics & Politics, Univerusity of Poona, Pune.
अधिवेशन परिषद सहभाग : मराठी, अर्थशास्त्र परिषदेचे १७वे अधिवेशन नोव्हेंबर १९९३, सांगली.

**प्रा. रमेश जोशी** (अर्थशास्त्र)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher Course in Economics Gokhale Institute of Economics & Politics, University of Poona, Pune.
ओरिएंटेशन कोर्स : Academic Staff Orientation Course, University of Poona, Pune. June-July 1993.

**प्रा. विलास काकडे** (राज्यशास्त्र)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher Course in Politics, Goa University, Goa.
प्रकाशित एकांकिका : ''मानवाचा मुक्तिदाता'' ज्ञानोदय (मासिक) मंगेश मुद्रणालय, अहमदनगर.
व्याख्याने : ''धर्मनिरपेक्षता'' उंडवडी (क.प.) 'Pandit Nehru and Secularism' Goa University.
चर्चासत्रात सहभाग व शोध निबंध सादर : पुणे विद्यापीठ विद्यमाने आर.बी.एन.बी. कॉलेज, श्रीरामपूर राज्यशास्त्र विभागातर्फे आयोजित ''भारतातील घटनात्मक व राजकीय प्रक्रिया'' या विषयावरील चर्चासत्रात दहाव्या लोकसभा निवडणुकीची वैशिष्ट्ये हा शोध निबंध सादर केला. महाविद्यालयात ''लोकसंख्या आणि पर्यावरण'' चर्चासत्रात ''हवाप्रदूषण व उपाय'' हे शोध निबंध सादर केले.

**प्रा. अविनाश सावळकर** (राज्यशास्त्र)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher Course in Politics, Barhanpur University, Orisa.

**प्रा. बाबुराव माने** (मानसशास्त्र)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher Course in Psychology, Lakhano University, Punjab.

**प्रा. कारभारी जाधव** (मानसशास्त्र)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher Course in Psychology Nagpur University, Nagpur.
परिषद अधिवेशन सहभाग : ''मराठी मानसशास्त्र परिषद'', ज्ञान प्रबोधिनी, पुणे, सहभाग.
शोध निबंध : ''विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी व त्यांना परीक्षेत मिळणाऱ्या गुणांचा सहसंबंधात्मक अभ्यास'' शोध निबंध सादर केला.

**प्रा. प्रकाश पाटील** (संरक्षणशास्त्र)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher Course in Defence Studies, Alahabad University, Alahabad.

**प्रा. तुकाराम खोत** (संरक्षणशास्त्र)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher Course in Defence Studies, Alahabad University, Alahabad.

**प्रा. भास्कर जोहरापूरकर** (भूगोल)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher Course in Geography, Aligad University, Aligad.
व्याख्यान : ''लोकसंख्या शिक्षण - काळाची गरज'' मुगुटराव साहेबराव काकडे कॉलेज, सोमेश्वरनगर.
लेख : ''पक्षी जाय दिगंतरा'' भालचंद ''मासिक'', नोव्हेंबर - १९९३.

**प्रा. जयपाल मगदूम** (व्यापारशास्त्र)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher Course in Commerce, University of Poona, Pune.

**प्रा. प्रभाकर फरसोले** (व्यापारशास्त्र)
शोधनिबंध प्रकाशित : "Industrial sickness" Pointer Publisher, Jaispur, Nov. 1993.

**प्रा. अनिल इंगळे** (व्यापारशास्त्र)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher Course in Commerce, Gujarath University, Ahmadbad.

**प्रा.सौ. सुचेता जोशी** (प्राणीशास्त्र)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher Course in Zoology, Shivaji University, Kolhapur.

**प्रा. रविंद्रकुमार कुदळे** (व्यापारशास्त्र)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher Course in Life Science, Gurunanak Deo University, Amritsar.

**प्रा. डॉ. केवल जयस्वाल** (प्राणीशास्त्र)
शोधनिबंध प्रकाशित : Diurnae Rhythms of Respiration and Influence of Eyestalk ablation and Ekalas (EC-25) on Oxygen consumption of fresh water crab, Barytelphusa cunicularis.
- Journal of Eeotoxicol Environmental Monitoring Palani. (In-pvess) Jan-1994.
ओरिएंटेशन कोर्स पूर्ण : Orientation course in Zoology, Gorakhpur University, Gorakhpur, April-1993.
U.G.C. Project : Research Project sanctioned by U.G.C. for "Effects of pesticide on survival Respiration and Reproductive physiology of fresh water fish Tilapia Mossambica.

**प्रा.डॉ. सदाशिवन पिलाई** (प्राणीशास्त्र)
शोधनिबंध प्रकाशित : 1) Traditional Padian Treatments Jeevaniya, Vavsh Sharad page.9 1993.
2) 'Vaidya G. Chandrashkhar Pillat Jeevania Vavsh Sharad, page. 36 1993.
3) "Adozescpwee - Moulded childhood" Jeevaniya Vavsha - Sharad, Page-20, 1993.
4) Challenge of Hydrofluorosis, Indian Express - 21-1-1994.
5) "Fluososis - A Major Bone Disease" Jeevaniya - (Indian Express.)

**प्रा. डॉ. चंद्रशेखर मुरुमकर** (वनस्पतीशास्त्र)
ओरिएंटेशन कोर्स पूर्ण: Academic staff Orientation course, Univesity of Poona, Pune.
Refresher course in Botany, Hydrabad University, Hydrabad.

**प्रा. डॉ. शशिकांत चव्हाण** (वनस्पतीशास्त्र)
पदवी संपादन : पी.एच.डी. पुणे विद्यापीठ, पुणे. "Studies on the Liver wart flowra of Andaman I lands India. Under the Guidance Dr. D.Y. Joshi, Pune.

**प्रा. शिवाजीराव साठे** (सूक्ष्मजीवशास्त्र)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher course in Microbiology, University of Poona, Pune.

**प्रा. मारुती भगत** (गणित)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher course in Mathematics, University of Poona, Pune.

**प्रा. नंदकुमार सुबंध** (संख्याशास्त्र)
Computer Training Programe, South Gujarat University, Surat.
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher course in Statistics, Gujarath University, Ahmadabad.

**प्रा. अरुण पंढरी** (संख्याशास्त्र)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher course in Mathematics, University of Poona, Pune
प्रशिक्षण : कर्वे इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्स, पुणे. अंतिम मूल्यमापन प्रशिक्षण पुणे. पुणे जिल्हा १०० टक्के साक्षरता अभियान सक्रिय सहभाग
शिबीरात सहभाग : ''आयुक्त'' पुणे विद्यापीठ, विज्ञान लेखक शिबीरांत सहभाग.

**प्रा. अविनाश जगताप** (संख्याशास्त्र)
रिफ्रेशर व ओरिएंटेशन कोर्स पूर्ण :
Academic Staff Orientation Course, under U.G.C., University of Poona, Pune.
Refresher course in Computer application in Statistics, University of Poona, Pune

**प्रा. अशोक काळंगे** (पदार्थविज्ञान)
रिफ्रेशर ओरिएंटेशन कोर्स पूर्ण :
Academic Staff Orientation course undr U.G.C. Scheme, University of Poona, Pune.
Refresher course in Physics, University of Poona, Pune.

**प्रा. प्रकाश मेहेर** (व्यापारशास्त्र)
आरिएंटेशन कोर्स पूर्ण: Academic Staff Orientation course under U.G.C., Scheme, University of Poona, Pune

**प्रा. आप्पासाहेब भगाटे** (भूगोल)
व्याख्यान : ''पर्यावरण व भूगोल' या विषयांवर भूगोल दिनानिमित्त व्याख्यान एम.ई.एस.हायस्कूल, बारामती.

**प्रा. शिवाजी गावडे** (पदार्थविज्ञान)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : पी.एच.डी. पुणे विद्यापीठ, पुणे. Refresher course in Physics, University of Poona, Pune.

**प्रा. मारुती कोकरे** (पदार्थविज्ञान)
रिफ्रेशर कार्स पूर्ण : Refresher course in Physics, University of Poona, Pune.

**प्रा. डॉ. सुभाष देवकुळे** (वनस्पतीशास्त्र)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher course in Botany, Hyderabad University, Hyderabad.

**प्रा. सौ. नीलम पाटील** (वनस्पतीशास्त्र)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher course in Botany, Botany Department, Science Institute, Bombay.

**प्रा. मानसिंगराव गोडसे** (भूगोल)
रिफ्रेशर कोर्स पूर्ण : Refresher course in Geography, Muslim University, Aligad.

**प्रा. सुरेश पाटील** (ग्रंथपाल)
कार्यशाळेत सहभाग : ब्रिटीश हायकमिशन, ब्रिटीश कौन्सिल डिव्हीजन, मुंबई यांचे वतीने 'ग्रंथालय व माहितीशास्त्र' विभाग, पुणे विद्यापीठ येथे आयोजित Managing a Quality Service in an Academic Library या कार्यशाळेत सहभाग.

◆ ◆ ◆

## महाविद्यालयात संपन्न झालेले कार्यक्रम – समारंभ

**महाविद्यालय वर्धापन दिन :**

महाविद्यालयाचा ३१ वा वर्धापन दिन दिनांक २३ जून १९९३ रोजी प्रख्यात चिकित्सक मा. डॉ. कल्याण गंगवाल, पुणे या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत व अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. श्रीमान जंबुकुमार चंदुलाल शहा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

**संयुक्त कर्मवीर जयंती :**

कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांची ''कर्मवीर जयंती'' दि. २२ सप्टेंबर रोजी बारामती परिसरातील सर्व शैक्षणिक संस्थेतर्फे संयुक्तपणे साजरी केली. कर्मवीर जयंती समारंभाचे प्रमुख पाहुणे मा. डॉ. एम.डी. नलावडे, कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे हे उपस्थित होते.

**शिक्षक दिन :**

''शिक्षक दिन'' निमित्त दि. ८ सप्टेंबर १९९३ रोजी शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्र.ल. गावडे, पुणे यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

**कविवर्य मोरोपंत वक्तृत्व व वाद स्पर्धा :**

कविवर्य मोरोपंत वक्तृत्व व वाद स्पर्धा दिनांक १८ फेब्रुवारी व १९ फेब्रुवारी १९९४ रोजी संपन्न झाला. या स्पर्धांचे उद्‌घाटन प्रमुख पाहुणे मा. श्री. बी.डी. कोळेकर, मुख्याधिकारी, बारामती नगर परिषद व समारंभाचे अध्यक्ष मा. श्री. किरण गुजर, अध्यक्ष, नटराज कलानाट्य मंडळ, बारामती हे होते. पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. विकास बारवकर, चेअरमन, बारामती तालुका खरेदी-विक्री संघ, मा. श्री. गुलाबराव ढवाण-पाटील, नगरसेवक, बारामती नगर परिषद व मा. श्री. किरण गुजर, चेअरमन, पाणीपुरवठा समिती, नगर परिषद, बारामती यांच्या मंगलहस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

### वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

**क्रीडा नैपुण्य पारितोषिक वितरण समारंभ :**

वार्षिक क्रीडा नैपुण्य पारितोषिक वितरण समारंभ दिनांक १७ फेब्रुवारी १९९४ रोजी संपन्न झाला. या समारंभाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. राम भागवत प्रसिध्द आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक्स कोच व छत्रपती पुरस्कार विजेती, राष्ट्रीय व

आंतरराष्ट्रीय व्हॉलीबॉल खेळाडू कु. हेमलता उरसळ पुणे यांच्या शुभहस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. श्रीमान जंबुकुमार चंदुलाल शहा यांनी समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविले.

**गुणवत्ता पारितोषिक वितरण समारंभ :**

वार्षिक गुणवत्ता पारितोषिक वितरण समारंभ रविवार दिनांक ६ मार्च, १९९४ रोजी प्रमुख पाहुणे मा. श्री. शिवाजीराव देशमुख, जिल्हाधिकारी, पुणे यांच्या शुभहस्ते झाला. व अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. श्री. जंबुकुमार चंदुलाल शहा हे अध्यक्षस्थानी होते.

**रक्तदान शिबीर :**

प्रजासत्ताक दिनानिमित्त महाविद्यालयात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. त्यात ८५ विद्यार्थी-प्राध्यापक-सेवकांनी रक्तदान केले.

**विवेकानंद जयंती :**

''युवक दिना''निमित्त स्वामी विवेकानंद जयंती महाविद्यालयात साजरी केली. त्यावेळी प्राचार्य डॉ. एम.एम. गांधी, उपप्राचार्य डॉ. के.एम. सुर्वे व माजी प्राचार्य प्रा. एस.पी. कदम यांनी विद्यार्थ्यांना उद्बोधक मार्गदर्शन केले.

**ऑगस्ट क्रांति सुवर्णमहोत्सव दिन संपन्न :**

दि. ८ ऑगस्ट १९९३ रोजी ऑगस्ट क्रांति सुवर्णमहोत्सव दिनानिमित्त प्रमुख वक्ते म्हणून जेष्ठ क्रांतिकारक व स्वातंत्र्य सैनिक मा. श्री. जगन्नाथराव कोकरे व अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे सचिव, जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक मा. डॉ. वर्धमान माणिकचंद कोठारी होते. त्या प्रसंगी माजी प्राचार्य एस.पी. कदम व प्रा. ए.एस. किणिंगे यांनीही आपले विचार व्यक्त केले.

**राष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रीय सेवा योजनेचे राष्ट्रीय एकात्मता/प्रजासत्ताक दिन संचलन निवड शिबिर संपन्न:**

राष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रीय सेवा योजनेचे राष्ट्रीय एकात्मता व प्रजासत्ताक दिन संचलन निवड शिबीराचे आयोजन पुणे विद्यापीठ व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने दि. २३ नोव्हेंबर ते २ डिसेंबर १९९३ या काळात केले होते. या शिबिराचे उद्घाटन मा. श्री. प्रभाकर धारकर, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांच्या हस्ते झाला व समारोप मा. श्री. लखनपाल, शिक्षण सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते झाला.

**चर्चासत्रे संपन्न :**

**इंग्रजी विभाग चर्चासत्र** - पुणे विद्यापीठाच्या विद्यमाने इंग्रजी विभागाचे चर्चासत्र शनिवार दि. २६/३/९३ रोजी या "Absurdism in Literature" या विषयावर झाले. चर्चासत्राचे उद्घाटन मा. डॉ. प्रशांत सिन्हा, इंग्रजी विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ यांच्या हस्ते व समारोप मा. डॉ. सी. जे. जहागिरदार, इंग्रजी विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या हस्ते झाले.

**इतिहास विभाग चर्चासत्र :**

पुणे विद्यापीठाच्या विद्यमाने इतिहास विभागाचे चर्चासत्र मंगळवार दि. २९/३/९३ रोजी ''विसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारणा चळवळ'' या विषयावर झाले. या चर्चासत्रास माजी इतिहासप्रमुख, पुणे विद्यापीठ, डॉ. चिटणीस के. एन., प्राचार्य डॉ. एम.एम. गांधी यांनी चर्चासत्राचे उद्घाटन केले. हे विषयतज्ञ म्हणून उपस्थित होते.

• • •


हार्दिक शुभेच्छा!

सर्व प्रकारच्या हिंदी पुस्तकांसाठी पाठ्य, संदर्भ, जनरल व गाईड साठी संपर्क साधावा

**श्री गणेश बुक सेंटर**

आरु चाळ, पौड फाटा, पुणे-४११ ०३८. फोन : ३३२७१७


# मराठीचे वैभव : संत ज्ञानेश्वर


कु. संगीता पाटणे, व्दितीय वर्ष-कला




ज्ञानियांच्या राजियानी माय मराठीच्या मुलुखात ब्रह्मविद्येचा सुकाळ केला. मराठीला तिच्या बाल्यावस्थेत ''भावार्थ दीपिकेचा ज्ञानप्रकाश'' लाभला. अनुभवाच्या अमृताचे चिरंतन सिंचन या भूमीवर झाले आहे. इथली माती भक्तिरसाने चिंब भिजून गेली आहे. अव्याहत भिजत आहे आणि राहील. भागवत धर्माचे बीज पेरले गेले. त्यामुळे येथे संतांच्या अभंग-ओव्यांचे मळे बहरत राहिले आहेत. या साऱ्याची प्रेरणा आणि चेतना आहे ज्ञानेश्वर माऊली. महाराष्ट्राचे क्षात्रधर्माचे दोन प्रतिनिधी संसदेत पाठवायचे झाले तर एक आहेत छत्रपती शिवाजी महाराज व दुसरे संत ज्ञानेश्वर.

ज्ञानेश्वरांनी ''परतत्त्व स्पर्शू'' झालेल्या काव्याचे इवलेसे लावलेले रोप मराठीच्या मांडवावर त्याचा वेलू पसरला आहे आणि साहित्यरसाच्या कळचा वेचाय्यात तो नव्या नव्या कळ्यांना बहर येत आहे. मराठी साहित्य साम्राज्याचे अनभिषिक्त राजे आहेत. ज्ञानेश्वर मराठी साहित्यपीठाचे पहिले-वहिले कुलगुरु आहेत.

महाराष्ट्र भूमीमध्ये सामान्यजन जेव्हा अध्यात्मविद्येच्या बाबतीत अंधारात चाचपडत होते, ज्ञान व संस्कृतच्या तिजोरीत अडकून पडले होते तेव्हा ज्ञानवंचित लोकांच्या जीवनात नवा प्रकाश उधळीत एक ज्ञानेश्वर मूर्तिमंत तापहीन म्हणून मराठी क्षितीजावर आले. त्यांनी संस्कृतची गहन तीरे तोडून मराठीचा सुंदर सुलभधार असाध्य गंगास्नानासाठी घाट बांधला. त्यामुळे महाराष्ट्रात अध्यात्मिक लोकशाहीची बीजधारणा झाली. त्यामुळेच महाराष्ट्रातील अठरापगड जातीतून चालत्या-बोलत्या ''चिंतामणी संतांचे पीक'' बहरून आले. त्यामध्ये चोखा महार होता, नामदेव शिंपी होता, गोरा कुंभार होता, नरहरी सोनार होता, कान्होपात्रा होती, सखू होती, बहिणाबाई होती. याच पेरणीमुळे एकोणिसाव्या शतकात ज्योतिबा फुले, आगरकर, रानडे यांनी सामाजिक समतेचे मंदिर उभारले. याला अनुकूल भूमी ज्ञानेश्वरांनी केली होती. हे कोण नाकारु शकेल? आज महाराष्ट्र इतर प्रांतांपेक्षा पुरोगामी आहे. याचे श्रेय भिमेच्या वाळवंटी नाचणाऱ्या वारकऱ्यांच्या पाऊलांच्या ठशांना आहे. आजही आळंदी-देहूच्या दिंड्या पंढरीच्या वाटेने भगवी पताका समतेचा ध्वज उंच फडकावीत चाललेल्या असतात. ह्या पताका वैष्णवाचा धर्म सांगत नाहीत काय? प्रादेशिक भाषातून संस्कृत वाङ्मय आणण्याचा प्रवास मध्ययुगात सुरु झाला. ते ''मराठी बोलेन'' जग मोदे नाचवीत. आनंदाचा असा सार्थ अभिमान बाळगून नव्या वाटा चोखाळणाऱ्या संस्कृत पंडितांचा प्रखर विरोध झाला. देवभाषा सोडून लोकभाषेत अध्यात्म सांगणे वा लिहिणे म्हणजे ''अधर्म-अहो-पापम्-महत-पापम'' वाटत होते. देव सर्वात्मा आहे. तो ह्दयाची भाषा समजू शकतो. तेथ मी साने थोर न म्हणे. आम्ही भावाचे पाहुणे भलतेया हा विचार नाकारुन विश्वाच्या देवाला स्वार्थाच्या कोंडीत ठेवणारा पुरोहित वर्ग समाजाची अवहेलना करीत होता.

संस्कृत केवळ देवाची भाषा आणि इतर भाषा जणू चोरांच्या भाषा असा संकुचित वाद फोफावला होता. अशा वेळी इथे मराठीचिये नगरी ज्ञानदेवांनी भावार्थ दीपिकेच्या रुपाने बंडाचा झेंडा उभा केला व पहिले बंडखोर संत ठरले.

या विश्वावर करुणा करणाऱ्या व सर्व जीवांच्या हितासाठी तळमळणाऱ्या ज्ञानेशांचे ठायी मराठीच्या गौरवाचा कविवर्य 'बी' यांना सार्थ आत्मविश्वास होता. ज्ञानेश्वरांना आत्मप्रत्ययाच्या सामर्थ्याने सांगितले, 'माझा मऱ्हाठीचा बोलू कवतिके परि अमृताते पेजा जिंके, ऐसी अक्षरे रसिके मेळवीन' खऱ्या

अर्थाने त्यांनी शब्दसामर्थ्याचे प्रत्यंतर आपल्या ओवीतून प्रकट केले. एवढेसे ते सूर्यबिंब ते काय पण विश्वाला प्रकाशित करण्याचे सामर्थ्य त्याच्या ठायी असते. तसेच शब्दात अमोल सामर्थ्य आहे. त्यामुळे शब्द श्रवणेंद्रियाचा विषय असूनही त्यांनी साऱ्या इंद्रियामध्ये जणू कळंभा लावून दिला आहे.

रस-स्पर्श-रुप-गंध यांच्या माधुर्याने अवतरणाऱ्या शब्दाच्या ग्रहणासाठी सारी इंद्रिये एकमेकाशी स्पर्धा करु लागतात असे ज्ञानेश्वरांचे शब्द सामर्थ्य आहे, शब्द कला आहेत.

अध्यात्म प्रमेयाची उदयाने फुलवण्याचे बळ त्यांच्या शब्दात आहे. ज्ञानेश्वरांच्या दिव्य स्पर्शाने मराठी भाषा जणू दिव्य अमृतवाणी बनली आहे. सागराहून खोल सखोल अर्थभरीन असे मऱ्हाठी बोल नाना रसांनी भरले आहेत. परंतु-

''शृंगाराशिरी पाय ठेऊनी करी भक्ती जिथे नाति।'' असे शांतरसाचे सामर्थ्य ज्ञानेश्वरांनी प्रकट केले आहे.

नमितो योगी थोर विरागी तत्त्वज्ञानीरुप संत
तो सत्कविवर परात्पर गुरु ज्ञानदेव भगवंत।

-स्वामी स्वरुपानंद

ज्ञानेशाचे ठायी साक्षात्कारी संत, तत्वज्ञ, कवि या साऱ्या भूमिका एकवटल्या होत्या. एका अर्थाने, ''ज्ञानेश्वरी'' गीतेवरचे भाष्य आहे. पण अमृतानुभवाप्रमाणे ज्ञानेश्वरीलासुध्दा song of myself असे म्हणता येईल. कारण ते कोरडे तत्त्वचिंतक नाहीत, त्याचा अनुभव भावाचाराच्या रुपाने साकार झाला आहे. ज्ञानदेवाचा ''अमृतानुभव'' हा त्यांच्या सिध्दावस्थेतील आत्मप्रत्ययाचा चिद्विलास आहे. नाथसंप्रदायी ज्ञानेश्वर ''अमृतानुभावी'' ते दिसतात. ज्ञानेश्वरीत नाथसंप्रदाय व भागवत धर्म समरस झाले आहेत. चांगदेव पासष्ठीच्या छोट्या प्रकरणात विश्व ही बह्माची प्रभा आहे. हा अव्दैताचा विचार येतो. त्यांच्या अभंगातून, विराण्यातून त्यांचे भाव फुलून येतात. 'पैल कोकणाऱ्या काऊला'', ''पंढरीराऊ'' कधी भेटणार हा ''शकून'' विचारतात.

'अवचित परिमळू झुळकला वो मायो' यामध्ये गोपाळाच्या भेटीची आर्तता आहे. त्याच्या भेटीबरोबरच ''दर्पणी पाहता'' आपले रुप न दिसण्याचा चमत्कार ''अव्दैताचा'' अनुभव सांगतो. देवाच्या विरहाने चंदनाची चोळी अंगअंग जाळीचा विरह दाह जाणवतो. तर त्याच्या प्रत्ययाबरोबर सोनियाचा दिनू उगवतो, अमृताचा घनु बरसतो. सबाह्य अंतरी हरीचा प्रत्यय येतो.

ज्ञानेश्वरीची सारी काव्यसृष्टी अलौकिकाच्या स्पर्शाने भरलेली आहे. ज्ञान, भक्ति व कर्म हे तिन्ही योगांचा त्रिवेणी संगम त्यात आहे. राजयोगाचे विभ्रम सहाव्या अध्यायात प्रकटले आहे. अकराव्यात ''शांताचिये घरा अद्भुत रस पाहुणेरा'' येतो. नवव्या अध्यायात भक्तिगंगा दुथडी भरुन वाहते. साऱ्या ओव्या, सारे अध्याय एकाच दिव्य रसायनाने भरलेले आहेत.

शंकराचार्यांची गीता, वेदान्त भाष्ये, तर्कपूर्ण तितकीच त्यांची स्तोत्रे भावमधुर ज्ञानेश्वरांच्या तत्त्वसृष्टीत ''सगुण व निर्गुण गोविंदुरेचा'' भाव आहे. सारे तत्त्वज्ञान त्यांच्या अलौकिक प्रतिभेच्या स्पर्शाने भावरम्य व भावमधुर झाले आहे. साहित्य आणि शांती एकरुप झाली आहे.

एखादी लावण्यवती स्त्री गुण व शीलाने संपन्न अशी पतिव्रता असावी. सहज वाहणाऱ्या मंद मलयगिरीतून येणाऱ्या चंदनगंधी वाऱ्याला अमृताची चव आणि नादसौंदर्य दैवगतीने प्राप्त व्हावे त्याप्रमाणे भावदीपिकेच्या श्रवणानेच आनंद लाभेल पण सहजपणे त्रिविध तापमय संसारदुःखाचा सहजपणे निरस होईल असे सामर्थ्य आहे.

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या पूर्णोद्गाराचे वेळी मागितलेले ''पसायदान'' हे जागतिक वाङ्मयात श्रेष्ठ ठरावे असे एक अक्षर-लेणे आहे. सर्व प्रकारच्या भेदांना तिलांजली देऊन विश्वाच्या एकमेव काव्यरुप तत्त्वाला। परमेश्वराला मागितलेले पसायदान अप्रतिम आहे. त्यामध्ये सर्व जीवाच्या कल्याणासाठी प्रार्थना आहे. आणि त्यात विश्वात्मक दृष्टी आहे.

दुरितांचे तिमिर जावो। विश्वस्वधर्म सूर्ये पाहो।
जो जे वांच्छिल तो ते लाहो प्राणिजात।।

मानवी जीवनाच्या प्रारंभापासून मानवजातीने ज्यासाठी धडपड केली, वैदिक ऋषींच्या प्रार्थनेचा जो विषय होता. ज्यामध्ये सर्वांच्या कल्याणाची कळकळ आहे.अशा ''तमसो मा ज्योतिर्गमय'' प्रार्थनेचे व्यापक मराठी



अवतरण म्हणजे वरील ओवी. धर्मप्रकाशात वावरताना जे-जे योग्य ते मागताच मिळावे. यापेक्षा व्यापक मागणे ते काय? यामध्ये मानवाच्या नव्हे प्राणी जातीच्या कल्याणाची कळकळ आहे. साम्राज्य येतात व जातात, इतिहास बदलतो. नवनवी स्थित्यंतरे होतात. पण जे चिरंतन आहे त्याचा शोध व बोध राहील. ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी ज्यामुळे मराठी भाषा इतरांनाही पहावी लागेल. व ती या संजीवनाने अमर राहील. म्हणून कोणत्याही भौतिक वैभवापेक्षा मराठीचे अक्षय व अखंड वैभव आहे. ज्ञानेश्वर व त्यांचे साहित्य यांनी मराठी संस्कृतीचा भागवत धर्माचा पाया घातला आहे.

मराठी संस्कृतीचे देवालय उभे केले आहे. जे दुरुनही पाहणाऱ्यास वेधून घेईल. ब्रह्मलीन श्रीमत सत्यदेवानंद सरस्वती स्वामी यांच्या शब्दात आपणही अभिमानाने म्हणू शकतो-

जन्म मराठी ग्रंथ मराठी
भाग्यची अपुले थोर
ज्ञानेश्वरांच्या ज्ञानधनाचे आपण वारसदार
राहू नको क्षण एक दूरी
आळस टाकूनि ब्रह्म सावरी
व्दारिच गंगा ये ज्ञानेश्वरी।।

आणि ज्ञानेश्वरांविषयी त्यांच्याच शब्दात सांगायचे तर-

का पन्हरे या रजतवणी
तैसी स्तुतीची बोलणी-
उगेयाचि माथा ठेविले चरणी।
हेचि भले।।

''ओवी ज्ञानेश्वरांची'' अशी ज्ञानेश्वरांच्या ओवीची महती आहे. त्यांच्या ओव्यातून उपमा, दृष्टांताचे भांडार उघडले आणि गूढ प्रमेये मधुर द्राक्षासारखी लागतात. ज्ञानेश्वरांची ही काव्यमय विषय मांडण्याची ''हातवरी'' अनुपमेय आहे.

◆◆◆

## मावळती

माझेही एकेकाळी आयुष्य फुलांचे होते.
डोळ्यात निळी स्वप्ने अन झोळीत चांदणे होते.
हे वादळ वैफल्याचे कोठून अचानक आले?
बहरल्या ऋतूंची झाडे आपसूक हलवून गेले.
चोचीत सुखाचे दाणे... ते दिवस सुगीचे होते
वाटेवर कैवल्याच्या हे वळण कोणते आले?
ऐलपैल बन काट्यांचे धनव्याकुळ अंबर आले.
आजन्म उरी जपलेले ते गांव भ्रमाचे होते
आता या मावळतीला सुख दुःख कोणते सांगू?
ढासळत्या क्षितिज कडांना मी काय दिलासा मागू?
सोडून चाललो येथे ते गीत जगाचे होते...

◆ **पाडुळे टी.डी.**, द्वितीय वर्ष कला

## कोणासाठी?


सांजवेळी मना पडे कशी भूल
चांदण्याची हूल कोणासाठी?

मनातला रंग जणू की बेरंग
आसवांचा पूर कोणासाठी?

आसवांची माया जिला नसे काया
मोतीयाची झूलं कोणासाठी?

प्राणासाठी आण नभ वेडे व्याकुळ
असा तो प्राण कोणासाठी?

◆ **दीपक कांबळे**, १२ वी कला



# मोरोपंतांच्या काव्यरचनेतील केकावलीचे स्थान

कु. प्रगती भापकर, तृतीय वर्ष-कला

''श्री मन्मयूर कवीची देते
संतोष मानव कविता।
असता जरि भूमीवरी सुरगुरु
तरि तोहि मान वाकविता।''
बा-राम-तीत-आहे म्हणवुनी
तीते बारामती असे नाव।
तीत वसे तो मोरोपंत
भवाब्धीत जीच नवनांव।''

१९९४ या वर्षी पंतांची दोनशेवी पुण्यतिथी. त्यामुळे पंतांच्या असाधारण व अतुलनीय कार्याची प्रकर्षाने जाणीव होते. पंतांच्या काव्याभासाने पंतांची सोज्वळ प्रतिमा व अद्भुत प्रतिमा डोळ्यासमोर उभी राहते. मोरोपंतांच्या कालखंडात महाराष्ट्रात भक्तीबळ, युक्तीबळ व शक्तीबळ ही तीनहि बळे एकवटल्याने महाराष्ट्र हा पूर्ण भारतखंडाचे चक्रवर्तीत्व संपादंण्यास लागल्याचा भास त्या काळी सर्व जाणत्यास होऊ लागला होता.

पंतकविता रत्नात काही बुडया मारून माझ्या हाती जी दिव्य रत्ने लागली ती माझ्या वाचकांना दाखविण्याचा माझा मनोदय आहे व पंतकाव्याभासाने मला जो परमानंद मिळाला तो माझ्या वाचकांनाही मिळावा अशी एक उत्कंठा झाल्याने मी माझे विचार आपल्यासमोर प्रांजळ बुध्दीने व्यक्त करणार आहे. मोरोपंतांना उपजतच काव्यशक्ती होती. संतकवीला लागणारे गुण बिजरुपाने त्यांच्यात जन्मत: होते हे जरी खरे असले तरी त्यांच्या अचाट उदद्योगामुळे उत्कर्ष पावले.

पंतांची एकूण कविता व अनुपलब्ध काव्य विचारात घेतली तर सर्व मिळून त्यांनी पाऊण लाख कविता लिहिल्या. अशा प्रचंड कार्याने पंतांनी महाराष्ट्र भाषेवर व महाराष्ट्रातील जनतेवर चिरस्मरणीय उपकार करुन ठेवले आहेत. पंतांच्या सर्व काव्यात अत्यंत प्रसिध्द व उत्कृष्ट असे काव्य म्हणजे ''केकावली''.

रामाला त्यांनी या केकावलीने आळविल्यामुळे या केकाची अगोदरच राम-भक्त म्हणून प्रसिध्दी झाली होती. ''केका'' म्हणजे मयुराची आणि त्याच्या अवली (पंक्ती) ज्या ग्रंथात आहेत त्या ग्रंथाचे नांव केकावली. ''मयुर'' हा केकी व त्याचा टाहो ती ''केका''.

पंतांचा स्तोत्र कलाप पाहिला म्हणजे पंतांच्या स्वोद्धाराविषयी आतुर झालेल्या अंत:करणाची बरोबर ओळख पटते व ती पटली आणि पंतांच्या कवितेचे एकंदर स्वरुप लक्षात आले म्हणजे केकावलीत मयुराचा टाहो हा अंत:करण कपाट फोडून कसा बाहेर पडतो आहे हे बरोबर समजते.

केकावली हे काव्य आहे व स्तोत्रही आहे, हे अप्रतिम काव्य आहे व अतिप्रेमळ स्तोत्र आहे. यात पंतांच्या बुध्दिशक्तीचा पूर्णपणे विकास झालेला आहे. तर त्यांच्या अंत:करण वृत्तीचाही पूर्ण प्रकाश पडलेला आहे. यात पंतांची विद्वत्ता व मुमुक्षा, कवित्व आणि भक्ती, बुध्दीवैभव आणि प्रेम, देवाविषयी लडिवाळपणा आणि भय यांचे समसमान आणि म्हणूनच अत्यंत मधुर असे मिश्रण झालेले आहे.

केकावली हे उत्तम प्रकारचे ध्वनीकाव्य आहे. ती परिणत प्रज्ञाची वाणी आहे. प्रेम, प्रतिभा व प्रसाद हे तिच्यात अत्यंत परिपूर्ण भरलेले आहेत. ''केकावली''त जरी एका विशिष्ट देवतेचे वर्णन केले नसले तरी रामकृष्णादिकांचा पूर्ण अभेदभावून पंतांनी जगज्जनकाचे हे स्तोत्र गायिले आहे.

पंत शके १७१२ नंतर व शके १७१६ च्या पौर्णिमेस वैकुंठवासी झाले. तत्पूर्वी म्हणजे काशी यात्रेहून परत आल्यानंतर त्यांनीही केकावली



रचली असली पाहिजे कारण,

मला निरखिता भवच्चरण कन्यका आपगा।
म्हणे अगदी एकलेही न कधी असे पापगा।

असे दहाव्या केकेच्या पूर्वार्धात म्हटले आहे. गंगेने मला निरखिले या म्हणण्यातच आपण काशीयात्रेहून परत आलो आहोत असे पंतांनी सुचविलेले आहे. कारण पंत काशीयात्रेस १७१० च्या कार्तिकात निघाले व शके १७१२ ची बरसात सुरु होण्यापूर्वी परत आले.

केकावली हे दयामृतघनाची स्वोद्धारार्थ याचना करण्यासाठी गायलेले करुणास्तोत्र आहे. भाषा प्रौढी व अर्थगौरव हे गुण साधुन या साऱ्या स्तोत्रात विलक्षण साधेपणा व प्रसाद ओतला आहे. याचा अर्थ गोड व भाषा प्रासादिक असल्याने हे स्तोत्र अत्यंत लोकप्रिय झालेले आहे.

पंतांचे लक्ष प्रथमच प्रभुपदाकडे गेल्यामुळे पहिल्या १५ श्लोकात प्रभुपदाचीच प्रार्थना केलेली आहे. पंत २४ ते २७ या श्लोकात म्हणतात, "मला रंकाला तुमची स्तुती करण्याचे ठाऊक नाही, लेकराला प्रथमच कसे नीट येईल?"

ही केका ध्वनीकाव्याचे अतिउत्कृष्ट उदाहरण आहे. यापुढील सात कविता सुतात समर्थनाचा विधि पंतांनी मोठ्या युक्तीने उरकून घेतला आहे. विषयवासनेचे महत्व व प्रपंचप्रिमिचे दुर्मिसारत्व ते ५२-५४ या केकामध्ये सांगतात तर विषय वासनारुपी खरीचा भगवंतानी कृपेने स्वत: वध केल्याशिवाय आपली तिच्या झपाट्यातून मुक्तता होणे कठीण आहे असे ते स्पष्ट करतात.

प्रभुत्व तरि हेच की करुनि दे कृपादान ते
स्वसाम्य यदुपार्जन्ये मिरविजे स्वपादानते।
प्रसादमग काय तो जरी निवारिना लाघवा
कसे दशमुखानुजा विसरला अहो राघवा।।

या केकेत प्रभुत्व व प्रसाद या शब्दांच्या व्याख्या अत्यंत व्यापक व सुरेख केलेल्या आहेत. आपल्या दासावर त्यांची योग्यता नसताना त्याच्यावर कृपा करुन त्याला आपल्या पायरीला आणणारा तो प्रभु व लाघव निवारण होणे हा प्रसाद. ७५-१०० यापुढील २५ केकात पंतांनी भगवंताच्या दयाशिलतेचे अत्यंत प्रेमाने वर्णन केले आहे. देव भक्ताचा छळ करतो तो त्यांच्या कल्याणासाठीच हे तत्व पंतांनी या ठिकाणी मोठ्या ह्दयंगम रीतीने व्यक्त करुन दाखविले आहे.

भगवंताच्या दयाळुपणाचे तत्त्व याप्रमाणे उघड करुन दाखविल्यानंतर पंतांनी राम व कृष्ण या अवतारातील काही कथाभागांचे देवास स्मरण दिले आहे. बळीप्रमाणे माझा छळ करु नका, छळ न करीता दया करा असे पंतांनी ७६-७९ या केकांत म्हटले आहे. मी जसा आहे तसा मला पदरात घ्या असे पुढे ८५ ते ८७ या केकांत पंत पुढे म्हणतात.

पंतांनी केकावलीस भगवतपदापासून प्रारंभ केला व ते सत्संगावर येऊन ठेपले म्हणजेच भगवतपदप्राप्ती हे साध्य व सत्संग हे साधन होय. पंतांनी केकावलीच्या शेवटी ''सुसंगती सदा घडो, सुजन वाक्य कानी पडो'' याप्रमाणे देवाजवळ पसायदान मागितले आहे. यशोदा पांडुरंगी टीका पाहून मालाकार प्रथम केकावलीला व नंतर पंत कवितावधुला पाहून मोहून गेले. अहो, जो-जो केकावलीकडे एकवार पाहिले तो-तो तिच्यावर लुब्ध होऊनच जाईल.

केकावली म्हणजे सर्व सुमधुर गुणांचा सुवर्ण-संगमच होय. यात ह्दयाची आर्तता आहे पण ती कर्कश होण्यापर्यंत ताणलेली नाही, यात कल्पनाविलास आहे पण त्याला भावनेवर कुरघोडी करू दिली नाही, यात देवाविषयी लीला कथा आहेत पण पाल्हाळ कोठेही नाही, तसेच यात देवाविषयी संनीग्धता, लडिवाळपणा आहे पण अतिप्रसंग कोठेही नाही.


म्हणूनच जोपर्यंत आमच्या सरस्वतीप्रिय मयुराचा टाहो हजारो महाराष्ट्रजनांच्या ह्दयास भिडून जात आहे. जोपर्यंत त्याचा सारा पिसारा उभारलेला पाहून हजारो रसिकजनांची ह्दये त्याच्या अप्रतिम वैचित्याने चकित होऊन जात आहेत व जोपर्यंत त्या मेघदर्शनजनित हर्षभरात नृत्य करणाऱ्या वाग्देवीच्या नुपुरांचा मंजुळ रव रसिकजनांस त्यांच्या कर्णाची धन्यता वाढवित आहे तोपर्यंत कितीही मुल्ला साहेबांनी किंवा रावसाहेबांनी या केकावलीविरुध्द आपल्या प्रतिकूल प्रतिक्रिया उमटविल्या तरीही आम्हांस त्याबाबत तिळमात्रही शंका बाळगावयास नको. शेवटी म्हणूनच पंतांच्या कृपेने मी असे सांगू इच्छितो की-

''बारामतीहुनी तुम्ही, घेऊन जाहो, प्रसाद आर्यांचा।
ज्यांची गोडी कळता, धाक न वाटे कृतांतदूतांचा।।

◆ ◆ ◆

# अशी आमची सहल

**कु. स्वाती करमरकर, कु. कल्पना मिस्त्री, कु. वर्षा मगदूम, कु. राणी झगडे, कु. रुपाली दोशी,** सर्व व्दितीय वर्ष-कला



बरेच दिवस जाणार-जाणार म्हणून कॉलेजभर गाजलेली अशी ही आमची ट्रिप. ट्रिपला तर जायचंच! पण कोठे? भीमाशंकर की माथेरान, गणपती-पुळे की औरंगाबाद? पण अखेर एकमत झाले व आमची ट्रिप भीमाशंकर-शिवनेरी-लेण्याद्रीला जाण्याचे निश्चित झाले. पाच तारखेला रात्री साडे बारा वाजता आम्ही बारामतीहून जाण्यास निघालो. त्या आधी बारामतीच्या भिगवण चौकात जमून ट्रिपमध्ये कशी मजा करायची, कसा गोंधळ करायचा याचे प्लॅन आखले. आम्ही बसमध्ये बसलो आणि मुलांनी जोरात टेप लावला. ट्रिपमध्ये जल्लोषाचे वातावरण सुरु झाले. गाणी, नाच यांना सुरुवात झाली. खरं तर ती वेळ झोपेची पण मुलांवर त्याचा काडीमात्र परिणाम झालेला नव्हता. मुली मात्र एक एक करुन पेंगू लागल्या. गाणी, टेप, नाच यात वेळ कसा गेला ते न कळते तोपर्यंत सकाळचे पावणे सहा वाजले व आम्ही जुन्नरच्या बसस्थानकावर पोहोचलो. पुढे शिवनेरीचा किल्ला अंधुकमय प्रकाशात दिसत होता. आम्ही सर्वांनी कॅन्टीनमध्ये चहा घेतला व चहामुळे सर्वांच्याच जान में जान आ गयी और वही से हमारा शोर-शराबा पानी के असली (इन्जॉयमेन्ट) शुरु हो गया।

अशाच गोंधळात आम्ही लेण्याद्रीला येऊन पोहोचला. वर पाहतो तर लेण्याद्रीचे गुंफा मंदिर आम्हांस चढण्यास आव्हान देत होते. सूर्य उगवत होता आणि मावळ्यांच्या जोषात मावळ खोऱ्यात लेण्याद्रीच्या मंदिरात आम्ही दहा-पंधरा मिनिटात हजेरी लावली. कुणी अनामिक कलाकारांनी त्या पत्थरात कोरीव काम करुन हे लेणे घडवले आहे. पण कोणत्या कारणांसाठी त्यांनी हे काम अर्ध्यावर सोडले हे मात्र कळण्यास मार्ग नव्हता. अष्टविनायकापैकी गिरीजावल्लभ दर्शन घेऊन आम्ही फोटोस पोज देत बसपर्यंत आलो. लोक (ठराविक) आधी पोटोबा मग विठोबा करतात. पण आम्ही मात्र आधी विठोबा (गणपती दर्शन) मग पोटोबा केला. भरपूर फराळाचे पदार्थ आणि फळ बागायतदार मुलांनी आणलेल्या फळांवर तर आम्ही ताव मारला. आता आम्ही निघालो होतो महाराष्ट्राच्या छत्रपतींच्या जन्मस्थानी शिवनेरीकडे. पुन्हा एकदा मोठा डोंगर, भरपूर पायऱ्या आम्हांस आव्हान देत होत्या. चढताना दमछाक होत होती पण किल्ला चढून जाण्याची इच्छा मात्र दुर्दम्य होती. एक एक ऐतिहासिक दरवाजे पार करत, निर्सगाच्या संगतीत, बकुळ फुलांच्या व काळ्या पत्थरांच्या संगतीत आम्ही छत्रपतींच्या जन्मस्थानी पोहोचलो. उभा हिंदुस्थान गाजवून सोडणाऱ्या आमच्या महाराष्ट्राच्या लाडक्या आराध्य दैवताच्या जन्मस्थळी, त्या मातीत, त्या स्थानी, त्या वीर भूमीवर आम्ही होतो. भोवताली मावळ खोरे पसरले होते आणि आम्ही या स्थानावरुन त्याची शोभा पहात होतो. गडाची अवस्था जरी दयनीय असली तरी शासनाने नंतर बांधलेले शिवस्मृती मंदिर चांगल्या अवस्थेत आहे. गड उतरुन आम्ही बसकडे आलो व भीमाशंकराच्या दिशेने प्रयाण केले. तोपर्यंत घड्याळात साडे-अकराचा काटा दाखवला होता. ट्रिपमध्ये वेळ कसा जातो ते कळत नाही. गाण्याच्या भेंड्या, विविध जोक यात वेळ अतिशय लहान वाटत होता. गाण्याच्या भेंड्यात मुलींकडून मुले हरली गेली व सर्व मुलींनी त्यांच्या हरण्याबद्दल चिडवून त्यांचा शेवटपर्यंत पिच्छा पुरविला. अशा चिडवाचिडवीतच भीमाशंकर आले. भोवतालच्या हिरव्या जंगलांनी मन प्रसन्न होऊ लागले. गाडीतून उतरुन सर्व डबे वगैरे घेऊन आम्ही भीमाशंकर अभयारण्यात प्रवेश केला. तेथील एका मंदिरापाशी आम्ही डबे खाल्ले. ताजेतवाने झालो आणि भीमाशंकरच्या जंगलात मुक्तपणे निर्सगाच्या सहवासात भटकण्यास सुरुवात केली. शहरात राहणाऱ्यांना खरोखरच्या जंगलात फिरण्यास मिळणे म्हणजे परमानंदच होय.



वाट अवघड होती. कडे-कपारीतून, खाच-खळग्यातून, पानांची सळसळ ऐकत आणि झाडांच्या पारंब्या व खोडांचा आधार घेत आम्ही तो डोंगर चढलो. मनात वर जाण्याची जिद्द होती व ती तरुण रक्ताला शोभणारीच होती. जेंव्हा आम्ही हनुमान पॉईंटवर पोहोचलो तेंव्हा आमच्यासमोर खोल दरी, जंगलानी व्यापलेले डोंगर व वर उंच निळे आकाश होते. निसर्गाच्या दिव्यपणाची प्रचिती आली व पक्षांचा किलबिलाट, दरीतील दाट धुके सर्व कांही अवर्णनीयच होते. या जंगलात जंगली जनावरे आहेत. आमच्या आधी गेलेल्या पर्यटकांनी वाघाची डरकाळी ऐकली असे सांगून आमच्यात भीती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. वाघ न दिसल्यामुळे एक तर ते खोटे असेल किंवा वाघ बारामतीच्या तुळजाराम चतुरचंदच्या शूरांना घाबरला असेल. जंगलात भटकल्यावर आम्ही भीमाशंकरच्या मंदिरात आलो. मंदिर मोठे व सुंदर आहे. तहानलेल्या सर्वांचे तेथील विहिरीतील थंड व गोड पाणी पिऊन मन अगदी तृप्त झाले. आता परतीच्या प्रवासाकडे आम्ही वळलो. सर्वांना इतक्या लवकर ट्रिप संपल्याचे दुःख वाटत होते. पाऊल उचलत नव्हते पण प्रत्येक चांगल्या गोष्टीस शेवट असतोच नाही कां? याच नियमानुसार आम्हीही परतीच्या प्रवासासाठी आमच्या बसमध्ये येऊन बसलो. रात्र झाल्यावर काहीजण पेंगत होते तर काहीजण गप्पा मारत होते. पण सर्वांच्याच मनात या ट्रिपच्या सुंदर आठवणी रेंगाळत होत्या. प्रत्येकाच्या मनात विचार होते...

"The woods are lovely, dark and deep,
But I have promises to keep,
And miles to go before I sleep,
And miles to go before I sleep"

◆ ◆ ◆

## मदर – १९९३

अपमान होऊन ही
काय मी करावं
उचलली जीभ, चतकोरी एवढी
तर भाकरी एवढं मरावं

पदर पसरुन हात जोडून
तोंड वेंगाडून माय वाड, ल्योक व्हईल
असं मी म्हणावं
पोटाच्या खळग्यासाठी
काय न्हाय त्ये करावं

उन, वारा घेऊन
पाऊस पाठीशी बांधून
वणवण मी फिरावं
झोळीतल्या तान्ह्याला
''हे जग तुझंच'' असं मी शिकवावं
त्यानं ही झोळीतले पाय
झोळीतच खोडावं

कचरा-कुंडीतला कचरा
हातानं चाचपावा,
मिळेल त्या भंगाराने
आण्या आण्याचा चंद्र मिळवावा

येणाऱ्या दिसाला
पाठीमागं ढकलावं
झाले किती कंप-भूकंप,
नशिबाच्या गाठोड्यात बांधून
ताळा आयुष्याचा करावा...
जगता जगता
जखमांचा

◆ **रवींद्र चव्हाण**
ग्रंथालय व माहिती शास्त्र




# "स्वतंत्र भारतातील तरुणांची कर्तव्ये"

श्री. शिवाजी केंगार, व्दितीय वर्ष-कला

वाऱ्याचा वेग, सूर्याचे तेज, प्रभाताची आत्मसमर्पणाची वृत्ती, विदयुल्लतेची चंचलता यांचा समन्वय म्हणजे तारुण्य. पूज्य दादा धर्माधिकारी यांनी तारुण्याची व्याख्या चांगली केली- ''तेज, तप आणि तत्परता ज्यांचे ठिकाणी प्रवेश करतात असे व्यक्तिमत्व'' अशी व्याख्या केली आहे. हे तारुण्य कधी शिवाजीयिा रुपात अवतरले तर कधी स्वामी विवेकानंदांच्या रुपात.

आजची तरुण पिढी असंतुष्ट आहे. त्यामुळे ती तरुण मंडळी विध्वसंक कार्य करते. असा आरोप नेहमीच त्याच्यावरती केला जातो. पण आत्मसंतुष्टता हे तारुण्याचे लक्षण नाहीच, ते वार्धक्याचे लक्षण आहे. तरुण हा नेहमीच असंतुष्ट असतो. नव्हे तसाच तो असला पाहिजे. मात्र ही असंतुष्टता विधायक कार्याच्या कारणी लागली पाहिजे. अध्यात्माला संस्कृत भाषेच्या भिंतीत कोंडून ठेवणाऱ्यांविरुध्द संत ज्ञानेश्वरांनी बंड केले. या असंतोषातूनच अमृतातेही पैजा जिंकणारी ज्ञानेश्वरी महाराष्ट्राच्या घराघराचे वैभव बनली. थोरल्या माधवराव पेशव्यांनी स्वराज्याचा ढासळता डोलारा सांभाळला. **मदनलाल धिंग्रा, चाफेकर बंधू, कान्हेरे** ह्यांनी त्याचप्रमाणे **सुभाषचंद्र बोस, डॉ. अरुणकुमार वैद्य** इ. नी स्वातंत्र्याच्या वेदीवर आत्मबलिदान केले.

भारत देश स्वतंत्र १९४७ साली झाला. तेव्हापासून आपल्या देशात लोकशाहीचा स्विकार केला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली ''**बहुजन सुखाय बहुजन हिताय**'' अशी भारतीय राज्यघटना अस्तित्वात आली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या चाळीस वर्षात जनता अज्ञान, अशिक्षित, अडाणी, दारिद्रय, बेकारी, गुलामगिरी यांच्या गर्तेत राहिली. यामुळे प्रत्येक व्यक्ती आपल्या हितासाठी, फायदयासाठी आपमतलबी शक्तींनी आणि व्यक्तींनी राजकीय, आर्थिक क्षेत्रात तरुणांच्या आवेशाचा उपयोग स्वार्थासाठी करुन घेतला आणि वर आजचा तरुण विध्वसंक आहे असा शिक्का मारला.

स्वतंत्र भारतातील तरुणांनी एकच धर्म मानला पाहिजे- तो म्हणजे राष्ट्रधर्म आणि एकच नाते जोडले पाहिजे- ते म्हणजे **मानवता व बंधुता.** अशा राष्ट्रधर्माची आणि मानवतेची जोपासना करणे करण्याची कर्तव्य भारतातील प्रत्येक तरुणाचे आहे. प्रत्येकाने राष्ट्राची धुरा खांदयावरती घेऊन प्रत्येक संकटांना तोंड दिले पाहिजे. सर्व तरुणांनी आपल्या राष्ट्राचा, देशाचा अभिमान राखला पाहिजे. आपल्या भारत देशात लष्कर सैनिक आपल्या देशासाठी, राष्ट्रासाठी आपल्या देशातील बंधुभावाने रक्षण करतात. ते नेहमी सज्ज असतात. जे कोणी शत्रू देशविघातक कृत्य करतो त्याला धडा शिकविणे आपल्या तरुणाचे कर्तव्य आहे. केशवसुतांनी तुतारी फुंकून दिलेला ''प्राप्तकाल हा विशाल भूधर, सुंदर लेणी तयात खोदा'' हा संदेश लक्षात ठेवून कामाला लागले पाहिजे.

आज आपल्या देशाला राजकारणापेक्षा समाजकारणाची अधिक गरज आहे. स्वराज्याचे सुराज्य करण्यासाठी तरुणांनी समाजसेवेचा वसा घ्यावा. आपल्या देशातील तरुणांनी समाजात हित घडवून आणावे. समाजातील अंधश्रध्दा, दारिद्रय, बेकारी नष्ट करण्यासाठी तरुणांनी प्रयत्न करावे अशी समाजात मोठी गरज आहे. समाजातील **अपंग, मतिमंद, रुग्ण, आदिवासी** अशा गरजू दुर्बल घटकांची सेवा करावी. अज्ञान, दारिद्रय, अंधश्रध्दा, बाल विवाह, केशवपन, इ. रुढी, चालीरिती, परंपरा, स्त्री मुक्ती चळवळ इ. क्षेत्रात यांचा समूळ नायनाट करण्यासाठी झटावे. आपल्या आर्थिक, औदयागिक, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय इ. गोष्टींची दुप्पट वेगाने प्रगती होण्यास मदत होईल. गरीब मुला-मुलींना शिक्षण घेता येईल, आपल्या



देशातील प्रत्येक तरुण काम करु लागेल, अनेकजण मोठ-मोठे उदयोग, व्यापार काढतील, त्यामुळे आपल्या देशातील तरुणांवर कर्तव्याची जबाबदारी पडेल. अनेक तरुण मंडळी स्वत:च्या पायावरती उभी राहतील. आपल्या घरातील आई-वडील, घरातील लहानथोर मंडळी, आपले देश, राष्ट्र इ. गोष्टींचा भार या तरुणांवरती असलेल्या क्षेत्रात पथदर्शक म्हणून **ताराबाई मोडक, बाबा आमटे** हे राहतील.

भारताचे अर्थकारण योग्य दिशेने प्रगत होण्यासाठी तरुणांनी स्वत:चे लघुदयोग सुरु केले पाहिजेत. विविध व्यावसायिक क्षेत्रात आधुनिक उपकरणांचा आणि साधनांचा व तंत्रज्ञानाचा वापर केल्यास भारत आर्थिकदृष्टया उन्नती करु शकेल. विविध अल्पबचतीच्या योजनामध्ये सहभागी झाल्याने तरुणांच्या आर्थिक समस्या सोडविणे सुलभ होईल. या प्रगतीबरोबरच अनेक नवनवीन समस्या देशात निर्माण होत आहेत. नव-नवीन शोध लागले आहेत. गणकयंत्राचा शोध लागल्यामुळे अनेक क्षेत्रात भर पडू लागली. जसे वायू, जल यांचे प्रदूषण किंवा जंगलतोड, प्राण्यांची बेसुमार शिकार यामुळे वातावरणाचा व निसर्गाचा समतोल बिघडतो आणि रोगराई, दुष्काळ यासारख्या आपत्ती येतात. हे टाळण्यासाठी तरुणांनी आपली पावले उचलली पाहिजेत. प्रदूषण टाळण्याचे उपाय अंमलात आणून व सामाजिक वनीकरणाची युध्द पातळीवर मोहिम उघडून सार्वजनिक आरोग्य राखण्यास हातभार लावण्याचे काम तरुणांनी केले पाहिजे. आपल्या तरुणांसाठी सरकारने उदयोगाची दारे खुली केली आहेत. त्यांनी आपला स्वत:चा व्यवसाय निवडून मोठ्या प्रमाणात प्रगती करावी. असे उदयोगधंदयांना चालना मिळून सरकार स्वत: कर्ज देते. यातून प्रगती होते. प्रारंभीच्या काळात घरोघर जाऊन रेवड्या, गोळ्या विकणारे लोक आत किर्लोस्कर, गरवारे, ओगले उदयोगसमूह स्थापन करत ते उदयोगपती झाले आहेत. त्यांचे आदर्श आजच्या तरुणांनी डोळ्यासमोर ठेवले पाहिजेत.

शेजारी राष्ट्रांकडून भारताचे लचके तोडण्याचा प्रयत्न सातत्याने होत आहे. आपल्या देशाच्या सरहद्दीचे संरक्षण प्राणपणाने करणे हे प्रत्येकाचे परमकर्तव्य आहे. यासाठी जास्तीत जास्त तरुणांनी बलोपासना करून भारतीय संरक्षण दल, भारतीय पोलिस दल, यांसारख्या संघटनांमध्ये प्रवेश केला पाहिजे. भारत खिळखिळा करण्यास मदत करणारा आणखी एक शत्रू म्हणजे अंमली पदार्थांचे व्यसन. अंमली पदार्थांच्या सेवनापासून युवकांनी दूर राहणे आवश्यक आहे.

आता आपल्या देशात १८ वर्षे पूर्ण झालेल्या तरुणांना राज्यघटनेने मतदानाचा हक्क दिला आहे. त्यामुळे त्यांनी आपली कर्तव्ये जाणून घेऊन ती पार पाडण्याच्या दृष्टीने तत्पर राहिले पाहिजे. राजकीय सत्ता सतत बदलत्या असतात. पण या राष्ट्रीय कर्तव्याबाबत कोणाचेच दुमत नसते. अशी ही वादातीत कर्तव्ये आजचे स्वतंत्र भारतातील तरुण बजावतील तरच राष्ट्र पुरुषाचा रथ वेगाने आणि अभिमानाने प्रगतीपथावर धावेल.

◆ ◆ ◆

## हुंडा

हुंड्यापायी टाकून दिलेली मुलगी
डोक्यावरती तळपता सूर्य घेऊन
फुफाटा तुडवत तुडवत
निघाली होती पायवाटेने

रुपयांच्या पायी तिच्या
नांदण्याचं चांदणं झालं
तिच्या नशिबी आता
कुत्र्यागत जिणं आलं




जावयाचा हट्ट बघून
पोरीच्या बापानं पैसे काढून दिले
पण त्या नराधमाने तिला घरी नाही नेलं
नशिबी तिच्या दु:ख दु:ख दारिद्रय आले.

तिनं पाहिलेल्या स्वप्नांची
राखरांगोळी झाली
आता फक्त तिच्या नशिबी
अवहेलनाच आली.

◆ **संजय ढमे**, प्रथम वर्ष, कला

# "प्रदूषणाचा भस्मासूर"

श्री. राजशेखर वाघमारे, १२वी विज्ञा



सकाळी सकाळी सहज वर्तमानपत्र वाचता वाचता एका बातमीकडे माझं लक्ष वेधलं गेलं, ती बातमी अशी होती-

''एका रासायनिक कंपनीच्या प्रदूषणाने जवळच्या खेड्यातील गुरांचा बळी घेतला. तर कित्येक ठिकाणची पिके जळाली.''

ही बातमी वाचून अचानक मला दुसऱ्या एका घटनेची आठवण झाली. काही दिवसापूर्वीच मुंबईच्या परिसरात अशीच एक प्रदूषण घटना घडली. सेंच्युरी रेयॉन कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या आम्लावर पक्रिया झाली नाही. ज्या सयंत्रात ही पक्रिया होते ते बंद होतं. वीज गेली होती. काम करणारी माणसं कामाच्या जागी हजर नव्हती. बाहेर पडलेल्या आम्लाची क्रिया शेजारच्या कारखान्यातून बाहेर पडलेल्या रसायनावर झाली. विषारी वायू तयार झाला. या वायुमुळे अनेक निरपराध माणसं व जनावरं मृत्युमुखी पडली. बरं ते आम्ल वाहत कसं होतं? तर या उघड्या गटारामधून. या दोन घटनांनी माझं डोकं अगदी सुन्न झाले. माझ्या मनात अनेक प्रश्नांनी थैमान घातलं. हे प्रदूषण निर्माण तरी कसं होतं? याचे परिणाम काय होतात? याला जबाबदार कोण? अर्थातच मानवाला मानवच या दुर्घटनांना या प्रदूषणवाढीला जबाबदार होय.

प्रदूषण निर्माण होणे म्हणजेच दूषित होणे, अशुध्द बनणे. आज जगामध्ये हवाप्रदूषण, ध्वनिप्रदूषण इतकच नव्हे तर पाणीप्रदूषण, अन्नप्रदूषण ही निर्माण झाले आहे. हवाप्रदूषण तर राक्षसी वेगाने वाढतच चालले आहे प्रदूषण ही जगातील एक भयंकर समस्या होऊन बसली आहे.

हवाप्रदूषण म्हणजे हवा दुषित बनणे, अशुध्द होणे, म्हणजेच हवेतील कार्बन डाय ऑक्साईड व इतर विषारी वायूंचं प्रमाण वाढणं होय. हवाप्रदूषण जगभर सर्वत्र आहे. आजच्या या धावपळीच्या युगात वाहनांचा वापर वाढला आहे. साध्या साध्या कामाकरताही माणसे वाहनांचा वापर करीत आहेत. ही वाहने वातावरणात प्रचंड धूर सोडत असतात. या धुरातून कार्बन डाय ऑक्साईड, कार्बन मोनॉक्साईड, सल्फर डाय ऑक्साईड यांच्यासारखे अपायकारक वायू बाहेर पडतात. त्याचबरोबर प्रचंड प्रमाणात जंगलतोड करून जे लाकूड मिळतं त्याचाच वापर जळण म्हणून खेड्यात केला जातो. या जळणामुळे ही हवा अधिकाधिक प्रदूषित बनत चालली आहे. आज जगात सर्वत्र औदयोगिकरण वाटत चाललं आहे. औदयोगिकरणातील हे कारखानेही प्रचंड प्रमाणात विषारी वायू हवेत सोडून प्रदूषणात वाढ करीत आहेत. याशिवाय आज जगामध्ये धुम्रपानाचं प्रमाणही वाढत चाललं आहे. या धुम्रपानामुळे ही हवाप्रदूषणात अधिकाधिक वाढ होऊ लागली आहे. पेट्रोल व इतर इंधनं जाळून आपण दरवर्षी १.८ अब्ज टन कार्बन डाय ऑक्साईड वायू हवेत टाकीत असतो. आज रेफ्रिजरेटर्स व वातानुकुलित यंत्रांचा वापर वाढल्याने ही यंत्रेही वाढत्या हवाप्रदूषणाला हातभारच लावीत आहेत. कार्बन डाय ऑक्साईडच्या हवेतील वाढत्या प्रमाणामुळं हे वातावरण अधिकाधिक दूषित बनत चाललं आहे.

या हवाप्रदूषणाबरोबरच आज जगामध्ये वाढणारं प्रदूषण म्हणजे ध्वनिप्रदूषण होय. वाहनांच्या अतिरिक्त वापरामुळे शहरी भागांमध्ये ध्वनिप्रदूषण निर्माण झालं आहे. आजच्या या युगामध्ये औदयोगिक वसाहती लोकवस्तीच्या अधिकाधिक जवळ निर्माण होत आहेत. औदयोगिक वसाहतीतील कारखान्यातील यंत्रांच्या प्रचंड आवाजाने ध्वनिप्रदूषणात अधिकच भर पडत आहे. गणेशोत्सव व नवरात्र उत्सव या सांस्कृतिक कार्यक्रमांच्या नांवाखाली मोठमोठ्या कर्णकर्कश्य आवाजात लावलेले



ध्वनिप्रक्षेपक ध्वनिप्रदूषण वाढवीत आहेत. आज जगभर सर्वत्र पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव निर्माण झाला आहे. त्यामुळे सर्वत्र पाश्चात्य संगीतातील मधुरता संपून नुसता कर्णकर्कश्यपणाच उरला आहे. या पाश्चात्य संगीताची लोकप्रियता ध्वनिप्रदूषणात भरच टाकत आहे. दुसरे म्हणजे प्रचंड प्रमाणात वाढलेली लोकसंख्या ही या हवाप्रदूषणास व ध्वनिप्रदूषणास कारणीभूत आहे.

हवाप्रदूषणाबरोबरच पाणीप्रदूषण ही एक गंभीर समस्या मानवासमोर आ वासून उभी आहे. औदयोगिक वसाहतीतील कारखान्यांमधून विषारी रसायने आणि इतर गोष्टींनी युक्त असे सांडपाणी फार मोठ्या प्रमाणात सोडलं जातं. या पाण्यातील विषारी व दूषित भाग दूर करण्यासाठी त्यावर प्रक्रिया करणं आवश्यक असतं. पण एवढ्या मोठ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करणं ही खर्चिक गोष्ट आहे. त्यामुळे बरचसं सांडपाणी व त्याचबरोबर मैला जसाच्या तसा नदया आणि समुद्रामध्ये सोडला जातो. त्यामुळे समुद्र व नदयांमधील पाणी प्रदूषित बनत चाललं आहे.

दिल्लीच्या गटारांमधून यमुना नदीत रोज दोन अब्ज लिटर घाण सोडली जात आहे. त्यामुळे यमुना ही एक फार मोठी प्रदूषित नदी झाली आहे. पण अशी प्रदूषित झालेली यमुना ही एकटीच नदी नाही. भारतातल्या सर्व तेरा नदयांमध्ये हीच परिस्थिती आहे. तीन हजारपेक्षा जास्त असलेल्या शहर आणि गावांपैकी फक्त सात टक्के गांवे आपल्या सांडपाण्यावर काही संस्कार करतात. इतर सर्व गावे आपली घाण स्वैरपणे नदयांमध्ये सोडीत आहेत. गंगा ही नदी भारतामध्ये अत्यंत पवित्र नदी मानली जाते. पण आज स्थिती अशी आहे की, १३२ उदयोगधंदे आपल्या कारखान्यातील सांडपाणी या पवित्र गंगेमध्ये सोडतात. त्यापैकी फक्त १२ कारखाने त्या पाण्यावर प्रक्रिया करतात. यावरून आपणच आपल्या जीवनदायी नदयांची काय हालत करीत आहोत हे लक्षात येईल. जगामध्येही सर्वत्र हेच चालू आहे. केनिया देशातील मोबासा बंदरातील सांडपाणी समुद्रात सोडले जाते. बाल्टीक समुद्रात किरणोत्सारित गाळ, खते आणि विषारी द्रव्ये मुक्तपणे सोडली जात आहेत. हाँगकाँग बंदरात तर प्रचंड प्रदूषण निर्माण झालं आहे. खेड्यापाड्यातूनही तेथील पाणवठ्याच्या ठिकाणच्या अस्वच्छतेमुळे पाणी प्रदूषण वाढलं आहे. हे झालं पाणीप्रदूषणाचं!

या सर्व प्रदूषणांबरोबरच आज अन्नप्रदूषण ही एक नवीनच समस्या निर्माण झाली आहे. या अन्नप्रदूषणास प्रमुख कारण म्हणजे सर्वत्र चाललेली अन्नातील भेसळ. आज कोणताही अन्नपदार्थ शुध्द स्वरुपात मिळण्याची शाश्वतीच उरलेली नाही. अन्नधान्यात भेसळ, तेलात भेसळ इतकच नव्हे तर दूध व मसाल्याच्या पदार्थांमध्येही ही भेसळ आढळून येते. अन्नधान्यातले ६ टक्के पदार्थ भेसळलेले असतात. तपासणीवरुन असं आढळून आलं की, ३३ टक्के दूध हे भेसळलेलं होते, मसाल्यात भेसळीचे प्रमाण १२ टक्के होते, तर तेलामध्ये ८ टक्के ''मिलावट'' होते. आज खादयतेलांमध्ये निकृष्ट तेले मिसळली जातात. मोहरीच्या तेलात धोत्र्याचे तेल मिसळतात. पिवळाधमक रंग येण्यासाठी मेटॅनिल यलो हे रसायन हळद, डाळी, बेसन, जिलेबी, हिंग या खादयपदार्थांमध्ये मिसळलं जातं. एकूणच काय तर स्वत: मानवच हे प्रदूषण निर्माण करण्यास कारणीभूत बनला आहे.

परंतु हे सर्व प्रदूषण निर्माण करतांना पुढे होणाऱ्या दुष्परिणामांचा काडीचाही विचार मानवाने केला नाही याचं खूप वाईट वाटतं.

बऱ्याचदा भेसळलेले पदार्थ हे कर्करोगास निमंत्रण देणारे असतात. खादयतेलातील भेसळ यकृताला हानीकारक ठरते. मोहरीच्या तेलातील भेसळीपायी अंधत्व येते. गाठी (ट्युमर) तयार होतात. मेटॅनिल यलो या रसायनाने पक्षाघात संभवतो, पंडुरोग निर्माण होतो. म्हणजेच या अन्नप्रदूषणाचे दुष्परिणाम स्वत: मानवालाच भोगावे लागतात.

मोंबासा बंदरातील प्रदूषणाने तेथल्या समुद्रातील मौल्यवान प्रवाळ नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. बाल्टीक समुद्रातील प्रदूषणामुळे आज एक चतुर्थांश बाल्टीक समुद्र जलवाळवंट बनला आहे. त्यातील माशांना कर्करोग होत आहे. ते मोठ्या प्रमाणावर मरत आहेत. फिलीपाईन्सच्या आसपास असलेली प्रवाळ जाती नामशेष होत आहेत. मलेशिया व्दिकल्पातील माशांच्या २६६ जाती निर्वंश झाल्या आहेत. तसेच या पाणीप्रदूषणामुळे साधे पाणी मिळणे हे एक मृगजळच ठरणार आहे.

हवाप्रदूषणामुळे निर्माण होणारे जे कार्बन-डाय-ऑक्साईडसारखे वायू

असतात ते सर्व आरोग्याला विघातक असतात. इंधन जाळून आपण जो वायू प्रचंड प्रमाणात वातावरणात सोडीत आहोत त्यामुळे हवेचे एकूण तापमानच वाढणार आहे. वाढलेल्या उष्णतेमुळे ध्रुवावरचे बर्फ वितळून समुद्राच्या पाण्याची पातळी वाढणार आहे. त्यात अनेक बेटे, किनाऱ्यावरची शहरे बुडून जाणार आहेत. जंगलांचा ऱ्हास आणि वाढते औद्योगिकरण यामुळे येत्या पन्नास वर्षात आपल्या सभोवतालच्या वातावरणाचे तापमान दोन ते पांच अंश सेंटिग्रेडने वाढणार आहे. यालाच ''ग्लोबल वॉर्मिंग'' असे म्हणतात. कारखान्यांमधून बाहेर पडलेले सल्फर-डाय-ऑक्साईड व नायट्रोजन ऑक्साईड अशा प्रकारचे वायू जेव्हा ढगाच्या सान्निध्यात येतात तेव्हा त्यांचे ॲसिडमध्ये रुपांतर होते व आम्लयुक्त पाऊस (ॲसिड रेन) पडतो. रेफ्रिजरेटर, वातानुलित यंत्रे यांच्या वाढत्या वापरांमुळे त्यातील वायू सभोवतालच्या ओझोन वायूच्या संरक्षक कवचाला भोके कसली विवरे पाडीत आहेत. त्यामुळे सूर्यापासून येणारे प्रखर अतिनील किरण त्वचेचा कर्करोग वाढविणार आहेत, आणि इतर प्राण्यांमधील जनुक रचनाच बदलणार आहे. आपल्या सभोवतालच्या वातावरणात कार्बन-डाय-ऑक्साईडचे प्रमाण नगण्य म्हणजे ०.०३ टक्के इतके कमी आहे. परंतु हयाच वायुमुळे आपल्या पृथ्वीचे तपमान जीवमात्रांना सहन होईल एवढेच राहते. हा वायू जर नसता तर पृथ्वी सारखीच थंड गोळा झाली असती. परंतु हयाच वायुच्या वाढत्या प्रमाणामुळे पृथ्वीची भट्टी होण्यास वेळ लागणार नाही. या सर्वांचा परिणाम म्हणजे पृथ्वीचे पर्यावरण अत्यंत खराब होत चालले आहे. आपण म्हणजे सर्व पृथ्वीवासियांनी वेळीच काळजी घेऊन उपाययोजना केली नाही तर ही बहुरत्ना आणि सौंदर्यवती वसुंधरा दरिद्री आणि कुरुप झाल्याखेरीज राहणार नाही. त्यासाठी मानवाने चालवलेलं आपल्याच नाशाचं सत्र कुठेतरी थांबवलं पाहिजे.

सुदैवाने मानवाला हे भवितव्य आज कळून आले आहे, ही किती भाग्याची व आनंदाची गोष्ट आहे. त्यासाठीच वसुंधरा परिषद जून १९९२ च्या १ ते १२ तारखेपर्यंत ब्राझिल देशाची राजधानी रिओ डी जानिये येथे भरली होती. या परिषदेमध्ये या सर्व विषयांवर मुद्देसूद चर्चा होऊन हे सर्व टाळण्यासाठी उपाययोजनेचा विचार करण्यात आला. ही भावी संकटे टाळण्यासाठी काही कठोर उपाय त्वरेने करणे जरुरी आहे. सर्व देशांनी ऊर्जाबचतीवर भर देऊन कर्बउत्सर्ग कमी केला पाहिजे. सर्व देशांमध्ये अव्याहतपणे चाललेली जंगलतोड कायद्याने थांबविली पाहिजे. रेफ्रिजरेटर्स व वातानुकुलन यंत्राचा वापर मर्यादित केला पाहिजे. अनावश्यक ठिकाणी वाहनांच्या वापरावर बंदी घातली पाहिजे. कारखान्यांवर सांडपाणी प्रक्रिया न करता सोडण्यास बंदी घातली पाहिजे. व ते सांडपाणी समुद्र व नदयांमध्ये न सोडता त्याची योग्य ती विल्हेवाट लावली पाहिजे. अन्नातील भेसळीवर सर्व देशांनी कायदयानी बंदी घातली पाहिजे. हे झालं जागतिक उपाययोजनेसंबंधी. पण स्वतः मनुष्य हे टाळण्यासाठी काय करु शकतो?

आपण स्वतः या देशाचे भावी नागरिक म्हणून आपल्या उज्जवल भवितव्यासाठी वर सांगितलेल्या कार्यास हातभार लावला पहिजे. नव्हे स्वतः सक्रिय सहभागी झाले पाहिजे. आपण आपल्याकडील जमिनींमध्ये सरकारच्या मदतीने वृक्ष लावून त्यांचे संवर्धन केले पाहिजे कारण हे वृक्षच आपल्या वसुंधरेला प्रलयातून वाचवू शकतात. ''एक मनुष्य, एक झाड'' हा मंत्र आपल्या कार्यातून घुमला पाहिजे. त्याचबरोबर आपण वाहनांचा अतिरिक्त वापर टाळला पाहिजे. वाहनांच्या इंजिनांची व्यवस्थित तपासणी करुन घेतली पाहिजे. स्वयंपाकघरामध्ये स्वयंपाकासाठी कमी इंधन लागणाऱ्या चुली वापरल्या पाहिजे. कुकरचा वापर केला पाहिजे. गणेशोत्सवासारख्या कार्यक्रमांमध्ये ध्वनिप्रक्षेपकांचा आवाज कमी ठेवला पाहिजे. जेणेकरुन त्याचा कोणालाही त्रास होणार नाही. पाणी, वीज अशा उपयुक्त वस्तूंचा अपव्यय टाळला पाहिजे. जर कोणी पर्यावरणविरोधी कृत्य करीत असेल तर आपण योग्य त्या अधिकाऱ्याकडे तक्रार नोंदविली पाहिजे. नुसत्या पर्यावरण संगोपन कार्यक्रमामध्ये हजर राहून चालणार नाही, तर स्वतः वर सांगितलेल्या कार्यात आपण हिरीरीने सहभागी झाले पाहिजे. पर्यावरणाचे महत्त्व इतरांना समजावून सांगून त्यांनाही या कार्यात सामावून घेतले पाहिजे. मला खात्री आहे की, एक ना एक दिवस ही वसुंधरा पुन्हा सुजलाम सुफलाम व समृध्द झाल्याखेरीज राहणार नाही.

◆ ◆ ◆



# जेथे जातो तेथे

श्री. संजय सागडे, द्वितीय वर्ष-कला



आखाड संपला अन घरोघरची कापडं-चोपडं नदीवरुन धुऊन निघाली, घरंदारं सारवून बायांना दुखणी यायला लागली कारण श्रावण महिना आला होता. घराघरातून पोथ्या सुरु झाल्या. नवनाथ, रामविजय, हरिविजय इ. ग्रंथांची पारायणे घडू लागली, जणू श्रावण महिनाच घराघरातून बोलत होता. ग्रंथांच्या पानांबरोबर दिवसही उलटत होते. आणि पाहतापाहता अमावस्या आली. अमावस्या म्हणजे श्रावण महिन्यातील शेवटचा दिवस. या दिवशी ''नाथवाडीचा पोळा'' असे. श्रावणातील एक दिवस आपल्या लाडक्या बैलांसाठी राखून ठेवण्यात लोकांना आनंद वाटे. सर्वत्रच धावपळ सुरु होती.

आबा पाटलांच्या वाड्यावरदेखील आज पोळ्याची धामधूम सुरु होती. आबा पाटील म्हणजे गावचे दैवत, अतिशय सज्जन, गोरगरिबांना उपयोगी पडणारा, भारदस्त व्यक्तिमत्व, गावचे आशास्थान व श्रध्दास्थान देखील. सकाळीच गड्यांनी बैलांना नदीवरुन धुऊन आणले होते. शिंगे तासून गुळगुळीत केली होती. त्यावर हिंगुळ लावून रंगीबेरंगी बेगडे चिकटविली होती. बैलांना रंगविणे, खांदेमळणी करणे असे सुरु होते. कोणी झुली धुऊन वाळत टाकीत होते. काहीजण नवख्या खोंडाच्या नाकात वेसण घालण्याचा प्रयत्न करीत होते. पण ते खोंड त्यांना जुमानत नव्हते. कोणीतरी म्हशीच्या कृपाळावरील पांढऱ्यां भागावर लाल रंग लावीत होते. जणू काळोखातून तांबूस सूर्यबिंब उगवावे.

आबा पाटील गडयांना भराभर हुकूम सोडीत होते. उणिव भासेल तेथे जातीने लक्ष पुरवीत होते.

परंतु दुसरीकडे वेगळाच कट आबांच्या विरोधात रचला गेला होता. याची कुणालाच कल्पना नव्हती. गावाच्या पंचायतीत ''सावळ्या किडाळचा''च्या विरोधात आबांनी निकाल दिला होता. त्यामुळे त्याचा आबांवर राग होता. बैलांची मिरवणूक निघाली की आबांची देखणी बैलजोडी सर्वात पुढे असे. व आबादेखील सर्वांबरोबर मिरवणुकीत सहभागी होत. त्याचवेळी गावातील वीजपुरवठा बंद करायचा, एकाने फटाक्यांचा सर पेटवून गोंधळ उडवून दयावयाचा व ''सावळ्या''ने आबांवर हल्ला करायचा असे ठरले होते.

मिरवणुकीच्या वेळी पोलीस बंदोबस्त नसे कारण गावामध्ये आजपर्यंत कुठलीच अनुचित घटना घडली नव्हती. सारा गाव आबांच्या ताब्यात राहात असे. त्यामुळे पोलिसांना याबद्दल काळजी वाटत नव्हती.

संध्याकाळी सजविलेल्या बैलांची मिरवणूक निघाली. ढोल, ताशा, सनया आपापल्या परीने आलाप घेऊ लागले. गुलालाची मुक्तहस्ते उधळण चालली होती. गुलालाने भिजून सूर्यदेव देखील तांबूस लाल झाला होता. मस्तावलेल्या व मारक्या खोंडांना दोन दोन कासरे लावले होते. लहान पोरांनी बारकी वासरं देखील रंगवून मिरवणुकीत आणली होती. वाजवून-वाजवून वाजंत्री घामाघूम झाले होते. गुलालाच्या डोंगरांचे अडथळे बाजूला सारुन डोक्यातून उगम पावलेली घामाची नदी वाजंत्र्यांच्या तोंडावरुन वहात होती. मिरवणूक पहात पहात सूर्यदेव डोंगराआड गेला.

भैरवनाथाच्या मंदिरापुढून मिरवणूक गावच्या चौकात आली. अमावस्या असल्याने अंधार गावात मावत नव्हता. विजेच्या खांबावरील बल्बचा काय तो प्रकाश पडत होता.

''सावळ्या'' कुऱ्हाड परजून सज्ज होता. अंधारात लपला होता व

लाईट बंद होण्याची वाट पहात होता. अमावस्येची रात्र ही आबांच्या जीवनातील काळरात्र ठरणार होती. गाव एका देवमाणसाला मुकणार होता. सावळ्या व आबांच्या विरोधातील काही मंडळी की ज्यांच्या डोळ्यात आबा कस्पटाप्रमाणे खुपत होते त्यांचा हा दुष्ट कट होता.

मिरवणूक रंगात आली होती. इतक्यात कोणीतरी फटाक्यांचा सर पेटवून दिला. धाड धाड, थाड थाड, फाट फाट त्याचवेळी खांबावरील लाईट गेली. आवाजानं बैलं बुजली, हिसके घेऊ लागली. गड्यांच्या हातून कासरे सुटले. एकच गोंधळ सुरु झाला.

'आऽऽऽ' एक दीर्घ किंकाळी अंधार भेदून गेली. रात्र शहारली. आता काय पहावे लागणार? बॅटऱ्या चमकू लागल्या, इतक्यात पुन्हा लाईट आली. पहाता तो काय सावळ्याला एका तरुण बलवान माणसाने पकडले आहे. लाईटच्या मेन डेपोपाशी देखील गडबड सुरु झाली. तेवढ्यात ग्रामपंचायतीचा स्पिकर सुरु झाला. ''लोकहो, सर्वांनी आपापली बैलं घेऊन घरी जा. पोलीसांनी गावाला गराडा घातला आहे. सर्वांचे लाडके आबा पाटील सुरक्षित आहेत.'' पोलिसांनी गावात प्रवेश केला होता. आबांच्या आसपास पोलिसांचा वावर होता. मेन डेपोपाशी देखील दोन शिपाई होते. त्यांनी एकाला पकडून आणले होते.

सावळ्याला अटक झाली व आरोपींना घेऊन पोलीस निघाले. गावापासून लांब अंतरावर जीप उभी होती. त्यात बसून सारे गेले. नाथाची कृपा म्हणून संकट टळले असे सारेजण म्हणत होते. तेवढ्यात पंचायतीच्या स्पिकरवर सुस्वर आवाजात पुढील गीत सुरु झाले-

''जेथे जातो तेथे तू माझा सांगाती''

## कधी कधी

शिशिराच्या शापामुळे कधी,
पानेच वृक्षांची झडून जातात,
तर पाण्यातील कळ्याच कधी,
उमलण्याआधी सडून जातात.

दंडूकशाही श्रीमंतीमुळे कधी,
गुन्हेच सारे जिरून जातात.
तर लोकशाही अंधारमुळे कधी,
लबाड लांडगे निवडून जातात.

आठवणींच्या साठवणीची कधी,
पोतीच धान्य खाऊन जातात.
तर रक्षणकर्ती कुंपणच कधी,
हिरवीगार शेते खाऊन जातात.

जीवापाड प्रेम केलेली कधी,
कुत्रीच चोरांना फितूर होतात.
तर मायेच्या छायाच कधी
काळामुळे लुप्त होतात.

तारुण्याच्या संध्याकाळी कधी,
ओठच लाली शोषून घेतात.
तर सुगंधी निष्पाप फुलेच कधी,
प्रेताबरोबर जळून जातात.



◆ **गणेश घारे**, एम्.एस्सी. (वनस्पतिशास्त्र)



# भादवा

श्री. रवींद्र चव्हाण, ग्रंथालय व माहितीशास्त्र



खसकन तिनं तो टाचेतला काटा बाहेर उपसून काढला. खोलवर टचाळलेली वेदना रक्तानिशी बाहेर आली, भळभळा रक्त ओघळलं. सगळ्या टाचेत विस्तव धुमसल्यागत झाला.

दूर गावातली देऊळ शिखर नजरेस पडत होतं. त्या वरचा भगवा दोन बोटाएवढाच दिसत होता, अजून दोन तीन कोस..... उमा रडकुंडीला आली होती. जीव ओसरत चाललेल्या पायात तिनं कसतरी बळ आणलं. चार वर्षाच्या चंद्रीला काखेत दडपून हातातली पिशवी तोलल्यासारखी केली नि ती वाट जवळ करू लागली.

लग्नानंतर ती पहिल्यांदाच माहेरी चालली होती. ''आय लई आजारी हाय... तुज्या नावाचा धोसरा काडलाय..'' काल तिला सांगावा कळल्यापासनं तिचा जीव तगमगून गेला होता. आजपर्यंत आण्णा तिला किती वेळा नेण्यासाठी आले होते, पण... ''मामा, उमीला न्हयायचं तर कायमचंच न्या. पुन्यांदा ह्या घराचा उंबरा तिला दावायचा न्हाय, असं रघुनाथनं स्पष्ट बजावलं होतं.

उमाच्या डोळ्यातलं पाणी मग किती वेळा अण्णांची सोबत घेऊन माहेराला गेलं होतं... आज ती रघुनाथबरोबर भांडण करूनच घराबाहेर पडली होती. बिनपैशाचं... पाठीवर वळ घेऊन...

भाद्रपदाचा महिना, नदीला तर पाणीच पाणी आलं असेल. तिच्या दु:खाचा भादवा कधी आटलाच नव्हता. दारुच्या बाटलीत गुंगून, बाटलीतल्याच रघुनाथबरोबर आण्णांनी तिचं लगीन केलं होतं. त्यावेळेपासून काही सुटलं नव्हतं, त्याचं व्यसन, हीचं दु:ख काहीच नाही....

कुंभेज गावातले दिवे जवळ येऊ लागले, तिच्या पावलांना गोळे भरुन आल्यानंतरची गती आली. अंधार आता तोंडओळख पुसून टाकायच्या घाईत होता. बगळ्यांच्या चुकार माळा आभाळगतीनं सरकत होत्या. ''बगळ्या... बगळ्या पंख दे...'' तिला तीव्रतेनं वाटून गेलं....

काखेतल्या चंद्रीनं चुळबूळ केली, ''आये, तान लागलीया...''

''आता आलंच बग आपलं घर, मग पिऊ पानी''.... समजूत घालून उमा चालत राहिली. तेवढ्यात सायकलच्या घंटीचा ''ट्रिंग, ट्रिंग'' आवाज झाला, ती बाजूला झाली.

''कोन त्ये?''

''मी, हाय... उमा''

''उमा, हाय व्हय. आयला भेटाय आलीच? जा-जा बिगीनं.... आटवन काडतीया लई म्हातारी...'' नि सायकल दमाटून पुढं गेली.... दुधाच्या किटल्यांची कॅरीयरला माळ लोंबत होती, नाही तर नेलं असतं आपल्याला त्यानं शिवाप्याचं पोरगं आवाजावरुन ओळखल तिनं.

.....तिचा धीर सुटायला लागला होता... हजार टिटव्यांच्या मानांतून ''सांगावा'' तिला चालणं होत नव्हतं. बैलानं मारलं होतं. त्यात....

''माझ्या आईला सुखात ठीव'' तिनं देवाची करुणा भाकली....

''माझ्या आईनं माझ्या बालपणीचं सुख बघितलंय. त्यावेळची उमा आत्ताची आईपणातली उमा यात आईच्या डोळ्यांइतके अंतर आहे.

गेल्याबरोबर चंद्रीला आईच्या हातात द्यायचं, सुख-दु:खाच्या गोष्टी करायच्या, तिची सेवा करायची. तिच्या कुशीत सात-आठ वर्षाचं रडू मोकळं करायचं.... सगळ्या चित्ततकथेनिशी तुझी लेक आत्ता तुझ्यापाशीच असेल आत्ता. गालावरच्या अश्रूंना तिनं पदराआड घ्यायची तसं....

''देवा माझी आय चांगली असू दे...'' दारातला निंब म्हाताऱ्या

माणसाच्या ओळखीगत हलला. तिला बघून दारातली सगुणी हंबरली. नि पिवळ्या आजारी कंदीलाच्या प्रकाशात, घराच्या चौकटीतून आण्णा बाहेर आले.

एक-दोन क्षण अंधारातल्या उमाकडं रोखून बघितलं.... नि हुंदकारत ओरडले, ''माजी पोर, सखु, तुजी पोरगी आली गं, आपली उमा आली''....

आण्णांचे शब्द ऐकून उमाचे भान हरपलं, नि ती पिसाट हुंदक्याच्या शब्दात आक्रोशू लागली. ''आये... ये आये, मी आलीय, आगं बग तुजी चंद्री आलीया, बग बग तुज्या चंद्रीला तुज्या डोळ्यांनी...''

धडपडत ती पळत आली, दरवाजातून तोंडाला पदर लावून शेवंताआक्का बाहेर येत होती. आत उमाच्या आईच्या तोंडावरुन चादर ओढली जात होती. उमाचे डोळे कित्येक वर्षानी माहेरी येऊन उंबऱ्या ओघळत होते.

आभाळ भादव्याच्या रंगानं भरत चाललेलं होतं.....

## पोरके सुख

संपणाऱ्या त्या सुखाने
मजला का भुलवावे
भावबेड्या माझ्या मनी
विष का कालवावे

पाठीवरचा मायेचा हात
का घ्यावा हिरावून
शांत झोपलेले रान
निघाले आता पेटून

पोळलेल्या माझ्या तनावर
कोण घालील फुंकर
वठलेल्या तरूला
येईल का बहर

खुळे वेडे मन माझे
स्वप्न किती पाहते
तेल संपलेली वात
अशीच का विझते

विझलेल्या वातीतून
येईल का प्रकाश
भोवताली माझ्या
सारे गडद आकाश



◆ **कु. छाया गवळी**, द्वितीय वर्ष, कला

## आकाश कोसळले

किल्लारी गावावर जेव्हा
आकाश कोसळले

कोमेजले जीव सारे
भूमीत निजले

हात न मिळाला तेव्हा
त्यांना मदतीचा

तांडवनृत्य चालू होते
तेंव्हा दैत्याचे

संसाराचे स्वप्न सारे
मातीत विरघळले

कमवता हात गेला
ते रस्त्यावरती पडले

आई-बापाविना पोर
ते पोरके झाले.

किल्लारी गावावर जेव्हा
आकाश कोसळले

◆ **महेश डोईफोडे**, अकरावी, शास्त्र (ब)



# गरज आहे सावित्रीबाईंची

**कु. सत्वशीला कोळेकर**, अकरावी कला



आकाश म्हणता निलीमा, समुद्र म्हणता जलविस्तार जसा डोळ्यासमोर दिसतो तसे समाजकार्य, स्त्रीशिक्षण म्हटले की सावित्रीबाई फुले डोळ्यासमोर येतात. आजची स्त्री आपल्या मोडक्या संसाराला हातभार लावण्यासाठी कोणत्याही उदयोगाची, व्यवसायाची कास धरते. आज कोणतेच क्षेत्र असे नाही की जेथे स्त्रियांनी आपले सामर्थ्य दाखविले नाही. पायलटपासून ते रिक्षाचालकापर्यंत सर्वच क्षेत्रात स्त्रियांनी आपली छाप उमटविली आहे. पण हे काही आपोआप घडलेलं नाही. यासाठी कारणीभूत आहे एक क्रांतीकारी स्त्री आणि त्या स्त्रीचे नाव आहे सावित्रीबाई फुले. या महान स्त्रीच्या कार्याचा आलेख हाच माझ्या निबंधाचा विषय आहे.

आमच्या पुराणकथेतील सावित्री झगडली ती यमाबरोबर. पण ही आधुनिक सावित्री झगडली ती स्त्रियांना जिवंतपणे यमयातना भोगायला लावणाऱ्या अनिष्ठ रुढी व परंपरेविरुध्द.

स्त्रीसुध्दा माणूसच आहे. पुरुषाप्रमाणे तिलाही मन, बुध्दी व भावना आहेत हे कोणी लक्षातच घेतलेलं नाही. स्त्री म्हणजे गरीब गाय, पायाची दासी असा सोयीस्कर अर्थ त्यावेळी लावला जात होता. त्यावेळी स्त्रियांना विद्या घेण्याचा अधिकार नव्हता.

महाराष्ट्र आणि सारा देश त्यावेळी अज्ञान, कर्मकांड, वर्णभेद, जातीभेद, बालविवाह, केशवपन, सतीची चाल इ. रुढींनी ग्रासला होता. पतीच्या निधनानंतर स्त्रियांना मनाविरुध्द केशवपन करून घ्यावे लागे, सती जावे लागत असे. अशा या भयाण व अंधःकारमय पार्श्वभूमीवर ३ जानेवारी १८३१ रोजी नायगांव येथे नेवसे पाटलांच्या घराण्यात सावित्रीबाईंचा जन्म झाला. घराणे संस्कारक्षम असल्याने त्यांचे बालपण सुयोग्य वातावरणात गेले. पुढे नवव्या वर्षी त्यांचा ज्योतिबा फुले यांच्याशी विवाह झाला. दोन विधायक शक्ती एकत्र आल्या. ज्योतिबांनी आपले उच्च विचार सावित्रीबाईसमोर मांडले. सावित्रीबाईंनी ते सारे विचार समजावून घेतले. आपल्या पतीच्या कामात समर्थपणे साथ देण्याचे ठरविले आणि त्यांच्या सामाजिक कार्यास सुरुवात झाली. स्वतःचा संसार बाजूला ठेवून समाजाचा संसार सावरण्याचे त्यांनी ठरविले. व अखंडपणे त्यांनी ते व्रत सांभाळले. ''विदयेविना मती गेली-मतीविना नीति गेली-नीतिविना गती गेली-गतीविना वित्त गेले-वित्तविना शूद्र खचले'', इतके अनर्थ एका अविदयेने केले. ही विचारसरणी त्यांनी समजावून घेतली. या सामाजिक क्रांतीच्या यज्ञासाठी आपले सारे जीवन अर्पण केले.

स्त्रीस शिक्षण देणे त्यांना अत्यंत गरजेचे वाटले. त्यासाठी त्या स्वतः प्रथम शिकल्या. व १८४८ मध्ये पुण्यातील बुधवार पेठेतील भिडयांच्या वाडयात पहिली मुलींची शाळा चालू केली. व खऱ्या अर्थाने स्त्री-मुक्तीची गंगोत्री सुरु झाली. जोपर्यंत स्त्री सुजाण व सुशिक्षित होत नाही तोपर्यंत सामाजिक सुधारणा होणे शक्य नाही असा ठाम विचार त्यांनी मांडला. सामाजिक सुधारणा होणे शक्य नाही... 

पण त्या लोकांना म्हणत, ''तुम्ही माझ्यावर जे दगड, शेण फेकत आहात त्याचा मी फुले म्हणून स्वीकार करते. तुमच्या कृत्यामुळे माझा विश्वास व उत्साह वाढला आहे.'' त्यांच्या विरोधाची धार थोडी बोथट झाली. त्यामुळे पुण्यात सावित्रीबाईंचा दरारा वाढला.

बुध्दिमत्ता, विव्दत्ता व नीतिमत्ता या बाबतीत परिपूर्ण असलेल्या सावित्रीबाईंचे वाचन, मनन, चिंतन तितकेच सखोल होते. सामाजिक कार्याबद्दल त्यांना कमालीची आवड होती. कळकळ होती. त्यांची अभिरुची, निर्णयशक्ती व सामाजिक विचार उच्च दर्जाचे होते. ज्योतिरावांची ती तर प्रेरणाच होती. या सद्गुणांमुळेच त्यांनी आपला ज्ञानयज्ञ यशस्वी केला.

स्त्रीशिक्षणाबरोबरच स्त्रियांना सुजाण करण्याचे कार्यही त्यांनी केले. अगदी मायेने व जिव्हाळ्याने ते मुलींना व क्षुद्रांना वागवत. त्यामुळे ती सर्वांचीच माऊली झाली. या माऊलीने सर्वांनाच सावली दिली. १८५० पर्यंत महाराष्ट्रात निरनिराळ्या ठिकाणी एकूण १८ शाळा सुरु झाल्या व स्त्रीशिक्षणाच्या गंगोत्रीचा ओघ वाढू लागला. आपल्या विचारांना त्यांनी आचारांची जोड दिली. काशीबाई नावाच्या तरुण विधवेचा मुलगा त्यांनी दत्तक घेतला. व त्याच्यावर पुत्रवत प्रेम करून त्यास डॉक्टर केले. स्त्रीशिक्षणा-बरोबरच विधवा पुनर्विवाहासाठी त्यांनी प्रयत्न केले. वाट चुकलेल्या स्त्रियांना मानसिक आधार दिला. त्यासाठी आश्रम चालू केले. केशवपनाच्या चालीविरुध्द त्यांनी बंड पुकारले. मुंबई-पुण्यातील न्हाव्यांना एकत्र करून केशवपन करणे किती क्रूर आहे हे समजावून दिले. न्हाव्यांना त्यांचे विचार पटल्याने त्यांनी संप पुकारला. कदाचित भारतातील हा पहिला संप असावा. आंतरजातीय विवाह त्यांनी घडवून आणले. बालहत्येविरुध्द आवाज उठविला. बालकांसाठी पाळणाघरे चालू केली. हे सारे करीत असताना आपला संसार बाजूला ठेवला. निंदा-नालस्तीच्या अग्नीत जळत राहून इतरांना आसरा दिला. ज्योतिरावांच्या कार्यातील सिंहाचा वाटा उचलला. ज्योतिबांच्या वणवणत्या जीवनात त्यांनी मायेचा ओलावा दिला.

ज्योतिरावांबद्दल आपल्या एका कवितेत त्या म्हणतात-

'अडाणी जनांचा असे कर्णधार
व यांना असे देत असे सद्विचार
कृतीवीर होता तसा ज्ञानयोगी
स्त्रिया शूद्रासांठी सदा दुःख भोगी'

ज्योतिबांदद्ल सावित्रीबाईंना विलक्षण अभिमान होता. १८४२ ते १८८९ पर्यंत दोघांनी मिळून सामाजिक कार्य केले. १८९० मध्ये ज्योतिबांचा मृत्यू झाला. सावित्रीचा सखा हरपला. पण त्यांनी व्यक्तिगत दुःख बाजूला ठेऊन ज्योतिबांच्या सर्वच क्रांतिकार्याचे नेतृत्व केले. दीन-दलितांची सेवा चालू ठेवली. अगदी शेवटच्या श्वासापर्यंत १८९७ मध्ये महाराष्ट्रात प्लेगची साथ पसरली होती. रात्रंदिवस त्या रुग्णांची सेवा करीत होत्या. अशावेळी एका हरिजन मुलास दवाखान्यात आणताना त्यांनाही प्लेगची बाधा झाली. आणि त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली..... तो दिवस होता १० मार्च १८९७. एक धगधगता यज्ञ शांत झाला. एक घनघोर लढाई संपली. पण त्यांनी घालून दिलेल्या पाऊलवाटेचे रुपांतर आज एका अशा राजमार्गात झाले आहे की ज्यावरुन असंख्य स्त्रिया निर्भयपणे वाटचाल करीत आहेत.

जरी आज स्त्रिया शिक्षण, कला, क्रीडा, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात चमकत असल्या तरी आजही त्यांना अनेक भीषण समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. पूर्वी पतीनिधनानंतर स्त्रीस जळत्या चितेत सतीच्या नावाखाली जाळले जात होते. तर आज हुंड्याच्या नावाखाली स्त्रियांना जाळले जात आहे. एका ठिकाणी मुलगी झाली म्हणून कोवळ्या अर्भकाला तापलेल्या तव्यावर ठेवले. अनेक निष्पाप स्त्रिया कापराच्या वडीसारख्या जळून जात आहेत. कोण रोखणार हे अत्याचार? सावित्रीबाई इतरांचे जीवन फुलावे म्हणून स्वतःच्या अंगावर मारलेल्या शेणाचा मारा तुम्ही आनंदाने सहन केलात.


स्त्रियांना आधार दिलात-संरक्षण दिलंत. अशी सावित्री आता आम्ही कोठे शोधायची? अन म्हणूनच या क्रांतीदेवीस मी वंदन करून म्हणते-
सावित्रीबाई तुम्ही पुन्हा जन्म घ्या. विझवा हा वणवा स्त्री अत्याचारांचा.

असंख्य अबलांच्या किंकाळ्या तुम्हाला ऐकू कशा येत नाही? या स्त्रियांना आधार देण्यासाठी आजही माऊली तुझी आम्हाला गरज आहे. या अबलांना संरक्षण देण्यासाठी त्यांचे अश्रू पुसण्यासाठी तू आम्हांला हवी आहेस.

तू आम्हाला हवी आहेस, तू आम्हाला हवी आहेस.

◆ ◆ ◆





# डंकेल प्रस्ताव व भारत

राजू पाठक, एम.ए. (अर्थशास्त्र)

**प्रास्ताविक :**

दुसऱ्या महायुध्दानंतर निरनिराळ्या देशांमध्ये खुल्या व्यापाराला उत्तेजन देण्यासाठी आणि व्यापारामुळे मैत्री, सहिष्णुता, न्याय व समानता प्रस्थापित करण्यासाठी अनेक राष्ट्रांच्या विचार-विनिमयातून ३० ऑक्टोबर १९४७ रोजी प्रशुल्क व व्यापारसंबंधीचा सर्वसाधारण करार (General Agreement on Tariffs and Trade : GATT—गॅट) करण्यात आला. हा करार मोडणाऱ्या देशाला दंड करण्याचे ते एक व्यासपीठ बनले आहे. गॅटच्या स्थापनेत अमेरिकेने पुढाकार घेतला. निरनिराळ्या सदस्य राष्ट्रांनी व्यापारविषयक कराराच्या वाटाघातीत भाग घेऊन सार्वत्रिक करार करावयाचा व त्या करारावर सहया करणाऱ्या राष्ट्रांनी त्या शर्ती पाळावयाच्या असे कार्य आहे. व्यापार-उदयोगात किमान बंधने ठेवण्यात सर्व राष्ट्रांचे हित असून त्यातूनच निकोप अर्थरचनेची वाढ होण्यास मदत होईल.

**गॅटचे करार :**

आत्तापर्यंत एकूण सात करार करण्यात आले. त्या प्रत्येक करारात भारत सहभागी राहिला आहे. गॅट करारात सहभागी होणाऱ्या देशांची संख्या वाढत जाऊन आज गॅटचे एकूण ११७ सभासद राष्ट्रे आहेत. गॅटच्या करारामुळे प्रशुल्काचे प्रमाण बरेच कमी करण्यात यश आले आहे. हे प्रशुल्काचे परिणाम प्रामुख्याने यंत्रोत्पादनाच्या आयातीवर होते. कृषीव्यापार व पेटंटसंबंधीचा विचार यापूर्वी कराराच्या बाहेर होता.

**गॅटचे आठ करार :**

१) १९४७ - हवाना क्युबा
२) १९४९ - ॲनेसी फ्रान्स
३) १९५०-५१ - टोरके इंग्लंड
४) १९५५-५६ - जिनिव्हा स्वित्झर्लंड
५) १९६०-६१ - जिनिव्हा (डिलॉन फेरी)
६) १९६४-६७ - जिनिव्हा (केनेडी फेरी)
७) १९७३-७९ - जिनिव्हा (टोकिया फेरी)
८) १९८६-९३ - ऊरुग्वे

**डंकेल प्रस्ताव :**

आठव्या करारासंबंधी वाटाघाटी १९८६ मध्ये ऊरुग्वे येथे सुरु झाल्या. हा करार खूप वर्षे रेंगाळला म्हणून गॅटचे महासचिव श्री. ऑर्थर डंकेल यांनी आपला प्रस्ताव तयार केला, व त्यावर अंतिम निर्णय घेण्यास सभासद राष्ट्रांना सांगण्यात आले. अमेरिका व युरोपियन सामाईक बाजारपेठेचे सभासद यांच्यामध्ये शेतीक्षेत्राच्या अनुदानासंबंधी गंभीर मतभेद होते त्यामुळे गेली सात वर्षे वाटाघाटी चालू असूनही करार संमत झाला नव्हता. शेवटी या करारास प्रदीर्घ वेळ लागला. त्याला कारण अनेक देशांनी आपली भूमिका ताठर ठेवली. शेतीमालावरील अनुदान, बँकिंग, विमा यांसारख्या सेवाचांही, व्यवसायाचाही करारात समावेश करण्यात आला. तंत्रज्ञान, संशोधनाचे हक्क, आयात निर्बंध, बौध्दिक मालमत्ता, स्वामित्व हक्क, संबंधित पेटंट कायदे, व्यावसायिक गुंतवणूक, संधी असे अनेक मुद्दे वादग्रस्त ठरले.

**भारताचे स्थान :**

भारत हा गॅटच्या ११७ सदस्यांपैकी एक आहे. भारताचा एकूण जागतिक व्यापारात वाटा नगण्य म्हणजे (०.५ टक्के) आहे. त्यामुळे भारताला तसे या वाटाघाटीत स्थान नाही. युरोपियन बाजारपेठ आणि बलाढ्य व प्रगत

देशांशी व्यापारी देशांशी स्पर्धा करणे भारताला शक्य नाही. निर्यात क्षेत्रात भारताचा ३३वा क्रमांक लागतो. भारत उत्पादन कार्यक्षमता, स्पर्धाकता, तंत्रज्ञान याबाबत खूपच मागे आहे. या पार्श्वभूमीवर गॅट करार मान्य करणे अथवा गॅटमधून बाहेर पडणे हा एकच मार्ग उरला आहे. व आर्थिक सुधारणेच्या दृष्टीकोनातून गॅटमधून बाहेर पडणे शक्य नाही. कारण गॅटमधून बाहेर पडल्यामुळे होणाऱ्या फायदयापेक्षा तोटे जास्त आहेत.

**डंकेल प्रस्तावाचे प्रमुख विषय :**

या डंकेल प्रस्तावात प्रमुख सात विषयांचा समावेश होतो- १) बाजार प्रवेश २) कृषी व्यापार ३) वस्त्र व कपडे हयाचा व्यापार ४) व्यापाराशी संलग्न बौध्दिक स्वामित्वाचे अधिकार ५) व्यापाराशी संलग्न गुंतवणुकीचे उपाय ६) सेवांचा व्यापार ७) गॅटचे नियम पालन.

**व्यापार व गुंतवणूकीविषयक :**

भारताने खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीवरल निर्बंध दूर करावे हा प्रस्ताव आहे. १९९१ च्या औदयोगिक धोरणापासून सरकारने विदेशी कंपन्यांना ५१ टक्के शेअर्स विकत घेण्याची परवानगी दिली आहे. डंकेल प्रस्तावामध्ये उच्च उत्पादन तंत्र लागणाऱ्या क्षेत्रात व निर्यात वस्तुच्या उत्पादनात बहुराष्ट्रीय कंपन्यांनी अधिक उदार धोरण स्वीकारावे असा सूर आहे. विदेशी भांडवलावरील नफा परदेशात पाठविण्यावर कोणतेही बंधन नसावे. निर्यातीबाबत विदेशी गुंतवणूकदारावर निर्बंध असू नयेत व त्याच्या पसंतीनुसार यंत्रसामग्री, कच्चा माल आयात करण्याची मुभा असावी. थोडक्यात भारतातील औदयोगिक बाजारपेठ विदेशी कंपन्यांना खुली करावी असा सूर आहे.

**सेवांचा खुला व्यापार :**

पूर्वीच्या करारामध्ये वस्तू व्यापार, आयात-निर्यात निर्बंध कमी करण्याकडे लक्ष होते. अमेरिकेच्या आग्रहाने डंकेल प्रस्तावात सेवांच्या आयात-निर्यातीचा ही समावेश व्हावा असे सुचविले आहे. बँकिंग, विमा, पर्यटन, वाहतूक क्षेत्रात परकीय कंपन्यांना हस्तक्षेप करण्याची मुभा देण्यात येईल. पण हयामुळे विकसनशील देशातून विकसित देशाकडे परकीय चलनाचा साठा जाईल व परकीय चलनाच्या त्रुटीचा गंभीर प्रश्न निर्माण होईल.

**व्यापारसंबंधी औदयोगिक मालमत्ता हक्क :**

शास्त्रीय संशोधन, यातून लागलेले शोध, कलाकृती ही एक प्रकारे बौध्दिक मालमत्ता असते. बौध्दिक मालमत्तेला संरक्षण मिळावे ही भूमिका आहे. कायदेशीर दृष्टया कॉपीराईट, पेटंटव्दारे बौध्दिक मालमत्तेचे संरक्षण करता येते. पेटंटनुसार नवीन वस्तु किंवा उत्पादन प्रक्रियेचा शोध लावणाऱ्या व्यक्तीला विशिष्ट मुदतीसाठी मक्तेदारी बहाल करण्यात येते. डंकेल प्रस्तावात विकसित देशाप्रमाणे कायदे करावेत असा आग्रह आहे. २० वर्षाच्या काळामध्ये परवानगीशिवाय कोणालाही त्या वस्तुचे उत्पादन किंवा प्रक्रिया वापरता येत नाही. भारतात पेटंटचे अधिकार उत्पादन प्रक्रियेपुरते मर्यादित आहेत. दुसऱ्या उत्पादकाने दुसरी प्रक्रिया वापरुप उत्पादन केल्यास त्यास मज्जाव करता येणार नाही. डंकेल प्रस्तावाप्रमाणे प्रक्रियेबरोबर उत्पादनावरही पेटंट असावा. त्यामुळे संशोधनावरील खर्च भरुन निघेल. भारताने स्वीकारल्यास जीवनावश्यक वस्तु व औषधे उत्पादनात मक्तेदारी बळावेल व किंमती वाढतील. व गरीब ग्राहकांच्या हिताचे रक्षण होणार नाही.

**बौध्दिक स्वामित्वाचे अधिकार :**

प्रक्रिया व उत्पादित वस्तुंच्या संबंधी कोणत्याही शोधास तंत्रविज्ञानाच्या कोणत्याही क्षेतात पेटंट मिळावे असा डंकेल प्रस्ताव आहे. पण हा शोध नवीन हवा हा प्रस्ताव आहे. नवीन तंत्रामुळे मूळ ग्रंथाच्या सहीसही ग्रंथ, ध्वनिमुद्रिका जशा बाहेर येत असल्याचे दिसते त्याचप्रमाणे हुबेहूब असणारी यंत्रे, औषधे, खेळणी, मदय, निळ्या जीन्स, मोटारीचे सुटे बनावटपणे होत असल्याचे, प्रक्रियांचे प्रतिपत बनले असल्याचे आढळून आले आहे. अशा चाचेगिरीला आळा बसावा  हा डंकेल प्रस्वाचा हेतू आहे.

**शेती :**

डंकेल प्रस्तावाचा एक परिणाम म्हणजे कृषी क्षेत्राला मिळणारे आर्थिक सहाय्य (सबसिडी) कमी होणार. कृषी क्षेत्राला मिळणाऱ्या आर्थिक सहाय्यामुळे उत्पादित वस्तू आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धेत टिकू शकत



होत्या. सबसिडी कमी झाल्यास देशांतर्गत निर्यामूल्य वाढेल व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून पिछेहाट होईल. बाजारमालाच्या निर्मितीवर बंधने येतील. कृषिजन्य वस्तूंची निर्मिती वाढेल हे जरी मान्य केले तरी हया बाबतची अडचण म्हणजे वस्तूंचा दर्जा. आंतरराष्ट्रीय बाजारात वस्तूंचा दर्जा पाळला तरच व्यापारवाढ होईल. यासाठी नाशवंत वस्तू, पदार्थाचा दर्जा टिकविण्यासाठी आधुनिक यंत्रसामुग्री, तंत्रज्ञान याची गरज आहे. फळफळावळ, वनस्पती व कृषिजन्य वस्तूच्या निर्मितीसाठी भारताला पायाभूत सुधारणा करावी लागेल.

वाणिज्य मंत्री प्रणव मुखर्जी म्हणतात, ''हया प्रस्तावामुळे भारताची निर्यात वर्षाकाठी दीड ते दोन अब्ज कोटी रुपयांनी वाढेल व कृषिजन्य वस्तूंची निर्यातही वाढेल.''

**डंकेल प्रस्तावाबद्दल भीती (संभाव्य तोटे) :**

डंकेल प्रस्तावाला अनेक अर्थतज्ज्ञ, उदयोजक व राजकीय पुढारी यांचा विरोध आहे. हा प्रस्ताव स्वीकारल्या भारत आपले सार्वभौमत्व गमावून बसेल, औषधांच्या किंमती भरमसाठ वाढतील, शेतीक्षेत्रावर त्याचा विपरीत परिणाम होईल. शेतकऱ्याला उत्पादनाचा काही भाग बियाणे म्हणून वापरता येणार नाही, पारंपरिक शेती प्रक्रिया व पध्दतीवर गदा येईल. सार्वजनिक वितरण सेवा बंद करावी लागेल. युरोपिय व बहुराष्ट्रीय कंपन्या भारतीय उदयोग नष्ट करतील व आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होईल. आपल्याल विदेशी वस्तूंचा वापर करावा लागेल. लहान उदयोगधंदे बंद पडतील. आर्थिक सत्तेचा वापर करुन आपल्या भारतावर विदेशी लोक राज्य करतील व आपल्या देशाला भिकेला लावले जाईल. जनता दल चे जॉर्ज फर्नांडीस म्हणतात, ''भारत आता अमेरिकेची आर्थिक वसाहत होणार''. प्रसिध्द अर्थतज्ज्ञ डॉ. अशोक मित्रा म्हणतात, ''डंकेल प्रस्ताव हा तिसऱ्या जगातील राष्ट्रां (विकसनशील व अविकसीत) साठी हानीकारक आहे''. डंकेल प्रस्तावावरुन लोकसभा व राज्यसभा यात प्रचंड गोंधळ व वादावादी झाली आहे.

**शेतमाल निर्यातीस प्रचंड वाव :**


जगात शेती अनुदाने कमी झाली तर भारतीय शेत मालाची निर्यात प्रचंड वाढेल. शेतकऱ्याला उत्तम भाव मिळेल. भारतातून तांदूळ, कापूस, मसाल्याचे पदार्थ, चहा, कॉफी, काजू इ. शेतमालाची निर्यात होते. सरकार कोटा पध्दत व किमान भाव अटी घालते त्यामुळे निर्यातीसाठी अनिष्ट परिणाम होतात. परदेशी आयातदारास नियमित माल अशी खात्री नसते. शेतीची प्रगती मागणी वाढल्यामुळे होईल. भारत फळे उत्पादन करणारा जगात दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे तर चीननंतर भाजीपाला पिकविणारा दुसऱ्या क्रमांकाचा देश भारत आहे. पण प्रक्रिया, पॅकिंग, वाहतूक इ. बाबतीत आपण इतर देशांच्या मागे आहोत. भारताने नियमित पुरवठा हमी, प्रक्रिया, दर्जा, प्रतवार, बँडचा वापर, विक्री व्यवस्था या गोष्टी सुधारल्यास शेतमाल निर्मिती वाढेल.

**सारांश :**

डंकेल प्रस्तावाबाबत विविध अर्थतज्ज्ञ व राजकीय तज्ज्ञ यांची मते भिन्न आहेत. शेतकरी नेते श्री. शरद जोशी यांनी डंकेल प्रस्ताव हा शेतकऱ्यांच्या हिताचा आहे तर वाणिज्य मंत्रालयाच्या पाहणीनुसार भारतीय उदयोगांनी तांत्रिक प्रगती साधल्यास वस्तुंची गुणवत्ता व दर्जा सुधारल्यास अर्थ व्यवस्थेवर अनिष्ठ परिणाम होणार नाही तर त्यामुळे शेतमाल निर्यातीस भरपूर वाव आहे या पूर्वीच्या करारामुळे आयातीवर निर्बंध ठेऊनही निर्यातीस भरपूर वाव मिळाला होता. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक हयांचे दडपण व आंतरराष्ट्रीय व्यापारातील सहभाग लक्षात घेता भारताला डंकेल प्रस्तावातील अटी मान्य करण्याशिवाय पर्याय नाही असे दिसते. डंकेल प्रस्तावाला विरोध करणारे काही पक्ष राजकीय दृष्टीकोनातून विरोध करीत आहेत. डंकेल प्रस्तावातील अटी मान्य केल्यास होणाऱ्या तोटयांपेक्षा गॅटमधून अलिप्त राहिल्यास होणारे तोटे जास्त संभवतात. भारताला जागतिक अर्थ व्यवस्थेच्या मुख्य प्रभावापासून दूर राहून चालणार नाही. भविष्यात डंकेल प्रस्तावाचे होणारे फायदे व तोटे आपल्यासमोर स्पष्ट दिसतील. तोपर्यंत डंकेल प्रस्ताव अटी भारत कशा पाळतो व आपली प्रगती कशी साधतो हे पाहता येईल.

**संदर्भ :** १) अर्थसंवाद-मराठी अर्थ परिषदेचे त्रैमासिक, २) अर्थमंथन-१४ जून ९३, शरद जोशी, ३) अर्थमंथन-१७ जानेवारी ९४, अजय दांडेकर

◆ ◆ ◆



# लोकसंख्येचा विस्फोट व भारत

कु. वर्षा कांबळे, प्रथम वर्ष-कला

१९५१ साली स्वतंत्र भारतात जनगणना झाली. त्यावेळी भारताची लोकसंख्या ३६.१ कोटी होती. लोकसंख्येच्या बाबतीत चीनच्या खालोखाल भारताचा दुसरा क्रमांक लागतो. उत्तर अमेरिकेतील संयुक्त संस्थाने व रशिया या दोन राष्ट्रांची मिळून जितकी लोकसंख्या होती. त्यापेक्षाही थोडी जास्तच लोकसंख्या एकट्या भारताची आहे. भारतात लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमीटरला १७८ असून ते जागतिक लोकसंख्येच्या सरासरी घनतेपेक्षा सुमारे पाच पटीने जास्त आहे.

प्रत्येक तीन सेकंदाला दोन मुले किंवा प्रत्येक वर्षी २.२५ टक्के ते २.५ टक्के या गतीने लोकसंख्येची वाढ होते. १९७१ पर्यंत भारताची लोकसंख्या ५६० दशलक्ष पर्यंत वाढेल असा अंदाज होता. सध्या भारताची लोकसंख्या म्हणजे १९९३ ची प्राथमिक स्वरुपाची जनगणना ८८, ९५, ५७, २४७ एवढी आहे.

आणि भारतात खरच तीन सेकंदाला दोन मुले या प्रमाणात लोकसंख्या जर अशाच प्रमाणे वाढत गेली तर विचारवंतांचा विचार कधीच फोल ठरणार नाही. इ.स. २००० पर्यंत माणसाने माणसाला खाल्लेल्या घटना घडतील. लोकसंख्यमुळे मानवाला अन्न जर मिळाले नाही तर खरच माणूस माणसाला नक्की खाईल हे निश्चित. एक वेळ वाचनात आले होते की, ''एका जेट विमानातील बिघाड झाल्याने ते विमान बर्फाळ प्रदेशात उतरविले गेले. तो संपूर्ण बर्फाच्छादीत प्रदेश असल्याने विमानातील लोकांना त्या बर्फावरुन चालता येत नव्हते. कोणी मदतीसाठी धावत नव्हते. भुकेपोटी विमानातील लोक मरू लागले. त्या माणसांचे मांससुद्धा पुरले नाही. शेवटी ती सर्वच्या सर्व माणसे मृत्युमुखी पडली.'' खरंच मला अतिशय भीती वाटते की जर भारताची लोकसंख्या अशीच वाढली तर भारतात अशा प्रकारची घटना घडेल की काय?

भारतात लोकसंख्या वाढीला एक महत्त्वाचे कारण म्हणजे अंधश्रद्धा. भारतीय लोकांच्या वंशाला दिवा लागतो. भारतीयांची अशी समजूत आहे की, प्रत्येक माणसाच्या पोटी एकतरी अपत्य असावे. म्हणजे वंशाला दिवा झाला असे समजतात. वंशाला दिवा पाहिजे ना मग एक मुलगा किंवा एक मुलगी पुरे की.

आपलेच आजी-आजोबा भारतीय इतिहासात मोठा विक्रम केल्यासारखे सांगतात छातीवर थाप मारुन सांगतात की, मला एक डझन मुले झाली. खरंच हा भारतीय लोकसंख्येचा मोठा स्फोटच म्हणावा लागेल. यासाठी प्रत्येक भारतीयाला साक्षर केले पाहिजे. कुटुंब नियोजनाबद्दल समजावून सांगितले पाहिजे.

''पहिल्याची घाई नको, दुसरे तर नकोच नको'', ''मुले थोडी तरच संसारात गोडी'' ही वाक्ये फक्त शाळेच्या किंवा दवाखान्याच्या भिंतीवरच राहतात. या विचाराचा उपयोग फक्त म्हणण्यासाठी किंवा बोलण्यासाठी होतो. ही मात्र खेदाची बाब आहे.

लोकसंख्येच्या बाबतीत भारत देश चीनला नक्कीच मागे टाकणार व आपला जगातील एक क्रमांक निश्चित करणार.

चीनमध्ये पहा, चीनच्या सरकारने लोकंख्येला यशस्वीरीत्या आळा घालण्याचा प्रयत्न केला. अतिशय कडक निर्बंध घातलेले आहेत की प्रत्येक कुटुंबात एकच मुल आणि त्या मुलाचा वैद्यकीय शैक्षणिक जो खर्च असेल तो सरकार भरणार व दुसरे मुल झालं तर त्याला कुठल्याच प्रकारच्या सुविधा



दिल्या जात नाहीत आणि रेशन कार्डवर धान्य दिले जात नाही. त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात चीनच्या लोकसंख्येला आळा बसलेला दिसून येतो. अशाच प्रकारे भारत सरकारने ठोस पावले उचलायला हवीत.

भारतात काही धर्म असे आहेत की, ते लोकसंख्या वाढवून स्वत:चा धर्म वाढवायला निघालेत. हे लोक भारतमातेचा विचार करत नाहीत ते धर्माचा विचार करतात त्यांना धर्म वाढवायचा आहे. देशाचा विचार कोण करतो?

ख्रिश्चन असो, बौद्ध असो, हिंदु असो, जैन असो वा मुस्लीम असो प्रत्येक धर्माने लोकसंख्येचा विचार करावयास हवा.

ऑस्ट्रेलिया, अमेरिका, रशिया या ठिकाणी लोकांना सुटसुटीत जिणे आवडते. मुलं म्हटलं की मोठं कुटुंब आलं, मोठं कुटुंब म्हटलं की कटकटी वाढल्या, असे त्यांचे मत असते. परंतु भारतीय लोक संपूर्ण उलटे करतात. भारतामध्ये मुलं व्हावीत म्हणून देवाला नवस करतात. कोंबड्या बकऱ्यांची निर्घृण हत्या करतात. अमाप असा डॉक्टरांच्याकडे खर्च करतात. कारण वंशाला दिवा हवा ना.

भारत देशातील सर्वच लोक साक्षर असते. तर लोकसंख्येला केव्हाच आळा बसला असता, भारतात केरळ राज्यातील लोक १०० टक्के साक्षर आहेत. त्यामुळे याचा परिणाम लोकसंख्येवर झालेला दिसून येतो. केरळ राज्यात लोकसंख्या वाढीचा वेग सर्वात कमी म्हणजे १३.९८ टक्के एवढा आहे. प्रत्येक शिक्षित माणसाने एक माणूस साक्षर केला तर लोकसंख्येला आळा बसेल.

आज आपल्याला प्रत्येक ठिकाणी रांगच दिसत आहे. देवळात देवाच्या दर्शनासाठी गेलो तरी रांगेतच उभे राहवे लागते. रॉकेल आणायला गेलो तरी मोठीच्या मोठी रांग दिसते. पृथ्वीवरील जमिनीच्या एकूण क्षेत्रफळाच्या सुमारे २ टक्के जमीन भारताने व्यापली आहे.

जपान देशात लोकसंख्या जास्त आहे. तरीही त्या देशाची प्रगती अतिशय नेत्रदिपक आहे. जपानने दरडोयी उत्पन्नात अमेरिकेला मागे टाकले. जपानची लोकसंख्या जास्त आहे. परंतु त्यांना त्यांच्या उत्पन्नात अमेरिकेला मागे टाकले. जपानची लोकसंख्या जास्त आहे. परंतु त्यांना त्यांच्या कुवतीप्रमाणे काम दिले जाते. तेथील लोक कर्तृत्ववान आहेत.परंतु भारतीय लोक हे आळशी आहेत. भारताला लोकसंख्येचा वापर करून घेता आलेला नाही.

भारतीयांना वंशाला दिवा पाहिजे.
निपुत्र म्हणून घ्यायचं नाही.
धर्म वाढवायचा आहे.
मुलं जास्त असल्याने सुख लागते.

आणि खरंच इ.स. २००० पर्यंत माणूस माणसाला खाऊन लोकसंख्येचा विस्फोट होईल की काय?

## ग्रीष्म आणि विरह

तुझा हा विरह
आता सहन होईना
आणि या ग्रीष्मातला
दिवस जाता जाईना

ग्रीष्मातल्या उन्हाने
तडे गेलेत भूमीला
पिया तव आगमनाने
सुगंधू दे या भूमीला



उन्हाची ही तगमग
सहन होईना वेलींना
पर्जन्य होऊनी माझी
चातकतृष्णा भागव राया

जीव आता कंठाशी आला
तव भेटीला व्याकूळ झाला
तू दाता हो जीवलगा
अन जीवदान दे मला

◆ कु. अश्विनी होनराव, ११ वी, कला

# धर्म व राजकारण

**श्री. विजय माळशिकारे, ११वी विज्ञा**




"Longest journey is the journey inward"

एकीकडे वैज्ञानिक दृष्टीकोन आपला प्रभाव गाजवतो आहे आणि दुसरी कडे धर्म व राजकारणाचे अवैज्ञानिक मिश्रण सामाजिक व सांस्कृतिक पर्यावराला दूषित करीत आहे. यातून आपल्याला मार्ग काढला पाहिजे.

आज सकाळपासून जो तो वर्तमान पत्र शोधू लागला. संध्याकाळपर्यंत कोपऱ्यात पडलेले वर्तमानपत्र आज मात्र सकाळीच सर्वांच्या हातात दिसू लागले. पावसाचे काळे ढग जसे बरसावे तसे लोक सध्याच्या सत्तारुढ पक्षावर बरसू लागले. उशिरा का होईना काँग्रेस पक्षाला शहाणपण सुचले. मग माझी उत्सुकताही दाटून आली. मी पाहिले तर आजच्या पत्रात ही खळबळजनक बातमी होती की सत्तारुढ काँग्रेस पक्षाने संसदेत धर्म व राजकारण यांची फारकत करणारी दोन विधयके मांडली आहेत. म्हणजे लवकरच कायदा पास होईल तर.

अयोध्येत ६ डिसेंबर १९९२ रोजी घडलेल्या दुर्दैवी घटनेनंतर धर्म आणि राजकारण या विषयांवर अनेक लेख वर्तमानपत्रातून, दर्जेदार मासिकांतून येताहेत. या घटनेमुळे राजकी ध्रुवीकरणाला विलक्षण गती मिळालेली दिसते.

सर्वच पत्रांनी केंव्हा ना केंव्हा तरी धर्माचा संकुचित विचार करून केवळ स्वार्थासाठी, मतासाठी धर्माला राजकारणात आणलेले आहे.

धर्म आणि राजकारण यांचे स्वरुप समजूव घेतले पाहिजे. त्यांच्यामध्ये सीमारेषा आखणे शक्य आहे काय? हे पाहिले पाहिजे.

राजकर्त्यांच्या दृष्टीने धर्म म्हणजे ''केवळ स्वार्थासाठी निरनिराळ्या पद्धतीने वापरण्यात येणारे खेळणं.''

''माणसाला माणसासारखे वागवणे, दुसऱ्याचे हित होईल, एकमेकां सामंजस्य निर्माण होईल असे वर्तन म्हणजे धर्म'' ही पुराणातील व्याख्या म. गांधीजींची ''धर्म म्हणजे सत्य'' हे लोक विसरलेच असतील बहुधा.

धर्म निरपेक्षता हा लोकशाहीचा आत्मा. प्रत्येकाला आपल्या धर्माप्रमाणे वागवण्याची मुभा पण त्याचा अर्थ असा नाही की एका धर्माने दुसऱ्या धर्मा हवी तशी सांप्रदायिकता निर्माण करावी. याचे उदाहरण जानेवारीतील भीषण मुंबई दंगल. तशी सांप्रदायिकता निर्माण करावी. याचे उदाहरण जानेवारीतील भीषण मुंबई दंगल.

आपण अगदी मोठ्या अभिमानाने म्हणतो-
''मजहब नही सिखाता,
आपस में बैर करना,
हिंदी है हम, हिंदोस्ताँ हमारा''

मग आठवते ६ डिसेंबरची ती अयोध्येतील घटना. मग आंबेडकरांची खंत खरीच वाटते की- ''जातीयवादाचा राजकारणात समावेश झाला तर लोकशाही संपुष्टात येईल''.

ह्या यक्ष प्रश्नाला आपल्याला बळी पडावे लागते की काय?

"A real religion is concerned with a renewal of earth rather that with a surender to heaven"

धर्म ही एक शक्ती आहे. धर्म सुसंस्कारांसाठी आहे. धर्मांची निर्मि मानवाच्या अनाकष्ट व नियतेतून झाली आहे. अज्ञान, भीती, भय, गूढ



यातून झाली आहे. जे कळत नाही ते कळावे. व्यक्तीचे अध्यात्मिक, भावनिक उन्नयन व्हावे, विकास व्हावा अशातून धर्म विकसित झाला आहे. देव-देवताची पूजा, अग्नी, वरूण, पृथ्वी यांची आराधना सूके यांचा या भयातून उदय झालेला आहे. धर्म हा दुष्ट-अनिष्ट, चांगले-वाईट, पाप-पुण्य यांच्या कल्पना मांडतो. धर्मातून विकसित होतात एके काळी धर्माने समाजाचे संघटन केले.

पण राजकारणात असे असत नाही. राजकारण हा सर्व व्यक्तीला व्यापून राहते असे नाही. राजकारण हे त्या त्या देशातील राजकारभार चालविण्याचे तंत्र आहे सर्वच व्यक्ती राजकारणी असतात असे नाही. ''बाई, बाटली पेक्षा राजकारण वाईट''.

"Political is game of Rascals" असे राज्यशास्त्राज्ञांनी म्हटले आहे. राजकारण हे सैतान समजले आहेत.

म्हणून धर्म आणि राजकारण हे एक असू नयेत. राजकारणाला धर्म असावा पण राजकारणात धर्म आणू नये. प्रत्येक पक्षाने आपल्या कर्तृत्वावर सत्ता मिळवावी धर्मामुळे नाही. ''धर्म हे नीतिशास्त्र आहे'' नीतिशास्त्राची व्याप्ती राज्यशास्त्रापेक्षा केव्हाही अधिकच. धर्माचा उपयोग राजकारणात न करता धर्माची व्याप्ती वाढविण्यासाठी करावी नाही का?

◆ ◆ ◆


## मला माहीत आहे

मला माहीत आहे की
मी एक स्त्री आहे
तुमच्या कायद्यात बांधलेली
आणि.........
उपभोगाच्या खांबाला टांगलेली
मला माहीत आहे की
मी एक स्त्री आहे
अंधारात भिंतींना कवटाळणारी
आणि.........
दगडांना पाझर फोडणारी
मला माहीत आहे की
मी एक स्त्री आहे
तुम्हाला जन्म देणारी
आणि.........
तप्त ज्वालात तुमच्यामुळेच जाणारी
मला माहीत आहे की
मी एक स्त्री आहे
सहनशीलतेच्या मूर्त नर्तिकेतली
आणि.........



विश्वासाच्या बोचणाऱ्या आघातातली
मला माहीत आहे की
मी एक स्त्री आहे
रक्ताचं पाणी करणारी
आणि.........
तुमच्या डागण्या पचवणारी
मला माहीत आहे की
मी एक स्त्री आहे
घाण्याला जुंपलेल्या बैलासारखी
आणि.........
म्हटलंस तर
चिखलातल्या कमळासारखी,
मला माहीत आहे की
मी एक स्त्री आहे
दुचाकी संसारात झिंगलेली,
आणि.........
मृत्यूच्या दारात पेंगुळलेली.

◆ कु. अनुपमा इमामके, द्वितीय वर्ष, वाणिज्य



# नियत

श्री. महेंद्र कांबळे, तृतीय वर्ष-कला

अंधार पडत चालला होता. तसतसा सीताराम झपाझपा पाय काढीत आपल्या घराकडचा रस्ता कापीत होता. त्याच्या मनात चाललेली विलक्षण धगधग. त्याच्याशिवाय कोणालाच माहीत नसेल. आयुष्यभर कष्ट करुन आपल्या एकुलत्या एक मुलाला त्याने शिकवलं आणि त्या मुलाने आपल्या कष्टाचे हे फळ द्यावे? असा विचार देखील त्याच्या मनात येत असतील, त्याच्या त्या अंधारमय जीवनाला तो अगदी कंटाळून गेल्यासारखा वाटत होता.

सीताराम हा त्याच्या कुटुंबासह गंगापूर गावामध्ये रहात होता. एखाद्या बड्या शेतकऱ्याकडे, सालानं राहून तो आपल्या बायकोसह आपला एकुलता एक मुलगा नीलंकठ याच्याबरोबर आपल्या आयुष्यातील सुखदु:खाचे पाढे मोजत आपली गुजराण करीत होता. आपल्या मुलानं मोठे व्हावे, चांगले नाव कमवावे असे त्याला वाटत होते. प्रत्येक कष्टकर्त्या आईवडिलांची हीच स्वप्ने असतात. त्यांना वाटत असते आपले आयुष्य असेच गेले निदान आपल्या मुलांना तरी सुखाचे चार घास खायला मिळावेत. असा विचार करणाऱ्यापैकी सीताराम हा एक होता. त्यालादेखील लहानपणापासून दुसऱ्याच्या दारात जाऊन दिवसभर राबून दिवसाकाठी काही मिळेल त्यामध्ये समाधान मानायचे पण तो त्याच्या मुलाला तसे करू देणार नव्हता.

मुलाला शाळेत घालण्याइतके वय झाले की, त्याने आपल्या मुलाला शेजारच्या ज्ञानदेवच्या मुलाबरोबर शाळेत घातले, नीलंकठ हुशार होता. प्रत्येक वर्षी त्याने परीक्षेत नाव कमावले, शेजारच्या ज्ञानदेवचा मुलगा रामदास, अतिशय उनाड होता. त्यामुळे परीक्षेत नापास व्हायचा म्हणून त्याने शाळा सोडून दिली व गुरांमागे जाऊ लागला.

''बाकी, काय बी म्हण सीताराम'', ''तुझं पोरं लई हुश्शार हाय बघ, त्याला मोठं हापिसर बनव, मंजी झालं.'

''अरं, माझा पोरगा बघ शिकला नाय, तुझ्याच पोराबर घातला व्हता न्हवं त्याला शाळंत, आता वळुतया गुरं.''

ज्ञानदेव सीतारामला जरा आपल्या मुलाचा तिरस्कार करीत बोलला.

''अरं ज्ञानबा, माझा बी त्योच इचार हाय बघ, आता हे बघ, आपण दोघं दहा वरसं झाली, देशमुखाच्या वाड्यात बैलावानी राबतुया, हे काम माझ्या पोरांला नाय रं बाबा द्यायचं. ''त्यास्नी शिकवायचं, मोठं करायचं अन त्याच्या स्वत:च्या पायावर उभं करायचं, पण 'मला तुझ्या पोराचं काय बी पटलं नाय बघ, त्याला काय धाड आली होती व्हय शिकाया'', सीताराम थोडासा गंभीर होत ज्ञानदेवला बोलला.

सीतारामचे आपल्या मुलाबद्दलचे विचार म्हणजे त्याच्या आयुष्याला देणारी कलाटणी होती. अनंत स्वप्न साकारायची त्याला ओढ होती पण नियतीचे रंगच असे असतात की , मानवाला ते फक्त आशेवर जगायला लावत असते आणि ती आशाआकांशा जीर्ण झालेल्या शरीराबरोबर फेकून द्यायचे असते. नीलकंठाचे त्यावेळी मॅट्रिकचे वर्ष होते. सीताराम आपल्या लाडक्या मुलाला काही कमी करीत नव्हता, त्याला कोणत्याही प्रकारचे काम सांगत नव्हता. त्याच्या शाळेचे हेडमास्तरसुद्धा त्याचे कौतुक करीत होते. यंदा ते त्याच्या शाळेतर्फे सत्कार करणार होते. एके दिवशी बाजारातून येताना त्यांना सीतारामची गाठ पडली.

''अरे सीताराम तू? बऱ्याच दिवसातून गाठ पडली'' मास्तरांनी मोठ्या



आश्चर्याने विचारले.

''काय वो मास्तर, कसं काय बरं हायना?'' सीतारामने मास्तरांना उलटप्रश्नी विचारले.

'माझे बाबा बरे आहे, तुझे कसे काय चाललय?''

''आमचं कसं असणार हाय मास्तर, हातावरचं पोट आमचं, दिवसभर गुराढोरावाणी राबायचं आणि मिळल ते खायचं असं आमचं जिणं'', सीताराम थोड्या गांभिर्याने बोलला.

''पण मास्तर, मी माझ्या पोराला शिकवणार, हापिसर बनवणार हाय,'' सीताराम आनंदाने बोलला. ''बाकी, तु लई जिद्दी आहेस बघ सीताराम, पोराला चांगलं शिकवं''.

''यंदाचं त्याच मॅट्रिकचे वर्ष आहे बघ'' मास्तर म्हणाले. थोडे हास्य करीत सीताराम म्हणाला, ''बरं, बरं तुमी काय बी काळजी करु नका मास्तर'', असे म्हणून तो घरी निघून गेला.

अपेक्षेप्रमाणे नीलकंठ चांगल्या मार्कांने पास झाला. ही बातमी सर्व गावात वाऱ्यासारखी पसरली. गावचा पाटील सरपंच यांनी त्याचे कौतुक केले. ही बातमी त्याच्या मामालादेखील कळाली. त्याचा मामा भास्कर शहरात रहात होता.

कुठल्यातरी कंपनीत क्लार्कचे काम करीत होता. एकूण त्याचे जीवन सुखसमाधानाचे चालले होते. भाच्याचे कौतुक करण्यासाठी तो शहरातून गंगापूरला आला.

मामाला येताना पाहून नीलकंठ ओरडतच घरात गेला ''मामा आले'', ''मामा आले'', भास्करने आल्याबरोबर त्याच्या तोंडात पेढा घातला, आणि त्याच्यासाठी आणलेले नवीन कपडे दिले. आणि निलकंठचे त्याने अभिनंदन केले.

''आक्का, तुझ्यासाठी देखील साडी आणि माझ्या मेव्हण्यासाठी शर्ट धोतर आणले आहे' भास्कर विनोद करीत बोलला.

भास्करने दोनचार दिवस आनंदाने घालविले. त्याचवेळी त्याच्या मनात आपल्या भाच्याविषयी आपुलकी वाटू लागली. त्याच्या मनात नीलकंठाला घेऊन जाण्याची इच्छा झाली. महाविद्यालयीन शिक्षण शहरात चांगले घेता येईल असे त्याला वाटले. एक दिवशी रात्रीच्या विषयात तो आपल्या बहिणीला बोलला,

''आक्का, तुला, तुझ्या नीलकंठाला खूप शिकवायचं आहे ना?''

''अरं, भास्कर हे काय इचारणं झाल व्हयं.''

''आमी जे करतुया ते सगळं निळूसाठीच बघ.''

''मग मी त्याला घेवून जातो, माझ्याबरोबर'' आक्काचे वाक्य संपते ना संपते तोच, भास्कर मोठ्या आशेने म्हणाला.

लहानाचे मोठे केलेले पोर कधीच माता-पित्याच्या नजरेआड न गेलेले. भास्करचे ते शब्द ऐकताच आक्काला काय बोलावं तेच सुचेना. ही गोष्ट तिने सीतारामला सांगितली. ''भास्कर निळूला घेऊन शहरात जातुया शिकविण्यासाठी''.

हे ऐकताच सीतारामला अतिशय आनंद झाला, पण लगेच त्याला दु:खही झाले. पण शिकवायची त्यांची जिद्द, आपले दु:ख सावरत तो म्हणाला, ''खुशाल घेऊन जा म्हणावं, त्यास्नी, मी काय बी कमी पडू देणार नाय.''

नीलकंठ आपल्या मामाबरोबर शहरात आला. तेथील वातावरण, चालीरीती, ह्या त्याच्या गावापेक्षा खूप वेगळ्या होत्या. शहरातील मोठ्या नावाजलेल्या महाविद्यालयात दाखल केले. पायजमा-शर्ट घालणारा नीलकंठ पॅंट-शर्ट घालू लागला. भास्कर त्याला मुलाप्रमाणे समजत होता. त्याला मूलबाळ नसल्यामुळे तो त्याला आपल्यापेक्षा खूप जपत होता. त्याची मामी देखील त्याचा तिरस्कार करीत नव्हती. पण, शांत, सुशील अशा त्या नीलकंठाला मित्र मिळाला तो जॉन, अतिशय उनाड, आईवडिलांच्या लाडात वाढलेला, त्याला कशाचीही चिंता नव्हती.

''निलकंठ, आज आपण पिकनिकला जावू या?''

'पण जॉन तुला तर माहित आहे, आपले किती तास बुडताहेत ते,'' नीलकंठ तिरस्काराने बोलला.

''अरे तासाला मार गोळी, आपल्याला ऐष पाहिजे, मौज पाहिजे'' त्या दिवशी सर्व मिळून पिकनिकला गेले. आणि त्याच दिवसापासून नीलकंठाच्या

जीवनाला एक नवीन वळण लागले. तो ज्या उद्देशाने शिकण्यास आला होता, त्याला तो पूर्णपणे विसरला, आपल्या आईवडिलांचे स्वप्न विसरला.

''जॉन, सिगारेट आहे कां रे?'

''यार, आज थोडंसं उदास झाल्यासारखे वाटतयं''.

लागलीच जॉनने नीलकंठला सिगारेट दिली. दोघांनी आरामात लागलीच सिगारेट ओढली. पण त्याचे रूप कालांतराने बदलत गेले. चरस, गांजा यांची नशा सुरू झाली. त्याचे शिक्षणाकडे लक्ष लागेना. मामा दिवसभर कामावर जायचा त्यामुळे त्याला विचारणारे कोणीच नव्हते, त्याच्याकडे कोणी लक्ष द्यायला देखील नव्हते.

''अरे, जॉन गांजाने चरसने काहीच नशा होत नाही''

आपण ब्राऊन शुगरचा डिलर गाठू.''

प्रत्येक माणसाची ही एक सवयच आहे. वाघाला जशी माणसाच्या रक्ताची चटक लागली म्हणजे आपली भूक भागविण्यासाठी अनेकांचे बळी घेतो तसेच मानवाचे आहे. एखाद्या व्यसनाची सवय लागली की, त्याच्यात बदल करून आपल्या आयुष्याची बरबादी करायची, त्यावेळी आपण काय करतो हे त्याला कळत नाही.

त्या दिवसापासून त्यांना ब्राऊन शुगरचा नाद लागला. त्याच्याविना त्यांना करमेना, वेगवेगळ्या प्रकारची दारू, ब्राऊन शुगर यांचा मिलाप होऊ लागला. त्यांच्या वागण्याचा घरातील कोणालाच संशय येत नव्हता. पण दुर्दैव नीलकंठाचे- कारण त्याचा मित्र जॉनला काही दिवसासाठी बाहेरगावी गेला. आत्तापर्यन्त लागणारा पैसा तो पुरवित होता त्याचा मोठा आधार गेला.

मग तो आपल्या वडिलांना पैसे मनीऑर्डरने मागू लागला. प्रत्येक पत्रात ठराविक वाक्य नमूद केलेले असायचे, त्यामध्ये फक्त पैशाची मागणी करीत असे.

''आबा, मला शाळेच्या कामासाठी पाचशे रुपये पाहिजेत, ताबडतोब पाठविण्याची व्यवस्था करावी.''

बिचारा सीताराम त्याला आपल्या मुलाच्या पत्राने आनंद होई मुलगा शहरात गेला आहे, पैसा लागणारच. कर्ज काढून तो पैसे पाठवित असे. पण नीलकंठ त्याच पैशाने ब्राऊन शुगर खरेदी करीत असे.

एके दिवशी त्याला अचानक झटके येऊ लागले. त्याचे मामा-मामी खूप घाबरले. त्यांनी ताबडतोब डॉक्टरांना बोलाविले. नीलकंठ पाण्यातून बाहेर काढलेल्या माशासारखा तडफडत होता.

डॉक्टरांनी त्याला पूर्ण तपासले आणि निराश चेहऱ्याने ते भास्करला म्हणाले '' हा मुलगा तुमचा का?''

''नाही'' ''हा माझ्या बहिणीचा मुलगा आहे''. ''शिकण्यासाठी इथं आणलाय'' भास्करने डॉक्टरांना सांगितले.

''का? काय झाले आहे? डॉक्टर''.......

''अत्यंत गंभीर केस आहे'' भास्करराव'' डॉक्टर थोड्या गंभीरपणे बोलले.

भास्करला त्यांच्या बोलण्याचा अर्थ समजेना.

''तुमच्या भाच्याला माझे प्रयत्न नाही, तर परमेश्वर वाचवू शकतो'' डॉक्टर निराशेने सांगत होते.

''काय?..... काय झाले आहे माझ्या निळूला?, डॉक्टर सांगा ना''. भास्करच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले.

''रडून काही उपयोग नाही, भास्करराव''.

''तुम्ही स्पष्ट का बोलत नाही डॉक्टर'', भास्कर थोड्या उद्धटपणे बोलला.

''तुमचा मुलगा ब्राऊन शुगरच्या व्यसनाने त्रस्त झाला आहे. त्याला जर ते वेळेवर मिळाले नाही, तर त्याचे हेच हाल होणार, कदाचित मृत्यूदेखील.

भास्करच्या मनावर डॉक्टरांच्या बोलण्याचा मोठा आघात झाला.

''काय सांगू मी आक्काला? मोठ्या आशेने त्यांनी पाठविला होता



माझ्याकडे'', भास्कररावला त्याच्या डोळ्यातील अश्रू आवरेना.

नीलकंठ आपल्या जीवनाला वाचवू शकला नाही, कारण त्याच्या मनावर झालेले संस्कार, त्याला लागलेली ब्राऊन शुगरची सवय, यामुळे त्याला मृत्यूकडे ओढले. त्याच्यापुढे डॉक्टर देखील नमले. नीलकंठाचा मृत्यू म्हणजे उमलण्याआधीच गळालेल्या कळीसारखा झाला. सीतारामच्या मनावर तर केवढा आघात झाला होता.

मुलगा जन्मल्यापासून त्याला मोठा करून ऑफिसर बनविण्याचं स्वप्न पहाणारा सीताराम, आपले जीर्ण झालेले शरीर घेऊन कष्टाच्या पायऱ्या उतरीत होता. ज्याप्रमाणे रहाटगाडग्याला गती दिली की, ते फिरत राहते, आणि गती थांबली की, पुन्हा जाग्यावर येऊन थांबते त्याप्रमाणे, सीतारामची अवस्था झाली होती.

आयुष्यभर पाहिलेल्या सुखद स्वप्नांची आठवण करीत तो आपले जीवन घालविण्याचा प्रयत्न करीत होता.

बाकी नियतीचे रंगच असे काही असतात की, ते कोणालाच कळत नाहीत.

त्या सीतारामला, नाही तर जगातल्या कोणत्याच मानवाला ते कळत नाहीत.

''ओठावरचे शब्द,
कंठातच राहिले.
कोरडे झालेले अश्रू,
पुन्हा ओले झाले.
कारण, मनच त्यात,
कठोर झाले''

◆ ◆ ◆

## साथ

नदी जरी अडवली
प्रवाह तिचा थांबणार नाही
दूर तू लोटले तरी
मी दूर जाणार नाही.

फुलाला काटा असला तरी
भ्रमराला टोचत नाही
अबोला धरला तरी
बोलल्याविना राहणार नाही.

सुमार्ग होता माझा
कुमार्ग बनविला नाही
दुःखात सुख तू दिले
साथ मी सोडणार नाही.

◆ **शकील सी. शेख**, द्वितीय वर्ष, कला

## कितीदा?

आयुष्य दुःखयात्रा, मज वाटले कितीदा
जाता पुढे सुखा, तू तुज गाठले कितीदा

हा मार्ग चालताना, काटे मला मिळाले
होते गुलाब गाली, मी छाटली कितीदा

हे पूर नेहमीचे, माझ्या नदी किनारी
छोटे तशात मीही, घर थाटले कितीदा

आहे कबूल आहे, मी गरीब आहे
श्रीमंत ह्या मनाचे धन वाटले कितीदा

आयुष्य संपले हे, अर्ध्यावरी तरीही
मी धन्यतेचे क्षण साठले कितीदा

◆ **राहुल रासकर**, प्रथम वर्ष, वाणिज्य

# "स्त्री समस्या आणि परंपरा"

श्री. दादासाहेब एजगर, तृतीय वर्ष-कला



आज काळानं अगदी भयंकर आक्राळ-विक्राळ रूप धारण केलेलं दिसते. दिवसेंदिवस माणसातली ''माणुसकी'' संपत चाललीय म्हणण्यापेक्षा संपलीच आहे असं म्हणणं फारसं वावगं ठरणार नाही. माणूस माणसापासून दुरावत चालला आहे. एक प्रकारची द्वेषभावना, मत्सर, घृणा, बेफिकीरी वृत्ती जाग्या होत आहेत. स्वार्थानं माणसं अगदी आंधळी होऊन एकमेकाचे खून पाडताहेत. सामाजातील अगदी तळागाळातील लोकांपासून ते श्रीमंत वर्गापर्यंत अगदी किरकोळ-किरकोळ कारणावरून भांडणं होताना दिसतात. सज्जनाचा बुरखा पांघरुन अगदी खुनी, मवाली फिरतात, त्यामुळे कोण खुनी आणि कोण सज्जन हे ओळखणं अगदी कठीण झालंय. समाजाचा थर न् थर हा द्वेष, मत्सर, घृणा अशा वृत्तींनी अगदी पोखरला जात आहे. समाजात जागोजाग खून, मारामाऱ्या, दंगली, जाळपोळ, दगडफेक, गोळीबार, सरकारी पैसा खाणे, अफरातफर करणे, दरोडे, हुंडाबळी, लाचलुचपत, अडवणूक, फसवणूक, भाववाढ, आर्थिक परिस्थिती, वाढती बेफिकीरी, बलात्कार इ. अनेक प्रश्नांनी संपूर्ण समाज घेरला आहे. एक प्रकारे संपूर्ण समाज दिशाहीन, अंधाऱ्या वाटेवरून वाटचाल करीत आहे.

आणि मग अशा परिस्थितीमध्ये स्त्रियांवर तर अनेक वेळा अन्याय सहन करण्याशिवाय पर्याय राहत नाही. सकाळी कॉलेजला गेलेली आपली मुलगी सुखरूप घरी परत येईपर्यन्त आई वडिलांना काळजी लागून राहते. जागोजाग स्त्रियांना अपमानाची वागणूक दिली जाते,मग ती कुणाच्या मातेच्या रुपानं, बहिणीच्या रूपानं, वा कुणाच्या पत्नीच्या रूपानं अन्याय सहन करीत परिस्थितीशी सतत तडजोड करीत आपले जीवन जगत असते. स्त्रीलासुद्धा मन असतं, दुःखे असतात, यातना असततात.पण हे जवळजवळ बऱ्याच नरराक्षसांना कळत नाही. आजची स्त्री सुधारली असली, शिकली असली तरी देखील ती अजून असुरक्षित जास्त आहे. हे आपल्याला दररोजच्या दैनिकातून, साप्ताहिकातून, मासिकातून वाचायला मिळते. त्यात बहुधा हुंडाबळी, बलात्कार अशा बातम्या जास्त असतात. भारतात हुंडाबळीविषयी म्हणायचे झाले तर दर ४५ मिनिटाला एक हुंडाबळी जात असतो असे एका आयोगाच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

प्राचीन काळापासून म्हणण्यापेक्षा अगदी मानवाच्या निर्मितीपासूनच पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीला एक उपभोगाची बाहुली बवनलं आहे. अन्याय, अत्याचार, अपमान आणि बलात्कार अशा अनेक किळसवाण्या, घाणेरड्या प्रसंगांना स्त्री तोंड देत आली आहे. आपण त्याला आपले पवित्र ग्रंथ मानतो त्या रामायण-महाभारतात देखील स्त्रियांवर अन्याय, अत्याचार होत असल्याची उदाहरणे सापडतात. रामायणात सीतेसारख्या राजस्त्रीलाही रावणानं पळविली, तिची विटंबना, कुचंबणा , अपमान केला तर यापेक्षाही भयानक रूप हे महाभारतात पहायला मिळते. द्रौपदी वस्त्रहरण घडत असताना भीष्म, अर्जुन, भीम, धर्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य यासारखे योद्धे, ऋषी होते ते देखील दुर्योधन, दुःशासनाला प्रतिकार करू शकले नाहीत. म्हणजे हे जर राजस्त्रियांच्या बाबतीत घडत असेल तर मग सर्वसामान्य स्त्रीचा दर्जा काय असेल?

अगदी पूर्वीपासून अन्यायी, अत्याचारी लोकांचे वर्चस्व आपल्या समाजावर असल्याचे आपल्याला जाणवते. जागोजाग दुर्योधन, दुःशासन, रावण वृत्तीचीच माणसं आपल्याला वावरताना दिसतात. त्यात बहुधा शाळा, कॉलेज, बसस्थानके, चित्रपटगृहे इत्यादी ठिकाणी या राक्षसांचे प्रमाण जास्त जाणवते. एस.टी.मध्ये असताना मुलींना, स्त्रियांना धक्के मारण्यात, अपमानकारक वागणूक देण्यातच धन्यता मानणारे काही महाभाग दिसतात. मुलींवर कॉमेंट्स करून, छेडछाड करुन, त्यांना अपमानकारक वागणूक देऊन अशी मंडळी



त्यातच सात्त्विक समाधान मानतात.

आजही एखाद्या स्त्रीचा नवरा मेला तर तिला विधवा समजून तिचे तोंड पहाणे अपशकुन मानले जाते. नवरा मरणे हा काही तिचा दोष नसतो तरी देखील एखाद्या पार्टीत, लग्नकार्यात, सोहळ्यात, समारंभात जाण्यास तिला अटकाव केला जातो. नवरा मेल्यावर उलट तिलाच दूषणे लावली जातात. अभागी, करंट्या कपाळीची, पांढऱ्या पायाची अशी तिची छळणूक केली जाते.

याच्या उलट जर एखाद्या पुरुषाची बायको गेली तर अगदी तिच्या दहाव्या दिवशीच दुसरी बायको करून आणतो आणि लग्नसमारंभात, शुभकार्यात, सोहळ्यात राजरोसपणे वावरताना दिसतो असा काय नियम आहे का? की नवरा मेल्यावर पत्नीने विधवेचे जीवन जगावं आणि पुरुषांनी मात्र दुसरं लग्न करून संसार करावा. तसं पाहिलं तरं दैनंदिन जीवनात स्त्रिया निरंतर कष्ट उपसत असतात. भांडी-धुणी करणे, नवऱ्याची मर्जी सांभाळणे, घरातील लहानथोर मंडळींचा मान राखणे, त्यांची बोलणी खाणे, आणि एवढे करुन जर तिला एखाद्या दाण्यावर सत्ता नसेल तर तिच्या जीवनात काय अर्थ? स्त्रीची अब्रु हे काचेचं भांड आहे, एकदा तडा गेला की पुन्हा ते जोडता येत नाही'' अशी एक म्हण आपल्या अंधश्रद्धाळू पूर्वजांनी केली आहे आणि यामुळेच एक प्रकारे स्त्रियांवरील अन्यायाला-अत्याचाराला चालना मिळते.

निसर्गानेही स्त्रीच्या वाट्याला दुःखच दिले आहे. प्रसूतीच्या काळात तर तिचा पुर्नजन्म होतो. तेव्हा खरं तर अशा वेळी तिला खंबीर आधार हवा असतो पण जर तिला मुलगी झाली असली तर तिलाच दूषणे लावण्यात येतात. मुलगा होणं किंवा मुलगी होणं हे काही स्त्रियांच्या हाती नसते आणि हे विज्ञानाने देखील सिद्ध झालं आहे. तरी देखील तिची छळणूक करण्यात येते. लग्नाआगोदर तिला समाजाकडून छळलं जाते तर लग्नानंतर सासरच्या मंडळींकडून, पतीकडून छळण्यात येतं म्हणये एक प्रकारे स्त्री जीवन म्हणजे शापीत वाटायला ल ागते.


भारतीय संस्कृतीचे जगात स्वागत केले जाते. जगात भारतीय संस्कृती श्रेष्ठ मानण्यात येते. पण स्त्रीच्या बाबत म्हणायचे झाले तर जगात फक्त भारतातच स्त्रीला अत्यंत खालच्या दर्जाची वागणूक देण्यात येते. आपल्या संस्कृतीने स्त्रीपुढे फक्त ''चूल आणि मूल'' एवढेच ब्रीद ठेवले आहे. ''स्त्री ही क्षणकालाची पत्नी तर अनंत काळाची माता आहे'' अगदी याच घोषाखाली तिची छळणूक केली जाते. एकीकडे हुंडाविरोधी भाषण करणारे पुढारी आपल्या मुलाच्या लग्नात मात्र लाखांनी हुंडा घेताना दिसतात. वारंवार मुलीच्या घरी पैशाची मागणी केली जाते आणि त्यांनी जर ती पूर्ण केली नाही तर तिला जाळून मारायला देखील हे नरकासुर मागेपुढे पहात नाहीत.

अगदी प्राचीन काळापासून अनेक स्त्रियांनी वेद, विद्या यावर अभ्यास करून अनेक विद्वानांनाही माना खाली घालायला लावून बुद्धी वर्चस्व सिद्ध केलं आहे, एवढेच नव्हे तर अनेक स्त्रियांनी स्वतः हातात शस्त्र धारण करुन समाजासाठी रक्ताचे पाट वाहिले आहेत. उदा. राणी लक्ष्मीबाई, राणी ताराबाई, अहिल्या देवी होळकर अशा अनेक स्त्रियांनी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आपला पराक्रम सिद्ध केला आहे. एवढे जरी असले तरी समाजाने त्याकडे दुर्लक्ष केले आहे. अगदी अलीकडचे उदाहरण द्यावयाचे झाले तर इंदिरा गांधी होय. इंदिरा गांधी म्हणजे स्त्री जातीच्या बुद्धीचा कळसच मानावा लागेल. संपूर्ण जगात त्यांचा नावलौकिक होता. भारताला संपूर्ण जगात मान, प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी त्यांनी अमूल्य असे कार्य केले आहे. पण हे जरी खरे असले तरी एक स्त्री शिकली म्हणजे संपूर्ण स्त्री जात शिकली असे होत नाही. अशी एखादीच इंदिरा जन्मते ती जगावर आपले वर्चस्व प्रस्थापित करून जाते. एखादीच स्त्री राणी लक्ष्मीबाई होऊन जाते.

आज असा एकही शिवाजी होत नाही जो परस्त्री मातेसमान मानून तिच्या रक्षणासाठी झगडलेला. दररोज हजारो द्रौपदीचे वस्त्रहरण होत असताना आज एकही कृष्णासारखा भाऊ वस्त्र घेऊन धावून जात नाही. भगतसिंग, राजगुरु, सावकरकर, सुभाषबाबू हे तर केव्हाच काळाच्या दरीत निघून गेलेत. आता उरले आहे फक्त सीतेला पळविणारे रावण. द्रौपदी वस्त्रहरण करणारे दुर्योधन, दुःशासन आणि माणुसकीला लाजवेल अशी कृत्ये करून कपटी राजकारण खेळणारे शकुनीमामा की ज्यांनी माणुसकीला कोणा एका अंधाऱ्या गुहेत लोटले आहे आणि सर्वत्र अत्याचार अन्यायाचे राज्य करीत आहेत.

◆ ◆ ◆

## लेखणी



असे अजब साहित्यिकाची लेखणी
उमटते गजब प्रतिबिंब, प्रकटते मन मांडणी

भरून उरली तिच्यामध्ये सागरी अथांगता
सामावली कवेमध्ये विश्वाची प्रचंडता
पडते हिमराजाची उत्तुंगता उणी
असे अजब साहित्यिकाची लेखणी

कधी घोंगावते वादळी आक्रमण
कधी स्वर्गातून प्रणयोर्मी संक्रमण
करीते प्रीत, क्रोधाची अन् पेरणी
असे अजब साहित्याची लेखणी

सामर्थ्य आहे तिच्यामध्ये सैनिकाच्या संगिनीचे
उतरती धुमसती शब्द ठरती स्फोटक रणांगणीचे
अशा प्रकारे रणमैदानी ठरते जणू रणमर्दिनी
असे अजब साहित्यिकाची लेखणी

चिरदाही करुण वेदना, दगड काळजा हालवी
आशा, प्रफुल्लता चैतन्याने, फुटे मृत मनाला पालवी
नांदते जणू अशा निराशेच्या अन अंगणी
असे अजब साहित्यिकाची लेखणी

उतरते कधी लाल क्रांती, कधी फुलविते गुलाबी प्रीती
कधी प्रवाहते शुभ्रशांती, कधी ओसंडते भगवी विरक्ती
मजला गमे ही भावना - रंगाची अन उधळणी
असे अजब साहित्यिकाची लेखणी

◆ **विनय मावळणकर**, प्रथम वर्ष, विज्ञान

## विरह

ही धार आसवांची,
तू ठेव थांबवून,
घेता निरोप माझा,
पाहू नको वळून ॥१॥

बघणार मीहि नाही,
जरी ओढतील डोळे,
विसरून जाऊ सगळे,
जे जे घडून गेले ॥२॥

होणार भेट आपली,
नाही कधीच आता,
भेटीत अर्थ नाही,
निर्माल्य प्रेम आता ॥३॥

आली तरी निराशा
ठेवीन ती मनात,
जाशील ज्या घरी तू,
तेथे रहा सुखात ॥४॥

◆ **मनोज कोष्टी**, एम्.कॉम्.





## सृष्टिकर्ता

कुणी उभेच हात जोडितो
कुणी धरतीवर गुडघे टेकितो
कुणी देवही न मानितो
परि तो त्यालाच पावतो
जो आत्म्यात त्याला पाहतो

कोणास येशूचा हात
कोणास हरीची साथ
प्रिय कोणास अल्लाची मशीद
परि प्रिय त्याला तेच असती
जे आत्म्यात त्याला पाहती

आधार तोच जगाचा
उद्धारकर्ता तोच मानवतेचा
तोच माणुसकी अन प्रीतीचा दाता
लीला त्याच्या त्यांनाच दिसती
जे आत्म्यात त्याला पाहती

◆ **सुदाम पवार**, द्वितीय वर्ष, कला

## जीवन

आपले जीवन एखाद्या गीताप्रमाणे आहे
सर्वांच्या ओठात ते सारखे तरळत असते
कुणाच्या ओठातून -
आनंदाचे सूर येत असतात
कुणाच्या ओठातून -
दुःखाचे सूर येत असतात
सर्वजण,
आपापल्या परीने ते गाणे गात असतात.
कारण,
''जीवन गाणे गातच रहावे''
असं कुणीतरी म्हटलं आहे

◆ **कु. डी.एस. हाडके**, प्रथम वर्ष, कला



## ''धरेस''

धडपड तू धरे अशी, थडथड ही मस्त हवी
मस्तवाल माणसास, जहरभरी जरब ही,

कोसळला मृत्यू शिरी, ढिगाऱ्यात रक्त झरे,
त्या तशाच जखमींची, लुटालूट कुणी करे,
डोळ्यांनी आज मुळी, वृत्त हे न वाचवते,
सर्सरते सर्व अंग, घृणा घृणाच वाटते.
कलंकित त्या कुळांस, भूधर ही सजा नवी,
मस्तवाल माणसास, जहरभरी जरब हवी.

लक्ष रक्षकांचे त्या, पेंगुळले झोपण्यात,
आणि दर्शकांची तर, नजर नजर भस्मसात
येथे काय कामाची, अशी राठ, मत्त मने,
व्यथा-भाव नसणारी, शुष्क रितीच स्पंदने,
भार फुका संपवून, असाच टाक तांडवी,
मस्तवाल माणसास, जहरभरी जरब हवी.

एक मात्र ठेव ध्यान, नको कृष्ण-खुणा करू,
पाप येथ होत हे, दे आम्हांस विस्मरू.
नको उरी वंचनाच, नको अशी कुवेदना,
संपवून सर्व सर्प, शांत, सुखी करी मना
नांदतील नवी मने, वसवतील धरा नवी.

◆ **अवधूत कुलकर्णी**, एम्.ए. (अर्थशास्त्र)



## स्वप्नवेडी

खूप बांधूनही माझं मन स्वप्नांच्या
सागराकडे धाव घेतयं
माहीत असूनही की तो शेवटी
स्वप्नांचा सागर आहे, पण...
मी एक खुळी स्वप्नवेडी...

हे स्वप्नांच्या राजकुमारा, तू नेहमी मला
या सागरांच्या लाटांमधून खुणावतोस
आणि मग मी माझी रहात नाही.
पण हे असं किती काळ चालणार रे।
कधी तू सत्यात अवतरशील
की मी खुळी आशा धरुन चालू।
आता अकालीच आयुष्याची संध्याकाळ
व्हायला सुरुवात झालीय रे...
वाट बघण्याची उमेद सरलीय
ही काया इथेच उभी राहून मातीशी
एकरूप झालीय...
कधीतरी तू या मातीवरून चालत
माझ्याकडे येशील...
एवढीच इच्छा बाकी उरलीय
तेव्हा मी माझे भाग्य समजेन
शेवटी तुझ्या चरणांपाशीच माझं
निर्माल्य आहे रे...
मी एक खुळी, स्वप्नवेडी.....

◆ **कु. आशालता गुणवरे**, द्वितीय वर्ष, कला



## मृगतुषार

व्हावा मृगतुषारांचा वर्षाव
आता, या तप्त भूमीवरी

मग जातील भेगाच विरुनि
या भेगाळलेल्या भूमीच्या

पावेल नष्ट ही तप्त हवा
अन् मिळेल दिलासा या जीवा

होईल पृथ्वीच सारी थंड
मग या भूमीचा सुटेल सुगंध

तृप्त बीजांकुर घेतील जन्म
मग, येईल शोभा या निसर्गा

होईल पृथ्वीच हिरवी-पिवळी
नांदेल आनंदी आनंद चोहिकडे

मिळेल तकवा मग निस्तेज जीवांना
अन मानतील आनंदाभार या मृगतुषारांचे

◆ **दत्ता येडे**, एम्.ए. मराठी





## याला जीवन ऐसे नांव

जीवनात माणसानं फुलायचं असतं
कुजायचं नसतं
अंगभरल्या वेलीनं वाढायच असतं
पण खुंटायचं नसतं,
दुःखाचे कढ सोसत सोसत
पुढं चालायचं असतं
पण उरी जखम घेऊन थांबायचं नसतं
वादळी वाऱ्यातून वाट काढीत
जीवनात चालायचं असतं,
पण ''गती''ला थांबायचं नसतं
फाटक्या तुटक्या स्वप्नात डुंबायचं असतं
अन.........
मरणाच्या दशात देखील
हसत हसत सामोरे जायचं असतं
आयुष्यात जे जे मिळविता येईल
ते ते मिळवायचं असतं
यालाच खरखुरं जीवन म्हणायचं असतं

◆ **दवणे व्ही. के.**, तृतीय वर्ष, कला

# कविता

## अर्थ

अर्थ जीवनाचा शोधण्यात,
होतो मी मग्न
मनानेच माझ्या प्रश्नाचे,
केले निराकारण ॥

असतो भ्रमर फुलात जसे,
असते जीवन सुखदुःखाच्या नगरीत तसे,
भाग्यात आपुल्या काय असे,
ठाऊक ते कुणालाच नसे ॥

भ्रमर करतो प्रेम फुलावर,
करावे तसे प्रेम जीवनावर,
हरके क्षणी सुखदुःखाच्या ,
आनंदाच्या असावे शिखरावर ॥

विशिष्ट एक ध्येय ठेवावे,
प्राप्त करण्या ते यत्न करावे,
त्यात स्वतःला झोकून द्यावे,
सदासर्वदा ईश्वरचिंतन मात्र करावे ॥

◆ **संदीप कवीश्वर**, १२ वी, विज्ञान



# का निसर्गा रुसलासी आमुच्यावरी

सायंकाळी एकेवेळी, लोक विसावले कुशीत तुझ्या
तथा न ठावे काय घडेल, आपुल्यावरी उद्या
लहान बालके झोपुनी गेली, आईच्या कुशीमध्ये
का केलास कोप निसर्गा, तू त्यांच्यावर ॥१॥

पहाटेच्या त्या रम्य समयी, निद्रेत होते सकलजन
त्यांना तू उठविलेस, भूकंपाचा धक्का देऊन
काय घडले हे कळण्यापूर्वी जमीन हादरली सारी
आभाळासम माया करणारी, घरेच पडली अंगावरी ॥२॥

आया-बाया ओरडू लागल्या, मुले बाळे रडताती
त्या सर्वांना काय ठावे की काळ आला आहे जवळी
सुंदर स्वप्नांमध्ये, रंगलेले सकलजन
यम पाहुनी दारात, उमरगा आणि किल्लारी
जीव आपुला मुठीत घेऊन, लोक पळती घरातुनी
आणि उरली सुरली, घराच्या आत चिरडली
जीवनाचा अर्थ कळण्यापूर्वी, तरुण गेले स्वर्गापरी ॥३॥

◆ **उद्धव कदम**, तृतीय वर्ष, वाणिज्य


## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयीन सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित

**बारामती (पुणे)** ❑ नोंदणी क्र. १०१० ❑ स्थापना ४ ऑगस्ट १०८३

**संस्थेची सांपत्तिक स्थिती**

- ▲ सभासद संख्या - १४९
- ▲ संस्थेचे वसूल भाग भांडवल - रु. १४, ३०,०००/-
- ▲ निधी - रु. १.५८ लाख
- ▲ गुंतवणूक - रु. ४.०७ लाख
- ▲ वैयक्तिक कर्ज मर्यादा - रु. ६०,०००/-
- ▲ अकस्मीक कर्ज मर्यादा - रु. १,५००/-
- ▲ कर्जावरील व्याज दर - रु. १६ टक्के
- ▲ लाभांश दर - रु. १२ टक्के
- ▲ ऑडीट वर्ग - ''अ''

**ठळक वैशिष्टये :**

तत्पर व विनम्र सेवा, मृत सभासदाचे वारसास रु. २,५००/- विनाअट रोख रक्कम, हायर पर्चेस करिता कर्जाची सोय, ठेवींवर आकर्षक व्याजदर

**श्री. डी.एल. पारख**
खजिनदार

**प्रा. डी.व्ही. सरवदे**
सचिव

**प्रा. बी.बी. पाटील**
अध्यक्ष

- संचालक -

**प्रा. के.एस. सनगर**
**श्री. एम.ए. सावंत**
**प्रा. नलिनी कृ. शाह**
**प्रा. आर.के. नाळे**
**श्री. वाय.के. कुलकर्णी**
**प्रा. सौ. नीलम अ. पाटील**
**प्रा. इ.के. पाटील**
**श्री. आर.जी. शहा**




# EDUCATION IN DAILY PRACTICE

**Miss. Sul Manisha N.**
T.Y.B.Sc.



Education is the most primary necessity in our life which teaches us how to behave in life,in society and how to maintain our status. We always learn something from our childhood. We remain students throughout the life. But education is different from the other things. Education is not merely the things we learn in our school, college, from our teachers etc. Education is the bipolar process in which there should be a co-ordination between the teachers and the students. In this process, what our teacher teaches and what we pick up is important.

Education imparts much better things in our life. Taking the degree we get by studying hard is of no great use. Our knowledge should not remain upto the degree only, but we should practise it in our daily life which is expected. I would like to express something regarding this. Firstly, we see many people, many students smoking as well as taking drugs. They all know the physiology of our body, especially the science students who study everything about this, and know the effects of these drugs on their health, their brain.

Secondly the dowry system which is a very infuriating thing for the girl who is completely independent of others, educated, and self-earning; then what is the need of this dowry? why do we expect our household things from others? Why don't we think about others? If their expectations,and demands are not fulfilled, they become demons and burn the girl & alive or kill them or make them commit suicide. And to our surprise this evil is found mostly among the literates and the educated people. Then what is the use of their education?

Science has advanced in all respects. Man being an intelligent animal, discovered the power even in a small atom. He prepared many destructive weapons. But the struggles which arise from the problems of caste, creed, religion and many other such things make us use these weapons, because of which many people have to lose their lives which is nothing but self-destruction only. Why do we always accept the bad things?

Further more, unemployment has become a serious problem these days. In the age of computers and machineries it is not possible for everybody to get a job. Many students have to face the boards of 'No Vacancy' everywhere. At last many such people sit at home, roaming here and there. Then why don't they strat any business or do any such thing which would benefit them as well as others? Why don't they use their agricultural knowledge on their farms? It is also a type of business only.

Many such questions strike my mind, I wonder why these students, forget their knowledge? What makes them act in such a way? Their degree is not only a showy thing. We should find their knowledge, their education in their activities. And to my mind it's a challenge to us. God has given us a golden chance. So, dear friends try to accept this challenge and be a real literate, a real educated person.

◆ ◆ ◆



# COMPUTER APPLICATIONS

**Mr. Ramchandra Jare**
S.Y. B.Sc. D.C.A

There is no field in the world where computers cannot be introduced. Why is it that we cannot go through life without computers? From being complex and intimidating gadgets a few years ago, computers have today become highly user-friendly and indispensable to our everyday life.

Computer is an electronic high speed device which can understand only two digits, 0 and 1. It consists of different parts (i) Monitor (ii) Keyboard (iii) Printer. When we provide proper 'in put' into the process it generates the 'output' in a different manner. Now-a-days the tendency of human beings is towards finding more leisure & repose. That is why the computer is preferred by human beings.

The computer has different applications in different areas such as scientific research, business, payroll and personnel record, stock-control and sales, banking, industry, Electricity, steel, printing and paper, Engineering Design, Air travel, transportation traffic control, telephones, medicine, Libraries and Museums, education etc. Computer can be useful in making the simulation of different processes. The preview of many processes can be prepared before actually performing that process. In the scientific field different experiments are performed such as titrations, Frog dissections and sonometer. Similarly it can be useful in making different hair styles on the computer screen. The satelite communication can be done with the help of computers. In a crowded city like Bombay or Delhi or Calcutta or Madras computer can be used for railway booking. Day by day student capacity is increasing in schools, colleges and universities. Hence for purposes of administrative efficiency we require computer. As computers are essential to prepare the examintion results, correspond quickly, the computer has itself become the teacher in the educational field.

The computer is capable of performing millions of calculations per second and even store a large volume of information using very small space. No wonder that we can use the computer in every field and every walk of life, that's why the computer is inseparable from human being.

◆ ◆ ◆

## FLOWERS AND CHILDREN

With every dawn of our life,
On this beautiful earth,
Lovely, little blossoms of flowers do appear
Of various shapes, colours and fragrance;
Each flower like a child does seem
To yield happiness to all eyes and hearts;
Like children, they comfort our lives,
To gods they are dear as children are,
And at God's feet they lie;
Flowers are the heralds of Nature and seasons,
They throng our houses and gardens,
As children do on holidays and festive days;
The twosome, children and flowers,
Are everywhere, indistinguishable, inseparable.

**—Mr. Kavishwar Sandip**
XII Standard Science



# IT IS BETTER TO RETIRE GOD

**Mr. Acharya Vishram V.**
English Certificate Course



The whole universe and this beautiful earth is a gift of God. But one question arises in my mind- who created God? The answer is not very difficult to seek. We the people and the society gave birth and credibility to God. The prime reason for this can be found in our own selfishness.

From ancient times, we have been living under a wrong influence of an invisible personality. We are just considering that there is God, who has great power. In the name of God we are doing a few things that are good and others which are mostly bad. Today, the time has come that we think about all this.

First, it is necessary to know for what reasons the birth of God has taken place. It is necessary for every human being to live under control, for a safe and orderly life. So, people created God. In fact, God is a concept. Its central idea is 'satyam, shivam and sundaram.' The words mean, 'truth, beauty and God.' Add to this, holiness of mind, helpfulness and respect for others. All good things are related to this concept. Human beings are always guided by these principles, in their day-today behaviour with one another, the family and clan and society at large. These are the values of life. so, our forefathers bound all these values together and created the concept of God, to establish a moral order. They built temples where we get peace of mind and keep our minds pure.

As time passed the concept of God changed. The priests, pundits, and kings made tremendous changes in the concept of God to suit their selfish ends. Today we are following their tenets. People accepted this wrong image of God. Today people have many superstitions about God. Very few people understand what actually is meant by the term 'God'. But the majority of people do lot of bad things for this imaginary God. They give money, and everything in the name of God. Many times they kill animals to appease this God. We hear the news of killing a person to appease a god and to have a baby or other forms of prosperity.

Nobody seems to be serious about knowing the reality. What is the truth about? Priests and people alike do not seem to share with others their concept of God. Behind all this ignorance or wilfulness there are a few reasons. One thing is illiteracy. The iliterate of our country and also the so-called educated people possess a limited level of comprehension of abstract ideas. So, they naturally follow the existing old unchallenged concepts blindly. The second reason is politics. Politicians do not generally wish that people know the truth for perhaps there is no truth that they do know! This has been the case from old times. In ancient days kings and rulers had done things which politicians are doing in order to gratify their selfish desires.

From ancient times people believed in different forms of God. This led to the division of society into castes and creeds and groups according to the god each group worshipped. Then social segregation and stigmas came to be attached to each group. In this way religion became an integral part of society. Today this religion is being utilised by politicians to

gain their ground at the cost of the vast majority of people who toe their line. In Indian religions more significance is attached to rituals. Conflicts among groups of the same religion also surface due to the different attitudes in the practising of rituals. Thus, it is not wrong to say that gods and different forms of the One Universal God has created religious fundamentalism.

Now that we are on the threshold of the 21st century it is high time that we started thinking about the problem of God. Should we develop a more scientific attitude to God and Godliness and Godhood? Should God and Religion have a limited place? God cannot be totally dismissed from human life. He is the foundation of our moral spiritual being. The world today calls for hardwork and procurement of welfare and prosperity to the millions. So, more than God, what we need is faith and self-confidence. National prosperity is a more important thing than personal and public religion. So, is it correct to say that God with His old incorrect image should be retired? Yes.


**THE MUSLIM CO-OPERATIVE BANK LTD.**

REGISTERED OFFICE :
633, Raviwar Peth, "Saifee Mahal",
Pune-411 002.

Phones : 444177, 441021

ADMN. OFFICE :
326 B, Raviwar Peth, "Kachi Corner",
Pune-411 002.

OUR SPECIAL FEATURES :

1st Bank implementing the 20 point Programme since the begining of the Programme.

Our Bank is included amongst the first 100 top co-operative Bank in India.

Authorised Bank for NRO/NRE (Rupee) accounts.

Drop at any of our following branches for quick and personal services.

HEAD OFFICE
633, Raviwar Peth, Pune-411 002.
CAMP BRANCH
48, M.G. Road, Camp, Pune.
LADIES BRANCH
984, Bhawani Peth, Pune-411 002.
KIRKEE BRANCH
66, New Bazar Kirkee, Pune-411 003.
BARAMATI BRANCH
New Bhaji Mandai, Baramati.
LONAVALA BRANCH
191, Tilak Road, Lonavala.

MOMINPURA BRANCH
233, Gunj Peth, Pune-411 002.
YERODA BRANCH
102, Yeroda, Pune-411 006.
PUNE SATARA ROAD BRANCH
23, Mukundnagar, Pune-411 037.
WANORIE BRANCH
(With Safe Deposit Locker)
19/A, Pune Sholapur Road, Himalyan Heights, Bhairoba Nala, Pune-13.
KONDHWA BRANCH
(Opening Shortly)
EXTENSION COUNTER OF CAMP
(Opening shortly at Haji Gulam Mohammed Azam Eduucation Trust, Pune-411 001.)

FINANCIAL POSITION OF THE BANK AS ON 28.1.94

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | SHARE CAPITAL | : | 1,07,87,000 |
| 2. | RESERVE & OTHER FUNDS | : | 2,26,46,000 |
| 3. | DEPOSITS | : | 26,35,67,000 |
| 4. | ADVANCES | : | 18,26,95,000 |
| 5. | NUMBER OF MEMBERS | : | 16,538 |
| 6. | AUDIT CLASS FOR 91-92 | : | 'A' |
| 7. | DIVIDEND (92-93) PROPOSED | : | 14% |
| 8. | BONUS TO REGULAR LOANES | : | 28.24% |

MOIZ SANJELIWALA
Chief Ex. Officer


ABU BADSHA SHAIKH
Vice Chairman

MOHAMMEDSAB F.A. SHAIKH
Chairman




# "INDIA'S POPULATION EXPLOSION

Mr. MANE PRABHANJAN B.
F.Y.B.A.



A sudden and tremendous increase in population within a short period of time is called 'population Explosion'. India is the second most populous country in the world after China. Indian population in 1901 was about 235 millions, in 1947 it increased to 345 millions and in 1981 it became 685 millions. That is, India is growing by 16 billion and by the year 2000 A.D. according to the Registrar, Govt. of India, India's population would be between 959 to 1053 million.

In our country it is supposed that every woman must marry & every man must have a son. In India a child is considered as a "Gift of God". There are so many causes of population explosion such as :

a) High birth rate in India is due to early marriage; due to this the child-bearing period for women is maximum i.e. about 30 years.

b) Majority of people in India are illiterate and ignorant about family-planning. They don't know the methods of controlling & checking births.

c) Advancement of medical science, utilisation of powerful medicines like antibiotics, eradication of dangerous diseases like small-pox and improvement in food supply decreased the death rate in India.

Owing to population explosion in India, there are many problems which our country cannot face properly. The problem such as shortage of accommodation, is one. Owing to over-crowding people have to live in slums in most unhygienic surroundings. Over-population leads to inadequate and unbalanced food. Hence because of starvation people fall an easy prey to diseases. Population explosion affects standard of living, food supply and also health.

In order to check population explosion, Govt. of India adopted a national programme policy in 1976;

a) The minumum age of marriage is raised from 18 to 21 years for males and from 15 to 18 for females.

b) Abortion is made legal and encouraged.

c) Birth - control devices are mass produced and supplied free or at low cost.

d) Family planning propoganda was stepped up especially in rural areas.

e) Motivational media such as radio, T.V., newspapers etc. are used to spread family planning message.

If we want to live not only in India but also on the earth we must control population. Otherwise our children or grandchildren cannot live comfortably and happily on earth.

◆ ◆ ◆

# "EDUCATION SHOULD BE EMPLOYMENT-ORIENTED"

Mr. Kalange Vijay E.
Certificate Course in English



Unemployment and under employment are the biggest challenges today and we are sitting on a volcano. Education with its holistic character is indispensable for the progress of our nation. The problem of employment is as invisible in the national context as peace in the international parlance. The problem of unemployment is common to the educated, non-educated, skilled, unskilled, higher caste and lower caste also. The youth today passes out of college only to face a dark gloomy future. Degrees do not offer jobs, no career. Graduation is of no value today, and many graduates have to be content with small jobs, which they do because they didn't have any alternative. If anyone got jobs they have no practical knowledge at the job or have to begin from the start. Then what is the aim of education today if it cannot provide the knowledge required for working in various fields?

*However, instead of blowing hot and cold on this controversial subject, we should set all prejudices* aside and objectively view that the education system must be changed. Making education job-oriented will certainly be a change for the better. On the other hand our education Policy would provide job-oriented or employment-oriented, skilled, trained and motivated manpower to develop and maintain sophisticated technologies. The education which is job-oriented must be meaningful, scientific-action-oriented-policy. Dissemination of proper knowledge would serve as effective raw material for equal opportunities and for rapid modernisation of the economy of the country.

I mean to say that education must be job-oriented that is, it should be of a vocational type. Not only will youth be satisfied early and good opportunities available to them but also their country will prosper from their increased knowledge of technical matter. But there should be a balancebetween rural and urban job opportunities with an integration of manual - intellectual work, agriculture - industrial jobs, national progress and international competition. All-round effort with proper analysis of situation will create jobs.

Making the education system job-oriented could prove detrimental to the urge of the present generation to quench its intellectual thirst. It would be a big disappointment for the multitude of Indian students who wanted or wished to go for higher education in faculties not exactly job-oriented. The Govt. cannot deny the right of the youth to go in search of knowledge in whatever faculty they choose.

The right to acquire knowledge is fundamental to our culture and civilisation and no one has any justification for snatching away this basic right of the young Indian generation's exposure to a wider spectrum of this education Policy. That is, the education must be firstly employment-oriented and then diverted to acquirement of intellectual abilities.

◆ ◆ ◆



# POETRY SECTION

## TO NELSON MANDELA

(On his release)

Iron man, man of vision
who will forget?
Those dark days in prison
You willingly spent
Still keeping alive
The fire of love in your heart
For those brothers
Humble and starved,
Outsiders in their own country;
But an eclipse cannot keep
the sun forever in its grip,
so the sun is released now
to bath(e) the earth
with torrents of light;
who will forget?
Those seconds and minutes
hours and days
weeks and months
year after year
amidst the iron bars,
Not for the people to remember them
as the golden moments of history
but light the fire of love
in the hearts of men;
love to embrace the world
and together to nurture the tree of humanity
Let's sing, sing in the praise of
this Master-man;
Sing of his courage and struggle for humanity
Sing of his sacritfices and his victory!

**—Mr. Khandale**
M.A. Part I (English)

◆ ◆ ◆

## FRIENDSHIP

Friendship is like mathematics,
Friends to add,
Joys to multiply,
Enemies to subtract,
And sorrows to divide.
Friendship is like china-ware,
Costly, rich and rare,
Once broken, it cannot be mended,
But the crack is always there.
Make new friends,
But don't forget the old ones,
because the new may turn at odds with,
Remember, 'Old is gold'.

**—Mr. Koshti Manoj D.**
('Mayur') M.Com. Part I

## TRUE RESPECT

He is a State Minister,
Becomes a public speaker,
Respects a door-keeper,
Not a duty-keeper;

Dresses like a barrister,
Knows less of manners,
Respects a waiter,
Who always serves better;

He is welcomed with banners,
Respects a deceiver,
Imagines this is clever,
To him it does not matter :

What is rare?.....
Respect to those who care and deserve!

**—Miss Paithankar V.Y.**
F.Y.B.A.

*With Best Compliments From*

**DATTA AND COMPANY**

**SUPPLIER IN BIOLOGICAL MATERIAL**

**Botany Class-Work Material, Permanant Slides, Herbarium, Museum Specimens, Palaeobotany Slides and Charts**

Sarvodaya Housing Society,
House No. 419, Survey No. 14, Jay Jawan Nagar,
Yarawada, Pune-411 006.

हार्दिक शुभेच्छा!

अधिकृत डिस्ट्रीब्युटर : **फिलिप्स इंडिया**
डिलर : **सिंफोनी एअर कुलर, ओरियन्ट, सीन्नी, क्रॉम्पटन ग्रीव्हज फॅन, अँकर मटेरियल, सोलर वॉटर हिटर**
तसेच सर्व प्रकारच्या इलेक्ट्रिक मटेरियलसाठी

**गादीया एंटरप्रायजेस**

२०, गणेश मार्केट, बारामती. फोन : दुकान-२१३०, निवास-४०३३



# जिमखाना अहवाल

## (वरिष्ठ महाविद्यालय)

(१) पुणे जिल्हा आंतर-महाविद्यालयातील स्पर्धांमधील महाविद्यालयाचे विजयी व उपविजयी संघ.

| संघ | विजयी/उपविजयी |
|---|---|
| १) मल्लखांब (मुले) | विजयी |
| २) कुस्ती (मुले) | जनरल चॅम्पीयनशिप |
| ३) बॅडमिंटन (मुली) | उपविजयी संघ |

(२) पुणे जिल्हा क्रीडा विभागाकडून महाविद्यालयाचे आंतर-विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू.

| | | |
|---|---|---|
| १) मल्लखांब (मुले) | - | २ |
| २) हॅण्डबॉल (मुले) | - | २ |
| ३) बास्केटबॉल (मुले) | - | २ |
| ४) बॅडमिंटन (मुली) | - | २ |
| ५) कुस्ती | - | २ |
| ६) वजन उचलणे | - | २ |

(३) अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ स्पर्धेसाठी पुणे विद्यापीठातर्फे महाविद्यालयाचे निवडलेले खेळाडू
१) श्री. सुभाष विठ्ठल पवार - क्रॉस कन्ट्री (मुले)

(४) १९९३-९४ या वर्षात आपल्या महाविद्यालयाचे आंतर महाविद्यालयीन हॅण्डबॉल (मुले) स्पर्धेचे आयोजन केलेले होते.

(५) श्री. गोपी वसंतराव गायकवाड (माजी विद्यार्थी) याची १९ वर्षाखालील कुमार गटात भारतीय क्रिकेट इंग्लंड दौऱ्यासाठी निवड झाली आहे हे महाविद्यालयाला भूषणावह आहे.

खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन.

**-प्रा. सुरेश इंगवले,**
शारिरिक शिक्षण सचालक

# जिमखाना अहवाल

## (कनिष्ठ महाविद्यालय)

**आयोजित क्रीडा स्पर्धा :**
१) तालुका पातळीवरील मैदानी स्पर्धा : मुले/मुली
२) गटपातळीवरील फुटबॉल स्पर्धा : मुले
३) गटपातळीवरील बास्केटबॉल स्पर्धा : मुले/मुली
४) गटपातळीवरील मैदानी स्पर्धा : मुले/मुली

**महाविद्यालयातील विविध खेळातील यश :**
१) व्हॉलीबॉल (मुली) : सासवड येथे झालेल्या जिल्हा पातळीवरील व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये उपविजयी संघ.
२) खो-खो (मुले) : हडपसर येथे झालेल्या जिल्हा पातळीवरील खो-खो स्पर्धे-मध्ये उपविजयी संघ

**विविध खेळातील यशस्वी खेळाडू :**

कबड्डी (मुले) : अखिल भारतीय पातळीवरील कबड्डी स्पर्धामध्ये प्रवेश (मध्य प्रदेश, सतना) येथील स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य संघामध्ये श्री. संतोष झगडे यांची निवड झाली.

खो-खो : अहमदनगर येथे झालेल्या विभागीय पातळीवरील व्हॉलीबॉल चाचनी स्पर्धेसाठी श्री. किशोर पटेल आणि कु. सुनिता खिंडारे यांची निवड झाली.

मैदानी स्पर्धा : पुणे येथे झालेल्या विभागीय पातळीवरील मैदानी स्पर्धासाठी श्री. जितेंद्र पटेल आणि कु. सुनिता खिंडारे यांची निवड झाली.

सासवड येथे झालेल्या जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेमध्ये-
१) श्री. जितेंद्र पटेल ८०० मीटर धावणे/द्वितीय क्रमांक
२) श्री. नजीर शेख थाळी फेक, गोळा फेक /तृतीय क्रमांक
३) कु. सुनिता खिंडारे-भालाफेक/द्वितीय क्रमांक
४) कु. पोर्णिमा शेट्टी - थाळीफेक/तृतीय क्रमांक

खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन!

**-श्री. बबन गावडे,**
शारिरिक शिक्षण संचालक

# "ग्रंथालय अहवाल"

आमचे महाविद्यालय हे पुणे विद्यापीठ कक्षेमधील ग्रामीण भागातील एक अग्रेसर महाविद्यालय आहे. आमच्या महाविद्यालयाचे खास वैशिष्ट्य म्हणजे आमचे सर्वात मोठे व ग्रंथसंपदेने परिपूर्ण असलेले ग्रंथालय. ग्रंथालयाच्या वैभवामध्ये प्रत्येक वर्षी आमच्या विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक, कर्मचारी व इतर असंख्य वाचकांच्या वाचन गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने क्रमिक, संदर्भ व इतर विषयांच्या ग्रंथांची भर घालत आहोत. १९९३-९४ या शैक्षणिक वर्षामध्ये खालीलप्रमाणे ग्रंथालयात वाढ झालेली आहे.

दि. ३१-३-१९९३ अखेरची ग्रंथसंख्या ७७९२६ इतकी असून त्यांची एकूण किंमत रु. १९,५२,०८४.६६ इतकी होती.

१९९३-९४ मध्ये नवीन घेतलेली ग्रंथसंख्या १३१२ इतकी असून त्यांची एकूण किंमत रु. १,३९,१३६.०७ इतकी आहे.

१९९४ अखेर एकूण ग्रंथ संख्या ७९२३७ इतकी आहे व त्यांची एकूण किंमत रु. २०,९१,२२०.७३ इतकी आहे.

या वर्षअखेर एकूण नियतकालिके १६९ असून त्यांची अंदाजे किंमत रु. १२,०००.०० इतकी आहे.

या वर्षअखेर वर्तमानपत्रे २६ असून त्यांची अंदाजे किंमत रु. १७,५००.०० इतकी आहे.

बुक बँक योजनेमधून कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या ४९३ विद्यार्थ्यांना एकूण २१४५ पुस्तकांचे वाटप करणेत आले.

**स्पर्धा व सामान्यज्ञान परीक्षा ग्रंथ साहित्य :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग, सी.ए., आय.सी.डब्ल्यू.ए., आय.आय.टी., मेडिकल, इंजिनिअरींग, डी.बी.एम्., एम्.बी.ए., सामान्यज्ञान व इतर स्पर्धा परीक्षेकरीता आवश्यक अद्ययावत ग्रंथ संपदा व माहितीपत्रके उपलब्ध करून देण्यात येतात.

**अभ्यासिका :** आर्टस, कॉमर्स व अंडरग्रज्युएट विद्यार्थ्यांसाठी तसेच सायन्स व पोस्टग्रॅज्युएट विद्यार्थ्यांसाठी दोन स्वतंत्र प्रशस्त अभ्यासिका (रिडींग रुम) ची सोय उपलब्ध केलेली आहे. तसेच रिसर्च करणाऱ्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांना स्वतंत्र क्युबिकल्सची सोय केलेली आहे.

**ग्रंथालय व माहितीशास्त्र :** आमच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचे उज्ज्वल निकाल परंपरेचे वैशिष्ट्य, मे, १९९३ मध्ये झालेल्या परीक्षेचा निकाल ८४ टक्के लागून परंपरा कायम राखण्यात आली असून या वर्गातील विद्यार्थ्यांना पुणे विद्यापीठ जयकर ग्रंथालयाचे निवृत्त ग्रंथपाल प्रा. प्रभाकर स्वामी, निवृत्त रिडर प्रा. शेवडे विद्यमान ग्रंथपाल प्रा. डॉ. कोण्णूर, प्रा. सौ. देशपांडे, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे येथील ग्रंथपाल प्रा. अनंतराव जोशी, प्रा. लेले तसेच मराठवाडा विद्यापीठाचे निवृत्त ग्रंथपाल प्रा. जोगदेव यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

**ग्रंथभेट :** यावर्षी खालील संस्था व मान्यवरांनी मौलीक ग्रंथ ग्रंथालयांस भेट दिलेले आहेत.

१. प्राचार्य श्रीधर हेरवाडे, जयसिंगपूर, २. श्री. कुंदकुंद भारती, नवी दिल्ली, ३. फडके प्रकाशन, कोल्हापूर. ४. प्रगती एजन्सीज, पुणे. ५. मॅपिन पब्लिकेशन, अहमदाबाद, ६. जिल्हा माहिती अधिकारी,पुणे ७. श्री. के. ए. रणदिवे, ८. प्रा. ए. बी. देसाई, ९. प्रा. के. एम. जाधव, १०. प्रा. डॉ. सी. व्ही. मुरूमकर, ११. डॉ. जी. पी. चव्हाण, पुणे, १२. श्री. ए. जी. घन, वालचंदनगर

आमच्या अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे सर्व पदाधिकारी, मा. प्राचार्य, सहकारी प्राध्यापक व शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी व ग्रंथालयीन सेवकवर्ग यांच्या बहुमोल सहकार्यामुळे आम्ही विविध शैक्षणिक व अभ्यासपूर्ण उपक्रम आणि सेवा समाधाकारकपणे पार पाडत आहोत.

**-प्रा. सुरेश पाटील, ग्रंथपाल**



# प्रौढ शिक्षण कार्यक्रम

संपूर्ण पुणे जिल्हा साक्षर करण्याच्या कार्यक्रमाचा प्रथम टप्पायावर्षी पार पडला हे यावर्षीचे वैशिष्ठ्य. आता साक्षरोत्तर कार्यक्रमास सुरुवात होत असून त्यातही हे महाविद्यालय आघाडीवर असेल.

पुणे जिल्हा साक्षरता आंदोलन मंचतर्फे होणाऱ्या या कार्यक्रमात आमचे महाविद्यालय आघाडीवर राहिले. ११७ प्राध्यापकांपैकी १०२ प्राध्यापक ४०३३ विद्यार्थ्यांपैकी १८०५ विद्यार्थी, बारामती शहरांतील ८ वॉर्डसमधील एकूण ६८५ निरक्षरांना पूर्ण साक्षर करणे, तसेच तालुक्यातील ५२ गांवे-वस्त्या येथील एकूण १४९८७ निरक्षरांशी संपर्क असे भरघोस कार्य यावर्षी झालेले आहे. अर्थात हे जनआंदोलन असल्याने याकामीअनेकांचे सहकार्य आम्हास लाभले.

यावर्षीच्या कार्यक्रमाची सुरुवात मे १९९३ मध्ये पुणे विद्यापीठाच्या हिरवळीवरील भव्य मिटिंग झाली. त्यास मा. प्रकुलगुरु डॉ. मोहनराव हापसे. मा. जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी, जि.प.चे कार्यकारी अधिकारी डॉ. नितीन करीर, प्राचार्य इ. मान्यवरांनी मार्गदर्शन केले. नंतर ६/७/१९९३ च्या विद्यापीठ मिटींमध्ये कार्यक्रमाची रूपरेषा ठरली, त्याअंतर्गत दि. १०/७/१९९३ रोजी तेव्हाचे मा. प्रांतसो. श्री.देशमुख यांचे कार्यालयांत ''कोअर स्टाफ''ची मिटींग झाली. २७/७/१९९३ रोजी महाविद्यालयास प्रा. तेज निवळीकर, संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ व एन.एस.एस. प्रमुख प्रा. नंदकुमार निकम यांनी भेट देऊन प्रौढ साक्षरता कार्यक्रमाचा आढावा घेतला.

दि.३/८/१९९३ रोजी अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री.धर्माधिकारी यांनी महाविद्यालयास भेट देऊन विद्यार्थी व प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. दि. १३/८/१९९३ रोजी माळेगांव कारखान्यावर एक भव्य मेळावा आयोजित करण्यांत आला. सदर मेळाव्यास लोकप्रिय युवकनेते मा. अजित पवार यांनी अंतिम मूल्यमापनाच्या दृष्टीने तालुक्यातील साक्षरता कार्याचा आढावा घेऊन मार्गदर्शन केले. याप्रसंगी मा. जिल्हाधिकारी, तसेच मा. श्री. विक्रम बोके इत्यादी मान्यवर हजर होते.

दि. २२/८/१९९३ रोजी पुणे विद्यापीठात ''साक्षरता सहविचार'' सभा झाली. त्यासभेस विद्यापीठाचे पदाधिकारी, शासकीय अधिकारी व जिल्ह्यातील सर्व प्राध्यापक हजर राहीले होते. आमच्या महाविद्यालयाचे १०० प्राध्यापक त्या सभेस उपस्थित राहिले.

दि. ८/९/१९९३ आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त प्रौढ शिक्षण विभाग, एन.एस.एस. व एन.सी.सी.मधील विद्यार्थी व प्राध्यापकांनी साक्षरता दिंडी शहरांतून काढली. दि.८/१०/९३ व ११/१०/९३ रोजी अनुक्रमे अल्पबचत भवन व श्रीधरस्वामी सभागृहात आढावा बैठका झाल्या. बैठकीत मा. प्रांतसो. व मा. नगराध्यक्ष श्री. सदाशिवराव सातव यांनी मार्गदर्शन केले. दि. १३/१०/९३ रोजी कर्वे इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेस, पुणे येथे अंतिम मूल्यमापन समिती सदस्यांची मिटिंग झाली. अंतिम मूल्यमापन अधिकारी म्हणून प्रा. पंढरी ए.एस. यांची निवड झाली. त्यांनी तेथे ट्रेनिंग घेतले.दुसऱ्या दिवशी आमचे १० विद्यार्थी तेथूनच बाहय मूल्यमापक म्हणून ट्रेनिंग पूर्ण करून आले. दि. १८/१०/१९९३ रोजी आमचे १६ प्राध्यापक सांस्कृतिक केंद्र बारामती येथे मूल्यमापक ट्रेनिंगसाठी जाऊन आले. त्याच दिवशी श्री. तेज निवळीकर यांनी भेट दिली.

अंतिम बाहय मूल्यमापन कर्वे इन्स्टिटयुट, एस.एन.डी.टी. महाविद्यालय, पुणे यांचेतर्फे दि. १/११/९३ ते दि. ५/११/९३ दरम्यान झाले. यानिमित्त दररोज बैठका झाल्या. त्यात माजी प्राचार्य एस.पी. कदम, डॉ.सुर्वे, प्रा. पंढरी, वॉर्डप्रमुख जातीने हजर रहात. या कामी मा. प्रांतसो., बी.डी.ओ., तहसिलदार, नगराध्यक्ष, चीफ ऑफिसर, नगरसेवक यांनी चांगले नियोजन व मार्गदर्शन केले. बाहय मूल्यमापनासाठी मूल्यमापक कमी पडल्याने १० जादा विद्यार्थ्यांची मागणी महाविद्यालयाने त्वरित पूर्ण केली. महाविद्यालयातर्फे घेतलेल्या ८ वॉर्डसपैकी जुनी मंडई व काशी विश्वेश्वर हे दोन्ही वॉडस रँडम पध्दतीत निवडले गेले होते. तेथे मूल्यमापन होऊन हे दोन्ही वॉर्डस १०० टक्के साक्षर झाले आहेत. याबद्दल सर्व स्तरांवर महाविद्यालयाच्या कामाची प्रशंसा करण्यात आली आहे. तालुका बाहय मूल्यमापन सदस्यांनी दि. ५/११/९३ रोजी महाविद्यालयास भेट दिली त्या:वेळेस संस्थेचे सेक्रेटरी डॉ. वर्धमान माणिकचंद कोठारी यांनी महाविद्यालय या कामी कोठेही कमी पडणार नाही याची ग्वाही दिली. मूल्यमापन सदस्यांनी आमच्या कार्याबद्दल जाहीर आभार मानले.

या वर्षी दर महिन्यास पुणे विद्यापीठात मासिक बैठका झाल्या व सतत आढावा घेतला गेला. शेवटची मिटिंग दिनांक ३/१/९४ रोजी झाली. त्यात लोकजागर भाग-२ कॅसेटचे

प्रकाशन संगीतकार राम कदम यांचे हस्ते होऊन उत्कृष्ट कार्याबद्दल (बाहय मूल्यमापन) सर्टिफिकेट्स वाटप झाले. महाविद्यालयाच्या वतीने प्रा. ए.एस. पंढरी यांनी प्र-कुलगुरु डॉ. हापसे यांचेकडून सर्टिफिकेटस स्वीकारली. यावेळी कुलगुरु डॉ. गुप्ते यांनी मार्गदर्शन केले.

दिनांक १८/१२/९३ रोजी रात्री ८-०० वाजतां एन.एस.एस. कॅम्प उंडवडी (क.प.) येथे ''साक्षरोत्तर कार्यक्रम'' या विषयावर प्रा. पंढरी यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले व त्यांचे हस्ते नवसाक्षरांना सर्टिफिकेटस वाटण्यात येऊन साक्षरोत्तर कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

**कलाजत्था** - जिल्हा साक्षरता मंचतर्फे साक्षरतेवर आधारित गाणी, भजन, भारुडे, इ. चा समावेश असलेली लोकजागर भाग-२ ही कॅसेट प्रख्यात संगीतकार राम कदम यांचे मार्गदर्शनाखाली तयार झाली आहे. यात आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले. प्रा. पी. आर. पाटील यांचे मार्गदर्शनाखाली त्यांचे ट्रेनिंग उरुळी कांचन, खेड-शिवापूर व पुणे येथे झाले. शिबीर कालावधीत वडकीनाला व सोरतापवाडी येथे पथनाट्याचे कार्यक्रम सादर केले. दिनांक १६/८/९३ रोजी पुणे विद्यापीठात कलाजथा स्पर्धेत आमचे तीन जथे सहभागी झाले होते. श्री. अजित तावरे (एफ.वाय.बी.ए.) व श्री. दीपक महामुनी (एम.ए.) यांच्या ग्रुपने तालुकाभर व शहरातील विविध वार्डात वर्षभर पथनाट्याचे कार्यक्रम सादर केले. याकामी नियोजन व वाहनाची सोय पंचायत समितीने केली.

**लोकसंख्या शिक्षण मंडळ** - मंडळाच्या वतीने महाविद्यालय व वस्ती पातळीवर विविध कार्यक्रम घेण्यात आले. पथनाट्य, व्हीडीओ शो व प्रदर्शन यांचे आयोजन साक्षरता, अंधश्रध्दा निर्मूलन, आरोग्य आहार इ. विषयांवर केले. महाविद्यालयात ''पर्यावरण'' या विषयावर प्रश्नमंच कार्यक्रम व चर्चासत्र घेण्यात आले.

याशिवाय पथनाट्य स्पर्धा महाविद्यालयात घेण्यात आली. त्यात श्री. दीपक महामुनी आणि श्री. ए.जी. तावरे यांच्या पथकांनी पथनाट्ये सादर केली. या कामी कु. प्रगती भापकर व श्री. डी. एन.भंडलकर यांचे सहकार्य मिळाले.

लोकसंख्या शिक्षण मंडळाचे हे कार्य प्रा. बी.पी. जोहरापूरकर यांनी केले.

**गांवकचेरी व महिला मंडळे** - बाहेरगांवी नेमलेल्या प्राध्यापकांनी त्या त्या गावांना भेटी देऊन गावकचेरीच्या कामकाजाची माहिती घेतली. मासिक बैठकीच्या अहवालांत याचा समावेश आहे. शहरातील ८ वॉर्डात महिला मंडळे स्थापन करून त्यांचे रजिस्ट्रेशन झाले आहे.

नुकतेच या सर्व कार्यक्रमाचे मूल्यमापन झाले असून बारामती तालुका जिल्हयात प्रथम क्रमांकाने आघाडीवर राहिला. यात महाविद्यालयाचा सिंहाचा वाटा आहे.

सदर कार्यक्रमात खालील व्यक्तींनी आम्हांस सतत प्रोत्साहन व मार्गदर्शन केले त्यांचा उल्लेख आवश्यक आहे.

मा. आमदार अजितदादा पवार. मा. श्री. जिल्हाधिकारी. उपजिल्हाधिकारी. अतिरिक्त जिल्हाधिकारी. श्री. देशमुख (प्रांत), श्री. वाघ (बी.डी.ओ.), श्री. पऱ्हाड (तहसिलदार), नगरीचे नगराध्यक्ष श्री. सदाशिव सातव. श्री. निंबाळकर (नगरपरिषद), तसेच पंचायत समितीचे अध्यक्ष सतिशमामा खोमणे, श्री. काळे गुरुजी, श्री. पी.बी. नरुटे, नगरसेवक, विद्यार्थी स्वंयसेवक, एन.एस. एस. (कॉलेज) इ. तसेच मा. कुलगुरु डॉ. गुप्ते, प्र-कुलगुरु डॉ. हापसे, प्रा. निकम (विद्यार्थी कल्याण मंडळ प्रमुख) डॉ. भोईटे या अधिकारी व्यक्तींचे सतत मार्गदर्शन मिळाले. श्री. तेज निवळीकर यांनी तालुका बाहयमूल्यापन प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडली.

आमच्या कॉलेजच्या प्राध्यापक वर्गाने तर दिवसरात्र मेहनत घेतली. हे सर्व कार्य माजी प्राचार्य एस.पी. कदम यांचे मार्गदर्शनाखाली पार पडले. ते वर्षभर दररोज प्राध्यापकांसमवेत वॉर्डाना भेटी देत होते. या कार्यक्रमानंतरचा टप्पाही प्राचार्य डॉ. एम.एम.गांधी यांचे कुशल नेतृत्वाखाली पार पडेल असा आम्हांस विश्वास आहे.

**–प्रा. अरुण पंढरी**
प्रमुख प्रौढ शिक्षण विभाग

## सांस्कृतिक विभाग

सन १९९३-९४ शैक्षणिक वर्षात सांस्कृतिक मंडळा-तर्फे व्याख्याने-

**शिक्षक दिन** - दि. ८ सप्टेंबर १९९३ रोजी शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्र.ल. गावडे, पुणे यांचे व्याख्यान.

**कर्मवीर जयंती** - कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या संयुक्त कर्मवीर जयंतीनिमित्त दि. २१ सप्टेंबर १९९३ रोजी मा. डॉ. एम.डी. नलवडे, कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे



यांचे व्याख्यान.

**सांस्कृतिक कार्यक्रम** - प्रसिध्द मराठी सिनेकलावंत व नाट्यकलाकार मा. श्री. वसंत शिंदे यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान.

**विवेकानंद जयंती** - स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त ''युवक दिन'' साजरा केला. माजी प्राचार्य शिवाजीराव कदम, उपप्राचार्य डॉ. कृष्ण सुर्वे व प्राचार्य मनोजकुमार गांधी यांचे उद्बोधक मार्गदर्शन.

**विविध कलागुणांच्या स्पर्धांचे आयोजन :**

आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता दि. २ मार्च ते ५ मार्च १९९४ या काळात विद्यार्थ्यांच्या काव्यवाचन, कथाकथन, प्रसंगनाट्य, एकपात्री प्रयोग, नाट्यवाचन, लघुनाट्य, भक्तिगीत, सिनेगीत, शास्त्रीय संगीत व वादयवादन इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विजेत्या कलाकार विद्यार्थ्यांना वार्षिक गुणवत्ता पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे मा. श्री. शिवाजीराव देशमुख, जिल्हाधिकारी, पुणे यांचे शुभहस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

**विद्यार्थ्यांचा इतरत्र सहभाग :**

कु. दुर्गा हडके, व्दितीय वर्ष कला हिने फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे तर्फे आयोजित निबंध स्पर्धेत '' एकच प्याला एक अजरामर नाट्यकृती'' या विषयाला उत्तेजनार्थ रु. ४० /- बक्षिस संपादन केले.

कु. लीना गांधी व्दितीय वर्ष कला, हिने मॉडर्न महाविद्यालय, पुणे तर्फे आयोजित स्वरमाधुरी शास्त्रीय संगीत स्पर्धेत सहभाग घेतला.

**विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम :** दि. ६/३/९४ रोजी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा विविध गुणदर्शनाचा बहारदार कार्यक्रम सादर केला.

**– प्रा. रमेश जोशी**
प्रमुख

## फिल्म

सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात फिल्म क्लबतर्फे विविध शैक्षणिक, क्रीडा, नाट्य, कला विषयक फिल्मस व व्हीडीओ कॅसेटस दाखविण्यात आल्या.

**सहभाग :** ब्रिटीश कौन्सिल डिव्हिजन (फिल्मक्लब) मुंबई, ऑस्ट्रेलियन हाय कमिशन चाणक्यपुरी, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य दृक श्राव्य संस्था, पुणे यांच्या सहकार्याने खालील फिल्मस उपलब्ध करण्यात आल्या.

Deflation and Inflation; Shakespeare and his Teacher, Bank of England, Use of Television in the class-room.

Ways of seeing Language of Advertising

**व्हिडिओ कॅसेटस :**

Rent, Interest and Profit
Import - Export
The World Bank (IBRD)
Protectionism.
The Markets.

**–प्रा. रमेश जोशी**
प्रमुख

**शाळा-महाविद्यालय समूह योजना :**

सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात शाळा-महाविद्यालय समूह योजना अंतर्गत खालील व्याख्याने आयोजित केली-

१) महाविद्यालयात इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना ''संगणकाची ओळख, माहिती आणि प्रात्यक्षिक'' याबाबत प्रा. नंदकुमार सुबंध (संख्याशास्त्र विभाग) यांनी मार्गदर्शन केले.

२) सोमेश्वर विद्यालय, अंजनगांव (पुणे) मध्ये ''व्यवसाय मार्गदर्शन आणि उपयुक्त अभ्यास'' यावर प्रा.बी.बी.पाटील यांचे व्याख्यान आयोजित केले.

३) मिशन हायस्कूल, बारामती इयत्ता १०वी च्या विदयार्थांना ''इंग्रजी'' विषयासंबधी प्रा. बी.डी.सरवदे यांनी मार्गदर्शन केले.

**–प्रा. मारुती भगत**
प्रमुख

# राष्ट्रीय छात्रसेना अहवाल

(छात्र संख्या - १०६)

| अ.नं. | कार्यक्रम | ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|
| **(१)** | **विविध कार्यक्रम :** | | |
| १. | १५ ऑगस्ट १९९३ स्वातंत्र्यदिन मानवंदना | महाविद्यालय | १५.८.९३ |
| २. | एन.सी.सी. सद्‌भावना दिवस २५ ऑगस्ट १९९३ | महाविद्यालय | २५.८.९३ |
| ३. | चर्च-मस्जिद-मंदीर भेट | बारामती | ३१.८.९३ |
| ४. | वृक्षारोपण | महाविद्यालय परिसर | ७.९.९३ |
| ५. | वार्षिक, प्रशिक्षण शिबीर | मुंढवा, पुणे | १९.११.९३ ते ३०.११.९३ |
| ६. | फायरिंग - ७.६२ | मुंढवा, पुणे | २८.११.९३ |
| ७. | रक्तदान शिबीर | मुंढवा, पुणे | २९.११.९३ |
| ८. | २६ जानेवारी १९९४ प्रजासत्ताकदिन मानवंदना | महाविद्यालय | २६.१.९४ |
| ९. | रक्तदान शिबीर | महाविद्यालय | २२.२.९४ |

(२) **छात्रसैनिकांचा विविध कॅम्पमधील सहभाग :**

१. दि. २१ मे ९३ ते २ जून ९३ या कालावधीत सोलापुर येथे झालेल्या प्री.आर.डी. कॅम्पसाठी सिनीयर अंडर ऑफिसर अनंत बापूराव कुलकर्णी टी.वाय.बी.एस्सी. यांची निवड व सहभाग आणि दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय छात्रसेना संचलनासाठी निवड.

२. एन.आय.सी. (राष्ट्रीय एकात्मता शिबीर-अंबरनाथ-२१ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर ९३) सहभाग - सिनीयर अंडर ऑफिसर अनंत बापूराव कुलकर्णी, कंपनी क्वार्टर मास्टर सार्जंट नरहरी सोपान देवकाते यांनी कॅपमध्ये रॉक क्लायबिंगचे उत्कृष्ट प्रशिक्षण घेतले.

(३) **एन.आय.सी./राष्ट्रीय एकात्मता शिबीर :**
सैनिक स्कूल विजापूर येथे दि. २ नोव्हेंबर ९३ तें १४ नोव्हेंबर ९४ या कालावधीत झालेल्या कॅम्पमध्ये सार्जट - नजीर जाफर शेख, सार्जंट-राजकुमार चंद्रकांत पंडीत प्रशिक्षणात सहभाग.

(४) **एम.आय.आर.सी. आर्मी अटैचमेंट कॅम्प :**
अहमदनगर येथे दि. २९ नोव्हेंबर ९३ ते १२ डिसेंबर ९३ ता कालावधीत झालेल्या कॅम्पमध्ये -सार्जंट-दत्तात्रय विठ्ठल खलाटे, सार्जंट-तुकाराम दत्ता पाडुळे : प्रशिक्षणात सहभागी होऊन अत्याधुनिक क्षेपणास्त्रांची व रणगाड्यांची माहिती घेतली.

(५) बारामती ते गोवा व परत राष्ट्रीय एकात्मता सायकल सफर पूर्ण. कालावधी-१८ डिसेंबर ९३ ते ३० डिसेंबर ९३. कॅडेट-संजय संभाजी दराडे, कॅडेट-एकनाथ जगन्नाथ देशमाने यांनी १३ दिवसात १४०० कि.मी. अंतर दररोज १०० कि.मी. पेक्षा जास्त अंतर पार करून सुरक्षितरित्या सायकल सफर पूर्ण केली.

(६) २६ जानेवारी ९४ रोजी बारामती येथील सरकारी ध्वज संचलनामधील स्पर्धेत ३३ छात्रांचा सहभाग व उत्कृष्ट संचलनाचे पारितोषिक.

(७) **सर्टिफिकेट निकाल :**
''बी'' सर्टिफिकेट परीक्षेत २६ छात्रांपैकी २२ उत्तीर्ण.
''सी'' सर्टिफिकेट परीक्षेत ६ छात्रांपैकी ३ पास.

**–कॅप्टन मानसिंगराव गोडसे**
राष्ट्रीय छात्रसेना प्रमुख

# राष्ट्रीय सेवा योजना

दिनांक १५ ऑगस्ट, १९९३ रोजी प्रा. के.एस. ढमाळ यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. या दिवशी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परिसरातील गाजर गवत निर्मूलन व इतर स्वच्छता करून नियमित कार्यक्रमाला सुरुवात केली.

या श्रमदानाच्या कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थ्यांनीं एन.एस.एस. गीत व इतर देशभक्तिपर गीते गायली. या दिवशी एकूण २०० विद्यार्थी हजर होते.

रक्षाबंधन : दिनांक १३.८.१९९३ रोजी बारामती शहरातील रिमांड होममधील १०० विद्यार्थ्यांना राखी बांधून मिठाई वाटण्यात आली. या वेळी रिमांड होम प्रमुखांनी मार्गदर्शन केले व एन.एस.एस.मधील विद्यार्थ्यांनी करमणुकीचा कार्यक्रम सादर केला.

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन : दिनांक ८.९.९३ रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त बारामती शहरातून विविध घोषणा फलक घेऊन व साक्षरता गीते गावून साक्षरता दिंडीचे आयोजन करण्यात आले. साक्षरता दिंडींचा प्रारंभ प्राचार्य प्रा.एस.पी. कदम यांच्या शुभहस्ते करण्यात आला. सदर दिंडीतून साक्षरतेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

सार्वजनिक गणेशोत्सव - राष्ट्रीय सेवा योजनेतील १० स्वयंसेवकांनी गणेशोत्सव काळात शांतता राखण्यासाठी पोलीस दलास सहकार्य केले.

एक दिवसीय शिबीर : दिनांक ३.१०.१९९४ रोजी उंडवडी (क.प) व सावळ या दोन दत्तक खेड्यात एन.एस.एस.चे एक दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी ग्रामसफाई, गाजर-गवत निर्मूलन व रस्ता दुरुस्ती इ. कामे करण्यात आली.

विशेष हिवाळी शिबीर : दिनांक ११.१२.१९९३ ते २०.१२.९३ या कालावधीमध्ये मौजे उंडवडी (क.प.) येथे १०० विद्यार्थ्यांचे हिवाळी शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात विद्यार्थ्यांनी बंधारा बांधून माती आडवा, पाणी जिरवा हा प्रकल्प राबविला. या बरोबर ग्रामसफाई व रस्ता दुरुस्ती करण्यात आली.

परिसर स्वच्छता व श्रमदान : नियमित कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या परिसरात गाजर गवत निर्मूलन, परिसरातील झाडांना कीड लागू नये म्हणून रंग दिला, नारळ बाग व योगधाम परिसर इ. ठिकाणी स्वच्छता करण्यात आली.



| | | |
|---|---|---|
| गट प्रमुख - | १) श्री. सुनिल बगाडे | १) कु. उल्का वैद्य |
| | २) श्री. सूर्यकांत तावरे | २) कु. जनाबाई काळे |
| | ३) श्री. संजय कोकरे | ३) कु. नीलिमा चोपडे |

**विद्यार्थ्यांचा विविध शिबिरातील सहभाग :**

| दिनांक | उपक्रमांचे नांव व आयोजन | विद्यार्थ्यांचे नांव |
|---|---|---|
| १३.८.९३ | स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी आण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर | एस.आर. तावरे, आर.एस. तावरे |
| १२.९.९३ | जलसंवर्धन कार्यक्रम राळेगण शिंदी, जि. अहमदनगर | श्री. सुनिल बगाडे, श्री. संदेश शिंदे |
| ७.१०.९३ ते १३.१०.९३ | लोकजागर भाग - २ कॅसेट पुणे जिल्हा साक्षरता आंदोलन मंचातर्फे उरळीकांचन येथे प्रशिक्षण शिबीर | कु. वर्षा कुलकर्णी, कु. आरती भुजबळ |
| २०.१०.९३ ते २४.१०.९३ | पुणे जिल्हा साक्षरता आंदोलन मंचातर्फे खेड शिवापूर येथे प्रशिक्षण मार्गदर्शक - प्रा. प्रकाश पाटील | कु. मंजूषा गाढवे, कु. योगिता गाढवे, कु. शरयू बोराटे |
| २३.११.९३ ते २.१२.९३ | राष्ट्रीय एकात्मता व प्रजासत्ताक दिन संचलन पूर्व तयारी राष्ट्रीय पातळीवर शिबीर आमच्या महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते त्यामध्ये निवड | कु. सुनिता धायगुडे |
| २६.१.९४ | दिल्ली येथील २६ जाने. १९९४ रोजी प्रजासत्ताक दिन संचलनामध्ये सहभाग | कु. सुनिता धायगुडे |
| २७.१.९४ ते ३१.१.९४ | विद्यापीठ स्तरीय मुलींचे शिबीर भुगांव येथे आण्णासाहेब आवटे महाविद्यालय आयोजित | कु. जनाबाई काळे |
| १५.२.९४ ते २०.२.९४ | विद्यापीठ स्तरीय मुलांचे शिबीर न्यू आर्टस. कॉमर्स सायन्स कॉलेज, शेवगांव, जि. अहमदनगर | श्री. दिलीप जगताप |

**–प्रा. रवींद्र कुदळे**
**–प्रा. अविनाश साखळकर**
कार्यक्रम अधिकारी

## राष्ट्रीय सेवा योजना

**राष्ट्रीय एकात्मता/प्रजासत्ताक दिन संचलन निवड शिबीर**

दिनांक २३ नोव्हेंबर १९९३ ते २ डिसेंबर, १९९३ या काळात राष्ट्रीय सेवा योजनेचे राष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रीय एकात्मता/प्रजासत्ताक दिन संचलन निवड शिबीर महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे आयोजन पुणे विद्यापीठ व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या शिबिरासाठी संपूर्ण देशभरातील एकूण १५ विभागातून ४८० विद्यार्थी-विद्यार्थिनींसह एकूण सुमारे ६०० सदस्य आले होते.

या शिबिराचा उद्घाटन समारंभ महाराष्ट्राचे उच्च शिक्षणमंत्री मा. प्रभाकर धारकर यांचे शुभहस्ते संपन्न झाला. या शिबीरकाळात शिबिरार्थींचा दहा दिवस शारीरिक शिक्षण, कवायत, नामांकित वक्त्यांची व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम असा दिनक्रम होता. वरील उपक्रमातील सहभागावर आधारित एकूण १६० विद्यार्थ्यांची दिल्ली येथील प्रजासत्ताक दिनाच्या संचलनासाठी निवड करण्यात आली. यासाठी केंद्रसरकारच्या ''मानव संसाधन विकास'' विभागाच्या विविध अधिकाऱ्यांची निवड समिती नियुक्त करण्यात आली होती.

शिबीरकाळात मा. मुख्यमंत्री शरदराव पवार, दहाव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष मा. के.सी. पंत, खासदार मा. गोविंदराव आदिक, मा. भगवान प्रकाश, व डॉ. कुरेशी, मानव संसाधन विकास विभाग, मा. कुलगुरु डॉ. श्रीधर गुप्ते, मा. कुलसचिव एम.डी. नलावडे, मा. बी.टी. कांबळे, उपसचिव शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मा. श्रीमती एच.ए.रत्ना, उप कार्यक्रम सल्लागार, पुणे विभाग, इत्यादी मान्यवरांनी भेटी दिल्या.

राष्ट्रीय स्तरावरील अशा शिबिराचा महाराष्ट्रातर्फे व पुणे विद्यापीठातर्फे आयोजनाचा मिळालेला प्रथम मान व महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. सुनिता अंबादास धायगुडे हिची दिल्ली येथील प्रजासत्ताक दिन संचलनासाठी झालेली निवड याचा महाविद्यालयास विशेष अभिमान आहे.

या शिबिराचे मुख्य संयोजक म्हणून मा. नंदकुमार निकम, संचालक, विद्यार्थी कल्याण व संयोजक राष्ट्रीय सेवा योजना, पुणे विद्यापीठ यांनी काम पाहिले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी मा. आमदार अजितदादा पवार, मा. आमदार विजयराव मोरे व सभापती सतीशराव खोमणे, बारामती नगरपरिषद व शहरातील विविध संस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले. मा. नगराध्यक्ष सदाशिवराव सातव, मा. सुभाष ढोले, मा. किरण गुजर, अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. श्री. जंबुकुमार चंदुलाल शहा, सचिव मा. डॉ. वर्धमान माणिकचंद कोठारी व सर्व संस्थाचालक तसेच महाविद्यालयाचे मांजी प्राचार्य एस.पी. कदम उपप्राचार्य, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक यांच्या मार्गदर्शन व सहकार्यामुळेच शिबीर सर्वार्थाने यशस्वी होऊ शकले.

**-प्रा. केशवराव ढमाळ**
स्थानिक संयोजक
राष्ट्रीय एकात्मता/प्रजासत्ताक दिन
संचलन निवड शिबीर

## कविवर्य मोरोपंत वाद-वक्तृत्व स्पर्धा

दिनांक मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वाद व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन शुक्रवार दि. १८ व शनिवार दि. १९ फेब्रुवारी, १९९४ रोजी करण्यात आले.

**(अ) वैशिष्ट्ये :**

(१) यावर्षी वाद स्पर्धेत पहिल्या तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना द्यावयाच्या पारितोषिकांच्या रकमेत वाढ करून बारामती नगरपरिषदेने पारितोषिकांची रक्कम पुढीलप्रमाणे केली.
गुणानुक्रमे प्रथम क्रमांक - रु. ७०१/-
गुणानुक्रमे व्दितीय क्रमांक - रु. ५०१/-
गुणानुक्रमे तृतीय क्रमांक - रु. ३०१/-

(२) वक्तृत्व स्पर्धेतील गुणानुक्रमे पहिल्या तीन क्रमांकासाठी नगरपरिषदेने पारितोषिकात वाढ केली.



प्रथम क्रमांक - रु. ७०१/-
व्दितीय क्रमांक - रु. ५०१/-
तृतीय क्रमांक - रु. ३०१/-

(३) माजी नगराध्यक्ष स्व. धोंडिबा आबाजी सातव, बारामती यांच्या स्मरणार्थ उत्स्फूर्त विषयातील प्रथम क्रमांकासाठी फिरता स्मृतिचषक ठेवण्यात आला.

**(ब) वाद स्पर्धेचा विषय व सहभाग :** ''निकोप लोकशाहीसाठी धर्म व राजकारण यांची फारकत झालीच पाहिजे''. वाद स्पर्धेत २८ स्पर्धकांनी सहभाग घेतला.

**(क) वक्तृत्व स्पर्धेचे विषय :**
(१) मोरोपंती रामायणाची वैशिष्ट्ये
(२) मोरोपंतांच्या काव्यरचनेत केकावलीचे स्थान
(३) जाहिरातीच्या विळख्यात सामान्य माणूस
(४) योग आणि मन:शांती
(५) स्त्री-मुक्ती पुरे, पुरुष मुक्ती हवी
(६) संस्था : विनाअनुदान, कुणाचे कल्याण?
(७) व्यसनाधीन नर जो झाला....
(८) डंकेल प्रस्ताव व भारत
वक्तृत्व स्पर्धेत ३२ स्पर्धकांनी सहभाग घेतला.

(ड) उत्स्फूर्त स्पर्धेत २० स्पर्धकांनी सहभाग घेतला.

(इ) **उद्घाटन :** वाद व वक्तृत्व स्पर्धांचे उद्घाटन मा. श्री. किरण गुजर, सभापती, पाणीपुरवठा समिती, बारामती नगरपरिषद, यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे मा. श्री. बी.डी. कोळेकर, मुख्य कार्याधिकारी, बारामती नगरपरिषद, यांच्या हस्ते झाले.

(ग) **पारितोषिक वितरण :** वाद व वक्तृत्व स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ मा. श्री. विकास बारवकर, चेअरमन, बारामती तालुका खरेदी-विक्री संघ यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे मा. श्री. गुलाबराव ढवाण-पाटील, सदस्य, बारामती नगरपरिषद व मा. श्री. किरण गुजर यांच्या मंगल हस्ते पार पडला.

(म) **पारितोषिक विजेते :**
**वक्तृत्व स्पर्धा :** कु. आरती रानडे, पूना कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे या विद्यार्थिनी स्पर्धकाला वक्तृत्वात प्रथम क्रमांक मिळाला व चांदीची फिरती ढाल मिळाली.

**वाद स्पर्धा :** श्री. राहुल वैद्य व श्री. शिरीष केळकर, आय.एल.एस. लॉ कॉलेज, पुणे या स्पर्धकांनी वाद स्पर्धेत फिरती चांदीची ढाल जिंकली. श्री. शिरीष केळकर, आय.एल.एस. लॉ कॉलेज, पुणे या स्पर्धकाला गुणानुक्रमे प्रथम क्रमांकाचे रोख पारितोषिक मिळाले.

**उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा :** या स्पर्धेत श्री. योगेश जोशी, सिंबायोसीस सोसायटीचे कला व वाणिज्य महाविद्यालय, पुणे या स्पर्धकाने प्रथम क्रमांकाचे रोख पारितोषिक व स्व. धोंडिबा आबाजी सातव फिरते स्मृतिचिन्ह मिळविले.

**आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे यश :**
(१) श्री. विजय मावळणकर यांनी वाद स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक, तसेच महाविद्यालयातर्फे ठेवलेले पारितोषिक मे. पोपटलाल शहा पारितोषिक, यशवंतराव कानिटकर पारितोषिक मिळविले.
(२) कु. प्रगती भापकर यांनी वक्तृत्व स्पर्धेतील श्री. अशोक कृष्णाजी जाधव पारितोषिक मिळविले.

(भ) **महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे इतरत्र झालेल्या वाद व वक्तृत्व स्पर्धांतील यश :**
(१) श्री. अनिल रुपनवर यांनी मालेगांव (नाशिक) ज्युनियर चेंबर (जेसीज) वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांकाची ढाल मिळविली.
(२) श्री. विजय मावळणकर यांनी अनंतराव थोपटे महाविद्यालय, भोर येथील वाद स्पर्धेत व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.
(३) श्री. विष्णू मस्के यांनी कर्मवीर औदुंबररावजी पाटील आंतर महाविद्यालयीन ढाल व वक्तृत्व स्पर्धा, वेणुनगर, व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.
(४) श्री. विजयकुमार चव्हाण व श्री. युवराज खरात यांनी ''प्रज्ञाभारती'', कॅम्लीन पुरस्कृत ''वाग्भट'' आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा, पुणे यात प्रशस्तिपत्रके मिळविली.

**-प्रा. विलास काकडे**
कार्याध्यक्ष

# ONE DAY SEMINAR IN ENGLISH

A one-day Seminar in ENGLISH on the subject "Absurdism in Literature" was held on Saturday the 26th March 1994. The Seminar was financed by the University of Poona.

Dr. Prashant K. Sinha, Professor & head, Department of English, University of Poona inaugurated the Seminar and delivered his key-note address focusing on the origin, progress and effects of the Absurdist Movement in Europe andAmerica in the field of Drama and Fiction. Dr. Sinha, Dr. Jahagirdar,Professor & Head, Department of English, Shivaji University, Kolhapur, Prof. V.M. Madge, Head, Department of English, Saswad, Dr. A.P. Dani. Head, Dept.of English, Fergusson College, Pune and Prof. P.D. Wadgaonkar, Dept. of English, Tuljaram Chaturchand College, Baramati, delivered lectures on the works of writers such as Samuel Becket Harold Pinter and Edward Albee, during the two Sessions.


Teachers and students of M.A. of Tuljaram Chaturchand College, actively participated in the discussions.

Doctors Sinha and Jahagirdar were felicitated by Dr. V.M. Kothari, Secretary, Anekant Education Society, and Dr.M.M. Gandhi, Principal, Tuljaram Chaturchand Colege, Baramati; Professors P.D. Wadgaonkar and T.S. Sawant, proposed vote of thanks at the inaugural and Valedictory functions.

**Prof. Kumar Iyer**
Department of English



थोडी शिल्लक आहे.
शिवाय कॉसमॉस गृहकर्ज योजनेची मदत घेणार
अन् खूप दिवसांचं स्वप्न पूर्ण होणार..



थोडीशी साठवण असतेच आपली. थोडी मदत हवी असते निकड अन् शिलकीची टोकं सांधायला. ही मदत करायला कॉसमॉस आहे सदैव तयार. त्यात तुम्ही दोघंही मिळवते असाल तर सोन्याहून पिवळं...

कॉसमॉस गृहकर्ज योजना

- रुपये ३ लाखपर्यंतचे कर्ज व्यक्ती अथवा ग्रुपसाठी.
- नवीन अथवा रिसेल फ्लॅट वा बंगल्यासाठीही कर्ज उपलब्ध.
- परतफेडीची मुदत १० वर्षे
- अन्य कोणत्याही गृहकर्ज योजनेपेक्षा किफायतशीर योजना.
- अधिक माहितीसाठी आजच आमच्या कोणत्याही स्वागतकक्षाला भेट द्या.

कॉसमॉस बँक
(शेड्यूल्ड बँक)
दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.
मुख्य कार्यालय : २६९/२७०, शनिवार पेठ, पुणे-४११ ०३०